सोलापूर तरुण भारत
आसमंत



# जग तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत!

**इराण- इस्त्रायल- अमेरिका या तिघांच्या संघर्षाने जगाला वेठीस धरले आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यामध्ये इराणचे सर्वेसर्वा अयातुल्ला खोमेनी ठार झाले. त्यामुळे या युद्धाची व्याप्ती वाढत आहेत. कोणतेही युद्ध सुरु करताना, त्याचे काही उद्दिष्ट असते. या युद्धातील कारक देशांच्या उद्दिष्टांचा आणि त्याच्या परिणामांचा घेतलेला आढावा...**

लक्ष्यवेध

डॉ. प्रमोद पाठक

ज्या संकटाची जगाला गेले काही महिने भीती वाटत होती, ते आता जगापुढे आ वासून उभे ठाकले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाटाघाटींच्या फेऱ्या सुरू असतानाच, प्रथमअमेरिका आणि इस्त्रायल यांनी मिळून २८ फेब्रुवारीला हवाई हल्ले करण्यास सुरुवात केली. लागोलाग इराणनेही, इस्त्रायल आणि अमेरिकेच्या आखाती मित्र देशांमधे असलेल्या लष्करी ठाण्यांवर प्रतिहल्लूयांना सुरुवात केली. काही तासांतच हेही लक्षात आले की, हे हल्ले केवळ लष्करी ठिकाणांपुरते मर्यादित न राहता, नागरी ठिकाणांवरही झाले.

सर्वांत हृदयद्रावक हल्ला इराणमधील एका मुलींच्या शाळेवर झाला. नवीनतममिळालेल्या माहितीप्रमाणे, त्या हल्ल्यात विद्यार्थिनींसह सुमारे १०० लोकांना प्राण गमावावे लागले. तेहरानसकट इतर अनेक शहरांवर न जुमानता अमेरिकेने हवाई हल्ले केले. हे करताना प्रत्येक वेळी फक्त सैनिकी छावण्याच पाहून ते केले असे नसून, नागरी वस्त्याही त्यातून सुटल्या नाहीत. तेहरान तर तेच पाहात होता. त्याचेही प्रतिहल्ले नागरी वस्त्यांवर आणि बंदरांवर झाले. २८ फेब्रुवारीच्या रात्रीपासूनच अनेक वाहिन्यांवर या युद्धाची प्रत्यक्ष वृत्ते आणि त्यांची समालोचने सुरू आहेत. ती इतकी की, शेवटी ती पाहण्याचा वीट आल्यासारखे झाले. ती दृश्ये आणि ठिकाणे वाचकांना आतापर्यंत बहुतांश माहिती झाली असतील. अगदी थोडक्यात लिहायचे तर, इराणने इस्त्रायल आणि अमेरिकी ठाण्यांबरोबरच, इतर आठ आखाती देशांवरही जवळपास एकाचवेळी हल्ले सुरू केले. इराणी परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते इस्माईल बघाइल यांनी त्याच्या समर्थनार्थ म्हटले की, त्या देशांमध्ये अमेरिकेच्या लष्करी ठाण्यांमधून हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता, स्वसंरक्षणार्थ आम्ही हल्ले केले. अशी खरी-खोटी समर्थने होतच असतात आणि होत राहतीलही. प्रश्न असा आहे की, हे युद्ध भडकण्याची चिन्हे गेले काही महिने जगावर घोंघावत होती. त्यादरम्यानच या होऊ घातलेल्या युद्धात त्यांना काय साध्य करायचे आहे, याची निश्चितीही केली होती. ती लक्षात घेऊनच त्यांची लक्ष्ये कितपत साध्य होण्याची शक्यता आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.



**प्रत्येकाची लक्ष्ये-**

अमेरिकेला सतत पाण्यात पाहणाऱ्या आणि त्याच्यावर स्थानिक पातळीवर कुरघोडी करण्यासाठी अयातुल्लांची क्रांती झाल्यापासून, अणुशस्त्रे बनविण्यासाठी आसुसलेल्या इराणी मुल्लाशाहीला नमविणे आणि त्यांना अणुशस्त्रे प्रगत करण्यापासून पूर्णपणे थांबवणे, हे उघडपणे अमेरिकेचे लक्ष्य होते. ते करण्यासाठी इराणमधून अयातुल्लाशाही पदच्युत करून, लोकशाहीवादी शासन प्रस्थापित करणे आणि उघडपणे सांगितले गेले नसले, तरी इराणमधे मुबलकपणे उपलब्ध असलेल्या खनिज तेलाच्या साठ्यावर वर्चस्व प्रस्थापित करणे, हेही लक्ष्य होते. मागील शतकात (पान ४ वर)

---

**सद्यस्थितीत खरी गरज आहे ती स्त्रीनं स्वतःला ओळखण्याची. आपण आपल्याला नीट ओळखू लागलो की आपल्यातल्या शक्तीची, ताकदीची, बुद्धिमत्तेची जाणीव होते. त्याच्या साहाय्यानं विविध समस्यांवर मात करणं शक्य होतं. त्या दृष्टीने जागृतीबाबत अजून काम होणं शिल्लक आहे, असं म्हणता येईल. खरं तर ही एक प्रक्रिया आहे आणि ती सतत सुरू राहायला हवी. आजच्या जागतिक महिला दिनी हा विचार सर्वदूर पसरायला हवा.**

# महिलांनो, आत्मशोध घ्या...



निमित्त

उर्मिला राजोपाध्ये

जागतिक महिला दिन हा महिलाविषयक प्रश्न समाजासमोर आणण्याचं औचित्य असणारा आणि विविध कार्यक्रमांद्वारे साजरा होणारा एक दिवस असला, तरी महिलांविषयक प्रश्न हे काही एका दिवसात मांडले जातील आणि त्यावरील उत्तरं लगेच मिळतील, असा विषय नाही तर ही सतत चर्चेत राहणारी बाब आहे. महिलांसंदर्भातले अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागल्यापासून त्यावर एक एक तोडगे निघू लागणं, ही प्रक्रिया दीर्घ असून आणखी बराच काळ त्यावर काम करणं गरजेचं आहे. मात्र, आता अशा प्रश्नांचा गांभीर्यानं विचार होणं आणि त्याविषयी जनमत तयार होताना दिसणं ही नक्कीच आश्वासक स्थिती म्हणता येईल. तसं पाहायला गेलं तर १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून जो धरणाऱ्या सामाजिक चळवळीने स्त्रियांना मनुष्य म्हणून असलेल्या आपल्या अस्तित्वाची प्रथम जाणीव करून दिली.

घटनेने स्त्रियांना अधिकार दिले. नवे कायदेकानून आले. स्त्री म्हणून, स्वतंत्र लोकशाही देशाची नागरिक म्हणून शेतातक ारखान्यात- मळ्यात-खाणीत काम करणारी मजूर म्हणून, ऑफिस- बँका- दवाखाने या ठिकाणी कर्मचारी म्हणून, इंजिनीअर- डॉक्टर- वकील- पायलट आदी क्षेत्रात काम करणारी म्हणून किंवा निव्वळ गृहिणी म्हणून दर्जा सुधारण्याची तिची आशा फलित झाली. स्वतंत्र नागरिक म्हणून, एक व्यक्ती म्हणून जगण्याची अभिलाषा जागृत झाली. असं असूनही तिचा मानसिक कोंडमारा का व्हावा? स्त्री घराबाहेर पडून नोकरी करू लागली तरी तिच्याकडे पाहण्याच्या समाजप्रवृत्तीत फरक का पडू नये? स्त्रीकडे आजही एक वस्तू म्हणून पाहिलं जातं. ही धारणा बदलणं हे आजही स्त्रियांपुढील एक आव्हान आहे. या शतकानं तर अधिकाधिक स्त्रियांसाठी आर्थिक स्वातंत्र्याच्या वाढत्या संधींची कवाडं उघडी केली आहेत. आपापलं कार्यक्षेत्र निवडण्यापासून आपल्या क्षेत्रात अस्तित्व सिद्ध करण्यापर्यंतच्या संघर्षाला त्या आत्मविश्वासानं तोंड देत आहेत. पण वर वर समाधानकारक दिसणारं हे दृश्य नोकरी करणाऱ्या महिलांना समाधानाबरोबर आर्थिक स्वावलंबन मिळवून देतं का, हा प्रश्न आजच्या काळातही प्रश्नच राहावा, हे दुर्दैव आहे. त्याचप्रमाणे आजही स्त्री-पुरुष समानतेचा मुद्दा चर्चेत राहावा हेदेखील दुर्दैव आहे. आज विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत असताना स्त्रियांना खरंच समानतेची वागणूक दिली जातेय का, या प्रश्नाचं उत्तर नकारार्थी आहे. या प्रश्नाच्या संदर्भातल्या विविध मुद्द्यांवर 'जागतिक महिला दिना'च्या निमित्ताने प्रकाश टाकला जातो, परंतु हे विचारमंथन सामाजिक परिवर्तनाच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल ठरतं का, हे पाहणं महत्त्वाचं आहे. अन्यथा, हल्लीच्या आधुनिक जमान्यात विविध प्रकारचे डेज साजरे होतात तसंच 'जागतिक महिला दिना'ला केवळ उत्सवी स्वरूप प्राप्त होतंय, असं वाटू लागेल.

सध्या विविध प्रकारच्या इव्हेंटना महत्त्व आलं असताना जागतिक महिला दिनाबाबत असं वाटणं साहजिक आहे; परंतु महिला दिनाच्या निमित्ताने सर्वत्र विविध कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळते. विविध क्षेत्रातल्या कर्तृत्ववान स्त्रियांचा गौरव, स्त्रियांच्या प्रश्नांवर होणारं विचारमंथन, तज्ज्ञांची व्याख्यानं, विविध क्षेत्रातल्या स्त्रियांचं अनुभवकथन असे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात दरवर्षी स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हमखास चर्चेला येतो. परंतु, या प्रश्नाची तीव्रता कमी होताना दिसत नाही. निर्भया प्रकरणानंतर अत्याचारविरोधी कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या. त्याद्वारे दोषींना कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. मात्र, हे पाऊल अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी उपयोगी ठरल्याचं दिसत नाही. सद्यस्थितीत खरी गरज आहे ती स्त्रीने स्वतःला ओळखण्याची. आपण आपल्यालाच ओळखू लागलो की आपल्यातल्या शक्तीची, ताकदीची, बुद्धिमत्तेची जाणीव होते. त्याच्या साहाय्यानं विविध समस्यांवर मात करणं शक्य होतं. त्या दृष्टीने जागृतीबाबत अजून काम होणं शिल्लक आहे, असं म्हणता येईल. खरं तर ही एक प्रक्रिया आहे आणि ती सतत सुरू राहायला हवी. त्यातून हळूहळू अपेक्षित परिणाम समोर येऊ लागतील. आता असं आशादायक चित्र दिसून येत आहे.

आज स्त्री-पुरुष समानतेचे गोडवे गायले जात असले, तरी आपल्या देशातल्या समाजावर पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा दिसून येतो. असं असेल तर स्त्री-पुरुष समानतेचं चित्र व्यापक प्रमाणात कसं निर्माण होणार, हा खरा प्रश्न आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवल्या जात आहेत. त्यामुळे अनेक महिलांना महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी प्राप्त होत आहे. परंतु बहुतांश ठिकाणी पदाच्या कारभाराची सूत्रं संबंधित महिलांचे पती वा घरातल्या कर्त्या पुरुषाकडेच असल्याचं चित्र समोर येतं. त्यामुळे महिलांना राखीव जागा मिळूनही दिलासादायक चित्र पाहायला मिळत नाही. मुख्य मुद्दा आहे तो स्त्रियांनी व्यक्त होण्याचा. आपली मतं, आपल्या अडचणी मोकळेपणानं मांडण्याचा आणि त्यासाठी त्यांना व्यासपीठ उपलब्ध झालं पाहिजे. याशिवाय स्त्रियांच्या संदर्भात नव्यानं समोर येणारे नियम, कायद्यात होणारे बदल याची माहिती सर्व वर्गांधल्या स्त्रियांपर्यंत पोहोचायला हवी. आपल्या देशात मुख्यत्वे अल्पशिक्षित तसंच अशिक्षित स्त्रियांचं प्रमाण लक्षात घेण्यासारखं आहे. 'मुलींना काय करायचंय अधिक शिकून, शेवटी चूल आणि मूलच सांभाळायचं' ही मानसिकता अद्यापही कायम दिसते. त्यात कौटुंबिक पातळीवर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाच्या अनेक घटना समोर येत आहेत. अशा घटनांच्या विरोधात आवाज कसा उठवायचा, हा प्रश्न असतो.



इथे एका घटनेचा उल्लेख करायला हवा. एका अल्पवयीन मुलीवर पित्यांकडूनच अत्याचार करण्यात आला. या घटनेचा तिला जबर धक्का बसला. तरीही 'तुझे वडील चांगले आहेत' असाच विचार तिच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे विमनस्क अवस्थेतही ती 'माझे वडील चांगले आहेत' असंच घोकत होती. अशा पद्धतीनं अत्याचाराच्या घटनांना कलाटणी दिली जात असेल तर त्या संदर्भातही काही उपाययोजना गरजेच्या ठरणार आहेत. वास्तविक, एक स्त्री सक्षम झाली तर संपूर्ण कुटुंब सक्षम होण्यास मदत होते. अशारीतीने एक-एक कुटुंब सक्षम होत गेल्यास त्यातून महत्त्वाचं सामाजिक परिवर्तन आकाराला येऊ शकतं. त्या दृष्टीने सक्षमीकरणावर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यात मुला-मुलींमधल्या भेदाचा मुद्दाही विचारात घेण्यासारखा आहे. लहानपणापासूनच हा भेद प्रकर्षानं पुढे येतो. अमुक कामं मुलींनीच करायची असतात, असा आग्रह धरला जातो. त्यामुळे मुलींना चाकोरीबाहेर जाऊन काही करणं कठीण जातं.

स्त्रीकेंद्रित असणारा एखादा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरतो. त्याचं सर्व स्तरांतून कौतुक केलं जातं, परंतु प्रत्यक्षातील चित्र तसं दिसतं का, हाही खरा प्रश्न आहे. 'दंगल'सारखे किंवा सायना नेहवाल, मेरी को यांच्यावर आधारित चित्रपट आवर्जून पाहणाऱ्या लोकांनी आपल्या मुलीला तिच्या आवडीनुसार कारकीर्दीसाठी पाठबळ दिल्यास निराशाजनक चित्र बऱ्याच प्रमाणात बदलणं शक्य होईल. सामाजिक बदलांध्ये चित्रपट महत्त्वाची भूमिका बजावतात, असं म्हटलं जातं. त्याचं प्रत्यंतर 'दंगल'पासून प्रेरणा घेण्यातून दिसून येणं गरजेचं आहे. खरं तर हा चित्रपट ज्या घटनेवर बेतला आहे, त्यातल्या मुलींना वेगळ्या वाटेवरून वाटचाल करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला; निंदानालस्ती सहन करावी लागली. परंतु कुटुंबीयांच्या भक्कम पाठबळावर आणि स्वतःच्या दृढ निश्चयावर त्यांनी आपली वाटचाल यशस्वी केली. अशाच स्वरूपाचा आदर्श आज अनेक तरुणींकडून उभा केला जात असून ही दिलासादायक बाब म्हणायला हवी.

ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय महिलांनी उल्लेखनीय यश मिळवत असल्याचं दिसून येत आहे. आजही राष्ट्रीय तसंच आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध खेळां ध्ये भारतीय महिलांची कामगिरी उत्तम राहिलेली आहे. असं असलं, तरी इच्छाशक्ती असूनही पुरेसा वाव मिळत नसणाऱ्या अनेक तरुणी समाजात आहेत. त्यांच्यासाठी संधींची कवाडं खुली व्हायला हवीत.

स्त्री ही कोणाची मैत्रीण असो, कोणाची पत्नी असो वा कोणाची बहीण; तिला आपल्या भावनिक गरजा पूर्ण करण्याचं स्वातंत्र्य असतं. त्याबाबत तिच्यावर दडपण आणणं वा विचारांपासून परावृत्त करणं उचित ठरू शकत नाही. हा संदेश व्यापक प्रमाणात लक्षात घ्यायला हवा.

# ११४ ‘राफेल’ खरेदी करार : भारतासाठी एक परिवर्तनकारी पाऊल

राष्ट्ररक्षा
हेमंत महाजन

भारत आणि फ्रान्स यांच्यातील ११४ ‘राफेल’ लढाऊ विमाने खरेदीचा करार वाटाघाटीच्या अंतिम टप्प्यात असून, यामध्ये व्यावसायिक अटी, खर्चाच्या वाटाघाटी आणि तांत्रिक तपशीलांचा समावेश असणार आहे. यामध्ये भारतात ९६ विमानांचे उत्पादन स्थानिक पातळीवर करणे आणि त्याचबरोबर तंत्रज्ञान हस्तांतरण अशा अटींचा समावेश आहे. नौदलासाठीदेखील २६ ‘राफेल’ मरीन विमानांच्या खरेदीबाबत, एप्रिल २०२५ मध्ये करार करण्यात आला होता. याची किंमत सुमारे ७.६ अब्ज डॉलर्स असून, ती विमाने २०३० पर्यंत भारतीय नौदलाच्या ताफ्यात येतील. या प्रक्रियेतील मुख्य अडथळे म्हणजे किंमतीची वाटाघाटी करणे असून, ज्याची अंदाजे किंमत ३.२५ लाख कोटी एवढी आहे. ‘मेक इन इंडिया’अंतर्गत सुमारे ५० टक्के स्वदेशी सामग्रीचा टप्प्याटप्प्याने वापर वाढवण्याची भारताची अट आणि थेट दोन सरकारमधील होणारा हा करार या व्यवहारातील गुंतागुंत वाढवतात. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या भारत दौऱ्यानंतर या विमानांच्या सहउत्पादनावरेल चर्चांमध्ये प्रगती झाली आहे; मात्र पुढच्या काही महिन्यांमध्ये हा करार नक्की आकरास येईल, याविषयी अजिबात शंका नाही.

भारतीय हवाई दलाच्या आधुनिकीकरणाच्या प्रवासात ११४ ‘राफेल’ विमानांची खरेदी हा केवळ एक संरक्षण करार नसून, तो भारताच्या जागतिक रणनीतीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभदेखील आहे.

**लष्करी आणि सामरिक परिणाम-** भारतीय हवाई दलासमोर ’स्काड्रन’ची घटती संख्या हे सध्या सर्वांत मोठे आव्हान आहे. भारतीय हवाई दलाला अधिकृतपणे ४२ स्काड्रन्सची गरज असताना, सध्या ही संख्या २९ ते ३० पर्यंत खाली आली आहे. ‘मिग-२१’ विमाने सेवेतून निवृत्त झाली असून, ‘जग्वार’, ‘मिराज-२०००’सारखी विमाने लवकरच निवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

**विमानांचे मानकीकरण:** आधीच्या ३६ ‘राफेल’ आणि आताच्या ११४ विमानांमुळे भारतीय वायूदलाच्या ताफ्यामध्ये एकसंधता निर्माण होईल. यामुळे लॉजिस्टिक आणि देखभालीचा खर्चात देखील कपात होईल.

**दीर्घ पल्ल्याचा मारा:** ‘राफेल’ची ‘मेटेऑर’ आणि ‘स्कॅल्प’ क्षेपणास्त्रे भारताला पाकिस्तान आणि चीनविरुद्ध प्रभावी सुरक्षा मिळवून देतात. भारतीय हवाई हद्दीतूनच शत्रूच्या गोटात आतमध्ये असलेल्या तळांवर अचूक हल्ला करण्याच्या भारतीय हवाई दलाच्या क्षमतेमध्ये वृद्धी होते.



**११४ राफेल लढाऊ विमानांची खरेदी ही भारताची व्यापक सामरिक भूमिका स्पष्ट करणारी पावले आहेत. हिंद-प्रशांत क्षेत्रात वाढती अस्थिरता, वास्तविक नियंत्रण रेषेवरील तणाव आणि चीनची झपाट्याने वाढणारी हवाई व नौदल क्षमता या पार्श्वभूमीवर भारताने आपली वायुदल शक्ती अधिक सक्षम करण्याचा निर्धार दर्शवला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, दीर्घ पल्ल्याची अचूक मारक क्षमता आणि अद्ययावत युद्धकौशल्यामुळे राफेल भारताच्या प्रतिरोधक क्षमतेत गुणात्मक वाढ करेल. या विमानाची वैशिष्ट्ये, करारातील अटी तसेच,चीनच्या दृष्टिकोनातून या विमानाची असलेली उपयोगिता यांचा घेतलेला आढावा...**

**भू-राजकीय आणि भारत-फ्रान्स संबंध-** फ्रान्स हा कायमच भारताचा एक विश्वासू आणि धोरणात्मक भागीदार म्हणून जागतिक मंचावर उभा राहिला आहे. अमेरिका किंवा रशियाच्या तुलनेत, फ्रान्स भारताच्या सामरिक स्वायत्ततेचा आदर करतो.

**इंडो-पॅसिफिक क्षेत्र:** या करारामुळे हिंदी महासागर क्षेत्रात भारत आणि फ्रान्सची भागीदारी मजबूत होईल. चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखण्यासाठीही हा करार एक प्रभावी पाऊल ठरेल. संरक्षण-औद्योगिक आणि तंत्रज्ञान हस्तांतरण या कराराचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे ’मेक इन इंडिया’ उपक्रमाला मिळणारी गती होय.

**स्थानिक उत्पादन:** राफेल करारातील अटींनुसार ११४ पैकी ९६ विमाने भारतात तयार केली जाणार असून, टाटा-दसॉल्ट या कंपन्यांमधील भागीदारीमुळे हैदराबादमध्ये विमानांच्या सांगाड्याचे उत्पादन आधीच सुरू झाले आहे.

**रोजगार निर्मिती:** या प्रकल्पामुळे हजारो उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगाराच्या संधी निर्माण होणार असून, भारताची एरोस्पेस पुरवठा साखळी जागतिक स्तरावर पोहोचेल.

**तंत्रज्ञान हस्तांतरण:** या करारामधून विमानाचे इंजिन तंत्रज्ञान आणि रडार सॉफ्टवेअरचे पूर्ण हस्तांतरण मिळवणे, हे भारतापुढचेस सर्वात मोठे आव्हान असेल. जर भारताला ‘सोर्स कोड’ मिळाला, तर भारताला स्वतःच्या क्षेपणास्त्रांचा वापर ‘राफेल’वर सहजपणे करता येईल.

**विमानांवर होणारा भविष्यातील खर्च:** कोणत्याही लढाऊ विमान करारामध्ये, खरेदी ही केवळ सुरुवात असते. पुढील ३०-४० वर्षांची देखभाल, शस्त्रे आणि विमानाचे आधुनिकीकरण यांचा खर्च मूळ किमतीपेक्षा पटीने जास्त असतो.

**निर्यात संधी:** जर भारत ‘राफेल’चा ‘ग्लोबल हब’ झाला, तर आशिया आणि आफ्रिकेतील देशांना ‘राफेल’चे सुटे भाग आणि सेवा निर्यात करून भारत परकीय चलन देखील कमावू शकतो.

**देशांतर्गत आणि प्रादेशिक राजकीय परिणाम-** ‘राफेल’च्या समावेशामुळे पाकिस्तान चीनकडून जे-३१ किंवा जे-१०सी विमाने खरेदी करण्याची शक्यता वाढेल. ‘राफेल’चे सर्वांत आधुनिक एफ४ स्टॅण्डर्ड जे भारत नव्या कराराद्वारे घेणार आहे आणि चीनचे पाचव्या पिढीचे जे-२० ‘माईटी ड्रॅगन’ यांच्यातील तुलना अत्यंत रंजक अशीच आहे. ही केवळ दोन विमानांची तुलना नसून, ती ‘स्टेल्थ’ विरुद्ध ‘सर्वोत्कृष्ट एव्हीऑनिक्स’ अशी लढाई आहे.

**स्टेल्थ विरुद्ध ओम्नीरोल- चीनचे जे-२०:** हे पाचव्या पिढीचे विमान असून, याचा मुख्य भर ‘स्टेल्थ’ अर्थात रडारला चकवा देण्याऱ्या तंत्रज्ञानावर आहे. याच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे शत्रूच्या रडारवर ते लवकर दिसत नाही. या विमानाची निर्मिती प्रामुख्याने हवाई क्षेत्रात वर्चस्व मिळवण्यासाठी चीनने केली आहे.

**भारताचे राफेल एफ४ :** हे ४.५ पिढीचे विमान आहे. जरी हे पूर्णपणे ’स्टेल्थ’ नसले, तरी याचा ‘रडार क्रॉस-सेक्शन’ नगण्य आहे. ‘राफेल’ हे एक ओम्नीरोल विमान असल्याने, ते एकाच मोहिमेत एकाचवेळी हल्ल्याची आणि बचावाची अशी अनेक कामे करू शकते.

**रडार आणि सेन्सर्स-** राफेल एफ४: यामध्ये RBE2 -ES- रडार आहे, जे ’राफेल’च्या एफ४ स्टॅण्डर्डमध्ये अधिक अद्ययावत झाले आहे. ‘राफेल’ची सर्वांत मोठी ताकद त्याचे स्पेक्ट्रा इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सूट. हे शत्रूचे रडार जॅम करण्यात आणि क्षेपणास्त्रांपासून संरक्षण करण्यात जगात सर्वोत्तम मानले जाते.

**जे-२०:** चीनने यामध्ये स्वदेशी बनावटीचे-ES रडार वापरले असून, कागदावर हे रडार खूप शक्तिशाली दिसत असले; तरी प्रत्यक्ष युद्धात त्याची क्षमता अजूनसिद्ध झालेली नाही.

**शस्त्रास्त्र क्षमता-** या दोन्ही विमानांची तुलना त्यांच्या क्षेपणास्त्रांशिवाय अपूर्ण आहे: वैशिष्ट्ये ‘राफेल’ एफ४ (भारत) जे-२० (चीन) BVR क्षेपणास्त्र Meteor (१५०+ किमी रेंज)- जगात सर्वोत्तम मानले जाते. PL-१५ जमिनीवर हल्ला SC-LP / H-MMER (अचूक मारा) मर्यादित

**इंजिन आणि कार्यक्षमता-** चीनला सुरुवातीला इंजिनमध्ये अडचणी आल्या होत्या; पण आता त्यांनी WS-१५ इंजिन वापरण्यास सुरुवात केली आहेत. हे विमान ‘सुपरक्रूझ’ अर्थात आवाजाहून अधिक वेगाने, कमी इंधनामध्ये उड्डाण करू शकते. ‘राफेल’चे च८८ इंजिन अत्यंत विश्वासार्ह आहे. ‘राफेल’ची ‘मॅन्युव्हरेबिलिटी’ अर्थात हवेत वेगाने वळण्याची क्षमता जे-२० पेक्षा सरस मानली जाते.

**हिमालयीन युद्धभूमी-** लडाख किंवा अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर ‘राफेल’चा एक मोठा फायदा आहे. चीनचे जे-२० तिबेटच्या उंचावरील तळांवरून पूर्ण क्षमतेने उडू शकत नाही.

**अनुभव:** भारतीय वैमानिक ‘राफेल’चा वापर प्रत्यक्ष सीमेवर सरावादरम्यान करत आहेत; तर जे-२०चा वापर अजूनही प्रामुख्याने प्रशिक्षणापुरताच मर्यादित आहे.

**महत्त्वाचा निष्कर्ष:** जर लांब पल्ल्याच्या लढाईचा विचार केला, तर ‘राफेल’चे ‘मेटेऑर’ क्षेपणास्त्र, जे-२०साठी कर्दनकाळ ठरू शकते. जरी जे-२० विमानामध्ये स्टेल्थ तंत्रज्ञान जरी असले, तरी ‘राफेल’चे प्रगत सेन्सर्स आणि SPECTR-सिस्टम त्याला शोधून पाडण्याची क्षमता ठेवतात. ‘राफेल’ एफ४ आणि चीनचे जे-२०मधील लढाईत जो शत्रूच्या रडारला आधी प्रभवित करेल, विजय त्याचाच असेल हेच खरे.

**निष्कर्ष -** भारत आणि फ्रान्समध्ये होत असलेला ’राफेल’करार सुमारे ३.२५ लाख कोटींचा असून, हा करार भारताच्या इतिहासातील सर्वांत मोठा संरक्षण करार ठरणार आहे. इतकी मोठी रक्कम खर्च केल्यामुळे नौदलाच्या पाणबुड्या किंवा लष्कराच्या इतर आधुनिकीकरण प्रकल्पांच्या निधीवर परिणाम होऊ शकतो. भविष्यात युरोपीय राजकारणात बदल झाल्यास, सुट्या भागांचा पुरवठादेखील खंडित होण्याचा धोका आहेच. यासाठीच भारताला स्वदेशी बनावटीच्या शस्त्रास्त्रांवरही भर द्यावा लागेल. ११४ ‘राफेल’ विमानांचा करार हा भारतीय हवाई दलासाठी केवळ गरज नसून, ती काळाची मागणीदेखील आहे. यामुळे केवळ आपली युद्धक्षमताच वाढणार नसून, भारत एक जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून ओळखला जाईल. मात्र, हे करताना स्वदेशी बनावटीच्या ’तेजस’ आणि ’म्का’ या प्रकल्पांकडे दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी घेणेदेखील आवश्यक आहे.

---

सुरवात्म
डॉ. अविनाश मोहरील

## तर्कटरावांची तडजोड



अमाला हे सारे विधी किंवा उपचार पटत नाहीत. माझ्या मनाला याा साऱ्या संकल्पना रुचत नाहीत. आता आपण नव्या युगात आहोत. आपले जग झपाट्याने बदलत आहे. धार्मिक संस्कारांमध्ये आताा आपण नव्या बाबी स्वीकारल्या पाहिजेत. हे जुने व पुरातन विचार आताा नव्याने मांडण्याची गरज आहे. कुणीतरी याची सुरुवात करावी लागते. काळ बदलतोय आणि या बदलत्या काळासोबत आपण जर बदललो नाही तर काही दिवसात हे सारे कालबाह्य होईल. या सर्व प्रथा परंपरांमध्ये जर काही तटस्थ आहे, असे वाटत असेल आणि काही प्रमाणात त्याची जपणूक व्हावी, असे वाटत असेल, तर या सर्व पद्धतींचे नवे स्वरूप जे सुदैवाने काही लोक जपण्याचा प्रयास करीत आहेत; त्याचा स्वीकार करायला हवा. त्याहून महत्त्वाचे म्हणजे जी गोष्ट मनाला पटत नाही, जी गोष्ट मनाला खटकते ती केवळ हट्टापोटी मी का करायची?

माझ्या विचारांचा आपल्याला सन्मान करता येत नसेल तरी निदान मला स्वतःला विचार करण्याची मुभा मिळायला हवी. या सर्व उपचारांना चांगले पर्याय माझ्याजवळ आहेत. हे पर्याय सामाजिक दृष्टीने अत्यंत उपयोगी आणि खऱ्या अर्थाने मनाला सम ाधान देणारे आहेत. मी सारेच काही सोडून देऊ, असेही म्हणत नाही. परंतु यामधील बऱ्याचा गोष्टी कमी करता येतात व ज्या व्यक्तीच्या स्मरणार्थ हे सारे आपणा करतोय, त्या व्यक्तीच्या आत्म्याला संतुष्टी लाभेल, असे सामाजिक कार्य आपल्या हातून घडेल; जी स्पृहणीय राहू शकते.

माझ्या बोलण्याचा एकदा आपल्या डोळ्यावर असलेला परंपरागत विचारांचा पडदा बाजूला करूना विचार करा. निदार विचार तर करा. जर पटलेच नाही तर नका करू, पणा आपण याबाबत विचारच करायला तयार नाही आणि भावनिका कल्लोळापोटी तेच ते पुनः पुन्हा करतोय. एका बाजूने नवा काळ, नवा विचार, नव्या पद्धती सर्वच आपण स्वीकारायला लागलो. तेथे बरोबरा हव्या त्या पद्धतीचे तर्क देऊन सोयीचे वागू लागलो. परंतु खऱ्या अर्थाने जेथे बदलांची गरज आहे व ज्या बदलांमुळे चांगल्या सामाजिक पद्धती निर्माण होऊ शकतात तर अशा ठिकाणी या विचारांचे नेतृत्व करण्यासाठी आपण कमी पडतो. अशावेळी आपली तर्कबुद्धी न वापरता आपण भावनिक होतो व त्या पोटी पुन्हा एकदा त्याच त्या गोष्टींची पुनरावृत्ती व्हायला लागते. माझे ऐका, मी म्हणतो तसा विचार करूना बघा.

आपण या सर्व प्रकारात आज करीत असलेला जरासा बदला येणाऱ्या पिढीला एक नवी दिशा देऊन जाईल. त्यांनाही या सर्व गोष्टी करण्याची इच्छा राहील अन्यथा एक पिढी उलटून गेल्यावर हे सारे बंदा होईल. मग उलटणाऱ्या पिढीने या सर्व परंपरा जोपासण्यासाठी मनाला जराशी मुरड घालावी की आता हट्टाने सारे करून घ्यायचे व पुढचे कुणी पाहिले असा विचार करायचा? त्यासाठी मी जे म्हणतो त्या संदर्भात निदान एकदा विचार करा. मी हे सारे सांगतोय याचा अर्थ मी फारा बुद्धिवान आहे किंवा आपल्या कुणापेक्षाही जास्त ज्ञानी आहे, असे नाही. मी एक नवा विचार मांडतोय. स्वीकारण्याचा प्रयत्न तर करा...अतिशय पोटतिडिकीने तर्कटराव बोलत होते. त्याचे सारे शांतपणे भावनाताईंनी ऐकून घेतले व नंतर ती त्याला म्हणाली, ‘‘तुझे मी इतके ऐकले ना? आता माझे जरासे ऐकतोस?’’ भावनाताईंनी सांगणे सुरू केले.. या साऱ्या पद्धती, उपचार काही एका दिवसात तयार झालेले नाहीत.

आपल्या धर्मामध्ये हे वर्षानुवर्षे सुरू आहे. या सर्व बाबी आमच्या पिढीने मनापासून जोपासल्या व त्याबद्दल कधी प्रश्न विचारला नाही. तो सारा आमच्या अंगवळणी पडलेला भाग आहे. आता आमची उलटणारी पिढी आहे असे तूच म्हणतोस. मग उलटणाऱ्या या आमच्या पिढीकडून आमच्या रक्तामध्ये असलेल्या मानसिकतेला बदलविण्याचा जो आग्रह तू धरतोय तो कितपत योग्य आहे? आमची अशी मान्यता आहे की, परंपरागत पद्धतीने अनेक वर्षांपासून ज्या गोष्टी आपला समाज पाळता आलाय त्यात काहीतरी तथ्य आहे म्हणूनच तर ते इतकी वर्षे टिकले वा अजूनही टिकते आहे. या सर्व व्यवस्था समाजानेच निर्माण केल्यात व त्या समाजच पाळतो आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे तू या प्रक्रियेत सहभागी झाल्याने जर उलटणाऱ्या पिढीच्या काही ज्येष्ठ लोकांना बरे वाटत असेल, त्यांना समाधान लाभत असेल व त्यांच्या दृष्टीने ती एक अत्यंत चांगली बाब होत असेल तर मग तुला त्यात सहभागी होण्यास काय अडचण आहे?

आपल्या ज्येष्ठांसाठी, त्यांच्या मनाला बरे वाटावे म्हणून व त्यांची इच्छा आहे म्हणून केवळ त्यांच्या समाधानास्तव तुझ्या विचारांना मुरडा घातलीस तर कोणते मोठे आकाश कोसळणार आहे? आपल्या परिवारातील वयोवृद्ध लोकांसाठी इतकेही जर करता येत नसेल तर मगा काय अर्थ आहे? समजून घ्यायचेच नाही असे ठरवल्यावर पुढे काया बोलायचे...? भावनाताईंचा विळखा पडतोय हे तर्कटरावांच्या लक्षात आले, परंतु सर्व ऐकून घ्यायचे होते. त्यामुळे ते चूप बसले. भावनाताईंचे पुढचे आवाहन सुरू झाले...

समज बदल करायचा हा हेका सुरू ठेवलास आणि जर या परंपरागत पद्धतीमध्ये तू सम्मिलित झाला नाहीस तर काय परिणाम होतील, याची कल्पना केली आहेस? पहिले तर या एका वेगळ्या निर्णयामुळे तू एकाच वेळी अनेकांची मने दुखावणार आहेस. ती देखीला ज्येष्ठांची; ज्यांचे फार थोडे आयुष्य राहिले आहे. त्यासोबतच जेव्हा जेव्हा अशा प्रकारचा विषय निघेल तेव्हा तेव्हा तू कशाप्रकारे असंवेदनशीलता दाखविलीस, याचा उल्लेख होईल. मने जपली पाहिजेत हे सांगणारा तू स्वतःच ज्येष्ठांची मने जपण्यात कमी पडलास हे वारंवार सांगितले जाईल... विळख्याचा शेवटचा बंध आता बांधला जाणार, याची तर्कटरावांना कल्पना आली... सर्वात महत्त्वाचे म्हणजे आम्ही कुणीही आयुष्यभर तुला माफ करू शकणार नाही. त्यामुळे तू विचार कर. परंतु मी सांगितल्या प्रमाणे विचार केलास तर फायद्यात राहशील अन्यथा मोठा तोटा आहे...

भावनाताईंचा विळखा शेवटी एक गर्भित धमकी देऊन गेला. सारे ऐकल्यावर तर्कटराव एवढेच बोलू शकले,‘‘ठीक आहे, तू म्हणतेस ते मान्य..’ तर्कटराव व भावनाताई यांचे हे असले संवाद कायम सुरू राहतात. कुणाचे बरोबर कुणाचे चूक यासंदर्भात तर्क-वितर्क होत राहतात. जगरहाटी सुरू राहते. भावनाताईंच्या भावनिक आवाहनामुळे शांता बसलेल्या तर्कटरावांना अचानक त्यांच्या वाचनातील काही संदर्भ आठवले.

नवी वाट चोखंदळायची असेल, नवे काही निर्माण करायचे असेल किंवा नवे पायंडे पाडायचे असतील तर बरेच वेळा अप्रिय निर्णय घ्यावे लागतात. त्याकरिता जवळच्या लोकांनाही दुखवावे लागते. अशा वेळी भावनिकतेच्या आधारे चारही बाजूने अडवणूक होते. (पान ६ वर)

---

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर

## व्रतबंध- २




व्रतबंध हा संस्कार आयुष्याला कलाटणी देणारा आहे. विद्याग्रहण करून शहाणं होण्याचा प्रवास इथून सुरू होतो. भारतीय विचारवंतांनी मानवी आयुष्याची चार भागात विभागणी केली आहे. त्याला आश्रम असं संबोधन आहे. या आयुष्याच्या चार अवस्था आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम. पौगंडावस्था आणि तारुण्याच्या सुरुवातीचा काळ हा उत्साह, ऊर्जा आणि उल्हासानं सळसळणारा असतो. त्यावेळी शारीरिक श्रम, कष्ट, सायास करण्याला कुठेही धरबंध नसतो. शिवाय शरीरात स्रवणारे संप्रेरक स्राव सतत मानसिक चक्रवात निर्माण करणारे असतात. वयानुसार हे स्राव स्रवणं हे अटळ, अपरिहार्य आणि क्रमप्राप्तच असतं. त्यामुळे त्यांचे परिणाम हे इंद्रिय निग्रह आणि संयम या दोनच उपायांनी दूर करता येतात. या सगळ्याचा विचार करून व्रतबंध या संस्काराची योजना केली आहे. त्यात सर्वात मोठा विधी आहे तो बटूला दीक्षित करण्याचा.

दक्षिण भारतात त्याला ब्रह्मोपदेश म्हणतात. ब्रह्म म्हणजे काय या प्रश्नाचं उत्तर शोधण्याची जिज्ञासा मनात ठेवून त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्याच्या व्रताचं बंधन स्वीकारलं जातं तो व्रतबंध संस्कार. ब्रह्म काय आहे? या प्रश्नातच विद्याभ्यासाचं सगळं मर्म समाहित आहे. ब्रह्म हेच सत्य आहे आणि त्याचाच शोध घ्यायचा आहे. एकदा का हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवलं की बाकी सगळे प्रश्नच अतिशय सपक, उथळ, वरवरचे आणि निरर्थक वाटू लागतात. या प्रश्नाच्या उत्तराकडे जाण्याचा मार्ग गुरूंच्या मार्गदर्शनात आणि आशीर्वादानं सुकर व्हावा म्हणून काया-वाचा-मनात तेजाचं स्फुल्लिंग प्रकाशित व्हायला हवं. म्हणून ही मंत्रदीक्षा पित्याकडून दिली जाते. विद्यारंभ आईच्या मांडीवर आणि ब्रह्मोपदेश मंत्रदीक्षा वडिलांच्या मांडीवर हा अतिशय संतुलित मेळ यात घालण्यात आलेला आहे. जी वृत्ती म्हणजे उपजीविका भविष्यात अनुसरणार आहे, त्याप्रमाणे वर्ण निवडण्याचं स्वातंत्र्य बालकाला होतं, असा एक दाखला वैदिक साहित्यात आहे. प्रतापी नावाच्या राजाला तीन पुत्र होते. देवापि, बाल्हिक आणि शंतनू. त्यापैकी देवापिनं ब्राह्मण वर्ण निवडला आणि इतर दोघांनी क्षत्रिय. त्यानुसार त्यांनी शिक्षण घेतलं. देवापि पुरोहित झालेत आणि बाल्हिक शंतनू राजन्य (क्षत्रिय). कालांतरानं मात्र या चारही वर्णात अनुवांशिकता/वंश परंपरा हाच मुख्य कळीचा बिंदू ठरला. तर, व्रतबंध विधीत वर्णाप्रमाणे काही वेगळेपण जोपासण्यात आलं आहे. जसं मागच्या लेखात मेखला भेद सांगितला आहे तसंच ब्राह्मण वर्णाच्या बटूसाठी ‘गायत्री’ छंदात निबद्ध असा सवितृ गायत्री मंत्र आहे तर क्षत्रिय वर्णाच्या बटूला ‘त्रिष्टुभ’ छंदातला आणि वैश्य वर्णाच्या बटूला ‘जगती’ छंदातला विशिष्ट मंत्र देण्याचं विधान आहे.

ऋग्वेदात १५ प्रमुख छंद आहेत. छंदात अक्षरांची संख्या सर्वाधिक महत्त्वाची असते. गायत्री छंदात ८ अक्षरांच्या ३ ओळी अशी एकूण २४ अक्षरं असतात. एक अक्षर उणं (२३ च अक्षरं) असल्यास त्या छंदाला निच्यृत् गायत्री म्हणतात तर त्रिष्टुभ हा ४४ अक्षरांचा छंद असून यात चार चरणांत प्रत्येकी ११ अक्षरं असतात. जगती छंदात प्रत्येकी १२ अक्षरांचे चार चरण असतात. यात प्रत्येक वर्णाला एक असा छंद देता येण्याइतके विकल्प उपलब्ध आहेत, हा बिंदू महत्त्वाचा आहे. जिज्ञासूंनी स्वाध्याय करावा. त्याशिवाय या तीनही वर्णांच्या बटूंचे दंड वेगवेगळे असतात.

दंड हे प्राचीन कालापासूनच एक अत्यंत उपयुक्त असं उपकरण आहे. वयाच्या आठव्या वर्षीपासून तो हाताळता यायलाच हवा. हातातला ताठ दंड हे मेरूदंडाचं प्रतीक आहे. ब्राह्मण बटूच्या केसांपर्यंत उंचीचा दंड पळस किंवा बिल्व वृक्षाचा असावा. क्षत्रिय बटूच्या कपाळापर्यंत उंचीचा दंड पिंपळ किंवा खैर हवा तर वैश्य बटूच्या नाकाच्या शेंड्याइतक्या उंचीचा दंड औदुंबर किंवा रुईच्या झाडाचा सांगितलेला आहे. दंडधाऱ्यानं करायचा ‘दंडवत’ प्रणाम हाच दंड भूमीवर आडवा ठेवून त्याला समांतर असा करायचा असतो. भिक्षा मागत असतानाही ब्राह्मणानं ‘ॐ भवती भिक्षां देहि’ तर क्षत्रिय बटूनं ‘ॐ भिक्षांभवती देहि’ आणि वैश्य बटूनं ‘ॐ भिक्षांदेहिभवती’ असा घोष करावा. ज्या घराच्या अंगणात रांगोळी घातली आहे अशाच घरात भिक्षा मागायची हा नियम आहे. ज्या अंगणात रांगोळी नाही त्या घरी वृद्धी किंवा सुतक आहे, असं गृहीत धरण्यात येतं. अशा घरी भिक्षा न मागण्याचा नियम आहे. यातला ‘भवती’ हा शब्द जिच्याकडे भिक्षा मागायची त्या महिलेसाठीचं आदरार्थी संबोधन आहे. हा घोष ऐकू आला की, गृहिणीनं हातात असलेली सगळी कामं बाजूला सारून, बटूच्या झोळीत भिक्षा घालावी. ब्रह्मचर्याश्रमात पैसे कमावणं निषिद्ध आहे. विद्यार्थ्यानं पाच घरी भिक्षा मागूनच आपलं पोट भरावं, असा नियम आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना जेऊ-खाऊ घालणं हे गृहिणीचं कर्तव्यच आहे. अशा भिक्षा मागण्याला मराठीत ‘माधुकरी’ म्हणतात. मधुकर म्हणजे मधमाशी जसं वेगवेगळ्या फुलांतून त्यांना न दुखावता मध गोळा करते त्याप्रमाणे गोळा केलेली भिक्षा. या प्रथेतून विद्यार्थ्यांना तीन गुण शिकवण्यात येतात- निरहंकार, लोकव्यवहार आणि परिस्थितीशी जुळवून घेणे. यात भेदाभेद आहे हे निश्चित, पण ते वर्णाचं वैशिष्ट्य आणि वेगळेपण दर्शवून देण्यासाठी. ही वर्ण विभागणी गुरुकुलातील विद्यार्थ्यांचा वृत्तिनिष्ठ अभ्यासक्रम काय असेल, हे स्पष्ट करण्यासाठी होत असे. या संपूर्ण विधीत ज्या अग्निदेवतेचं आवाहन करण्यात येतं त्याचं नाव समुद्भव अग्नी. ‘समुद्भव’चा मुख्य अर्थ आहे उत्पत्ती, जन्म, उद्गम, पुनरुद्धार किंवा पुनरुज्जीवन. व्रतबंध संस्कारात एक विद्वान, व्युत्पन्न, प्रशिक्षित, कर्तृत्ववान व्यक्ती उत्पन्न होण्याची प्रक्रिया सुरू होते. म्हणून उपनयन झालेल्या बालकाला द्विज म्हणजे दुसऱ्यांदा जन्म झालेला असं म्हणतात. असा हा उत्तमाचा ध्यास घेण्याचं व्रत घेणारा संस्कार.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे



**हवामान बदल हा केवळ तापमानवाढीचा प्रश्न नाही, तर ती परिसंस्थांच्या सहनशक्तीची कसोटी आहे. जंगलांसाठी हा निर्णायक टप्पा आहे. प्रश्न असा आहे की, जंगलांमध्ये आधीपासून असलेले घटक, प्रजातींची विविधता आणि जैविक रचना या सर्वांचा एकत्रित परिणाम हवामान बदलाच्या वास्तवाला तोंड देण्यासाठी पुरेसा ठरेल का? याबाबत मानवाची भूमिका काय असायला**

# जंगलांच्या सहनशक्तीची कसोटी

'ग्लोबल चेंज बायॉलॉजी'मध्ये अलिकडे एक संशोधन प्रसिद्ध झाले. हवामान बदलाच्या झपाट्याने बदलणाऱ्या वास्तवाला सामोरे जाण्यास जंगलातील गुणधर्म, प्रजातींची विविधता, जैविक रचना पुरेशी आहे का, या प्रश्नाचा सखोल अभ्यास हे संशोधन करते. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, 'सांता बार्बारा' आणि युनिव्हर्सिटी ऑफ उताहमधील संशोधकांनी वन परिसंस्थेतील जैविक गुणधर्म, पानांची रचना, झायलमचे कार्य, जलवाहिन्यांची क्षमता आणि प्रजातींची रचना यांचा अभ्यास केला. हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर जंगलांची प्रतिक्रिया समजून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा केलेल्या अभ्यासातून दिसून आले की, बहुसंख्य जंगलांमध्ये उष्ण आणि कोरड्या परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता काही प्रमाणात आहे. झाडे त्यांच्या पानांच्या आकारात, घनतेत आणि रंध्रांच्या कार्यात बदल करू शकतात. वाढलेल्या कार्बन डाय ऑक्साईडच्या पृष्ठभूमीवर काही झाडे कमी पाणी गमावत प्रकाश संश्लेषण करू शकतात.

परिसंस्थेत आधीपासून अस्तित्वात असलेल्या दुष्काळ-सहनशील प्रजाती अधिक प्रभावी होऊ शकतात. अमेरिकेतील जवळपास ८८ टक्के जंगलांमध्ये अशा प्रकारची रचनात्मक आणि प्रजातीआधारित विविधता आढळते. ती पोषक आहे. याचा अर्थ असा की, निसर्ग पूर्णपणे असहाय नाही. जितकी विविधता अधिक, तितकी बदल सहन करण्याची शक्यता जास्त; पण येथेच सर्वात मोठी चिंता उभी राहते. जंगले बदलत आहेत; पण हवामान ज्या वेगाने बदलत आहे, त्या वेगाशी जंगलांची जैविक प्रतिक्रिया जुळत नाही. हा एक महत्त्वाचा प्रश्न बनतो आहे. त्याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे. उत्क्रांती हा दीर्घकालीन आणि संथ प्रक्रियेचा भाग आहे. शेकडो वर्षे जगणाऱ्या वृक्षांसाठी पुढील काही दशकांमध्ये होणारे हवामान बदल अत्यंत वेगवान असणार आहेत. दुष्काळाची तीव्रता वाढत असताना, पाण्याच्या कमतरतेमुळे निर्माण होणारा ताण झाडांच्या मृत्युदरात वाढ करू शकतो. काही प्रजाती नष्ट होऊ शकतात आणि त्या जागी अधिक कडीण, कोरड्या हवामानाशी सुसंगत प्रजाती येऊ शकतात.

आज वने मानवनिर्मित कार्बन उत्सर्जनापैकी सुमारे ३० टक्के कार्बन शोषून घेतात. जंगलांची संरचना बदलली आणि त्यांची वाढ आणि स्थैर्य कमी झाले, तर ही क्षमता घटू शकते. म्हणजेच हवामान बदलामुळे जंगलांची कार्बन शोषण क्षमता कमी होईल आणि त्यामुळे हवामान बदल आणखी वेगाने वाढेल. हे एक दुष्टचक्र आहे. दुसरीकडे युनिव्हर्सिटी ऑफ क्विन्सलँडच्या संशोधनानुसार उष्ण कटिबंधीय वर्षावनांपैकी सुमारे २५ टक्केच उच्च-गुणवत्तेची, घनदाट आणि कमी मानवी हस्तक्षेप असलेली वने उरली आहेत. हा निष्कर्ष 'प्रोसेडिंग ऑफ दि नॅशनल अॅकेडमी ऑफ सायन्स'मध्ये प्रसिद्ध झाला आहे. म्हणजेच केवळ जंगलांचे क्षेत्र टिकून आहे म्हणून समाधान मानता येणार नाही. त्यांची रचनात्मक गुणवत्ता आणि अखंडता अधिक महत्त्वाची आहे. संकटग्रस्त प्रजातींसाठी आवश्यक असलेले घनदाट अधिवास झपाट्याने कमी होत आहेत.

जंगलांमध्ये काही प्रमाणात स्वाभाविक अनुकूलनशक्ती आहे, हे नाकारता येत नाही; पण ती पुरेशी ठरेल का? उत्तर सरळ 'हो' किंवा 'नाही' असे नाही. मानवनिर्मित दबाव, जंगलतोड, अधिवास विखंडन, प्रदूषण यात कपात झाली आणि हवामान बदलावर तातडीने नियंत्रण ठेवले गेले, तर जंगलांची अंतर्गत जैविक शक्ती त्यांना वाचवू शकते; पण सध्याची गती कायम राहिल्यास जंगलांची अनुकूलन क्षमता अपुरी पडू शकते, म्हणूनच धोरणात्मक पातळीवर काही मूलभूत बदल आवश्यक आहेत. दुष्काळ सहन करू शकणाऱ्या स्थानिक प्रजातींना प्राधान्य देणारी लागवड अधिवासांची अखंडता जपणे, मानवनिर्मित व्यत्यय कमी करणे, हरितगृह वायू उत्सर्जनात लक्षणीय घट आदी उपाय योजायला हवेत. जंगलांमध्ये हवामान बदलाशी जुळवून घेण्याची बीजे नक्कीच आहेत; पण त्या बीजांना वाढण्यासाठी योग्य पर्यावरण, वेळ आणि संरक्षणाची आवश्यकता आहे. अन्यथा, ही क्षमता केवळ संभाव्यता राहील, प्रत्यक्ष संरक्षण नव्हे. जंगलांचे भविष्य त्यांच्या अंतर्गत गुणधर्मांवर जितके अवलंबून आहे, तितकेच आपल्या राजकीय इच्छाशक्तीवर आणि सामूहिक कृतीवर अवलंबून आहे. प्रश्न जंगलांच्या क्षमतेचा नाही; प्रश्न आपण त्या क्षमतेला साथ देतो का याचा आहे.

जगभरातील जंगलांसाठी कठीण काळ येऊ घातला आहे. हवामान बदलामुळे संपूर्ण जगात तापमान वाढत आहे आणि आर्द्रतेची पातळी घटत आहे. दुष्काळाचा जंगलांवर होणारा परिणाम समजून घेण्यासाठी संशोधकांनी वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञांनी संकलित केलेली आकडेवारी गणितीय मॉडेलशी जोडली. अभ्यासाच्या निष्कर्षांनुसार बहुतेक जंगलांमध्ये उष्ण आणि कोरड्या परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता आहे; पण या तणावापासून बचाव करण्यासाठी ते पुरेशा वेगाने बदलत नाहीत. हवामान बदलामुळे वाढणाऱ्या पाण्याच्या कमतरतेच्या तणावापासून बचाव करण्यासाठी जंगल पुरेशा वेगाने बदलत नसल्याचे पाहून संशोधक चिंतित झाले. जगातील बहुतेक जंगलांमध्ये प्रजातींच्या संरचनेतील बदलांच्या माध्यमातून दुष्काळ सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची भिन्नता आढळते. प्रत्येक झाड आपल्या क्रियाकलापांमध्ये, शरीरक्रियेमध्ये आणि जनुक अभिव्यक्तीत नव्या परिस्थितीनुसार बदल करू शकते. अमेरिकेतील वनस्थितीच्या डेटाबेसमध्ये झाडांचे स्थान, प्रजाती, आकार, घनता आणि आरोग्य तसेच त्यांची वाढ, मृत्युदर आणि तोड यांची नोंद असलेली वन यादी समाविष्ट आहे. संशोधकांनी 'झायलम फंक्शनल ट्रेट्स' डेटाबेसमधील आकडेही वापरले. त्यात झाडांच्या शरीरक्रिया आणि जलवाहिनीसंबंधी गुणधर्मांचे मोजमाप संकलित केले जाते आणि हा डेटाबेस 'फॉरेस्ट इन्व्हेंटरी'शी जोडला जातो. पाण्याच्या वाढत्या कमतरतेच्या तणावाला जंगल कसे प्रतिसाद देतात, याचे अनुकरण करणारे एक मॉडेल टीमने विकसित केले. हे मॉडेल प्रकाश संश्लेषणाबरोबरच वनस्पतीवरील तणावाचे भाकीत करते. पानांमधील बदल पर्यावरणीय परिस्थितींमधील बदलांमुळे निर्माण होणारा तणाव कसा भरून काढू शकतो, हे पाहण्यासाठी त्यांनी एक अनुकूलन तंत्रही समाविष्ट केले.

अभ्यासानुसार आतापर्यंतच्या सर्व आकडेवारीवरून असे दिसते की, पाण्याअभावी तणाव व्यवस्थापित करण्यासाठी प्रत्येक झाडासाठी पान हे सर्वात मोठे साधन आहे. कोरड्या प्रदेशांमध्ये झाडांची पाने कातरदार किंवा कमी असतात, तर ओलसर प्रदेशांमध्ये झाडे दाट पाने धारण करू शकतात. संशोधकांना आढळले की, जगभरात अनेक जंगलांमध्ये अनुकूलनाची क्षमता आहे. मॉडेलनुसार अमेरिकेतील ८८ टक्के जंगलांमध्ये हवामान बदलाशी जुळवून घेण्यास मदत करणारे गुणधर्म आणि प्रजातिवैविध्य आहे. तथापि, बहुतेक झाडे मॉडेलने भाकीत केलेल्या वेगाने जुळवून घेत नाहीत. त्यामुळे त्यांचे नष्ट होण्याचे प्रमाण जास्त आहे. वनस्पती ज्या रंध्रांद्वारे कार्बन डाय ऑक्साईड घेतात, त्याच रंध्रांद्वारे पाणी गमावतात. त्यामुळे वातावरणात अधिक कार्बन डाय ऑक्साईड असल्यास वनस्पती या रंध्रांचा आकार कमी करूनही प्रकाश संश्लेषणासाठी आवश्यक कार्बन मिळवू शकतात. यामुळे पानांतून बाहेर जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होते. संशोधकांच्या मते उष्ण हवामानात वातावरण अधिक कोरडे असते. त्यामुळे पाने अधिक पाणी गमावतात. ही अनिश्चितता आणि परस्परभरपाई करणाऱ्या घटकांनी युक्त अशी गुंतागुंतीची प्रणाली आहे. त्याचे निराकरण करण्यासाठी सूक्ष्म मॉडेलची गरज आहे. जंगले आधीच बदलू लागली आहेत. वातावरण अधिक कोरडे होत जाईल, तशी दाट जंगले कमी होतील. जंगलांमध्ये ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात असलेल्या प्रजातींचे वेगळे मिश्रण आढळू शकते. हे सर्व घटक वन कार्बन साठ्यावरही परिणाम करतात. एका नव्या संशोधनानुसार जगभरातील उष्णकटिबंधीय वर्षावनांपैकी एक चतुर्थांशाहूनही कमी जंगलांमध्ये हजारो संकटग्रस्त प्रजाती विलुप्त होण्याच्या उंबरठ्यावर आहेत.

(पान ६ वर)


## भिजून जाऊ जरा...



होळीच्या रंगां ध्ये रंगुनी भिजून जाऊ जरा
पळस फुलांच्या रानामध्ये हरवून जाऊ जरा
तुझ्याच गावी मीच साजणे स्वप्नामध्ये जातो
गालावरती तुझ्याच कैसा गुलाल हा लावतो
कृष्ण तुझा अन् राधिका तू होशील का जरा..
पळस फुलांच्या...१
अबोल भाषा रंग सारे वाटत असते प्रे अवघे
हिरवा, निळा, भगवा हे तर ऐक्य असते येथे अवघे
रंग शिकवीत असते माणुसकीचा हा मंत्र जरा
पळस फुलांच्या...२
आठवणींच्या पारावरती रंगपंचमी आपण खेळू
दोन घडीच्या आयुष्याची अंगण पंगत ही खेळू
सुख-दुःखाच्या हिंदोळ्यावर गाणी म्हणूया जरा
पळस फुलांच्या...३

विष्णू सोळंके

## रंग



हिरवा, पिवळा, भगवा, निळा
लाल, गुलाबी, पांढरा, काळा..
एरव्ही, विविध जाती धर्मात,
माणसाने, वाटून घेतलेले
निसर्गदत्त हे 'रंग' रंगपंचमीला, धुळवडीला
सहर्ष मिसळून जातात
एकमेकात दरवर्षी, आनंदाने...
निसर्गनिर्मित, निर्जीव रंगांचा,
हा संदेश म्हणजे बुद्धिवान,
अन् मेंदू असलेल्या सजीव माणसाच्या
कानशिलात, सणसणीत चपराकच,
म्हणावी लागेल..

दादाराव अवचार

## जगावं कधीतरी असंही...

मनसोक्त अधोगामी प्रवास करत...
उंच उंच कड्यावरून कोसळणाऱ्या...
सुंदर, दुधाळ, विशाल धबधब्या सारखं...
निळ्या, सावळ्या आकाशाचं पांघरूण ओढून,
गोड, गुलाबी धुक्यात विहरत, प्रसन्नतेचे, आनंदाचे
तुषार उधळत, निसर्गाने सहज बहाल केलेल्या,
मनोहर सौंदर्याची उधळण करत,
सारं सारं बाजूला सारत, स्वतःला संपूर्ण झोकून देत,
सहवासातल्याला मंत्रमुग्ध करत,
आपल्याच मूळ रुपात विलीन होण्यासाठी...
नि पुढे शांतपणे प्रवाहित होण्यासाठी...
जगावं कधीतरी असंही.......
मनसाक्त अधोगामी प्रवास करत...

धनश्री धारकर

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# महातपस्विनी पार्वती



ब्रह्मा-विष्णू-महेशाचे सगळीकडे कोडकौतुक होते. साहजिकच आहे. ब्रह्मा सृष्टिनिर्माता, विष्णू संरक्षणकर्ता आणि महेश म्हणजे संहारकर्ता. त्रिदेवांसमोर आपोआप हात जोडले जातात, पण त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती या तीन शक्तींना मात्र आपण सहज विसरतो. खरे तर विश्वाचे सूत्र एकच आहे. कोणी या सूत्राला 'पुरुषप्रकृती' किंवा 'शिवशक्ती' म्हणतात तर कोणी 'ब्रह्ममाया' संबोधतात. जिथे शिव आहे तेथे शक्ती आहेच. जेथे ब्रह्म आहे तेथे माया अस्तित्वात आहेच. या पूर्णसूत्रामुळेच विश्वाची निर्मिती झाली आहे. महेश पार्वतीशिवाय अपूर्ण आहे. त्यामुळे 'महेश' तत्त्वाला प्रणाम करताना पार्वतीचेही स्वाभाविक स्मरण व्हायला हवेच. पार्वतीची अनेक रूपे आहेत. सगळीच रूपे मनोहारी आहेत.

शिवपार्वतीची वैवाहिक किंवा कल्याणसुंदर जोडी अतिशय सुमंगल आहे. कन्यादान किंवा पाणिग्रहण होतानाचे शिवपार्वतीचे रूप लोभस आहे. प्रणयोत्सुक दाम्पत्याची उमा- महेश्वर किंवा उमा-लिंगन जोडी बघत राहावीशी वाटते. द्यूतक्रीडा खेळतेवेळी रममाण झालेल्या शंकर-पार्वतीवरून आपली नजर हटत नाही. कार्तिकेय किंवा गणपतीची माता म्हणून असलेले पार्वतीचे मातृरूप मनाला तृप्त करते. पण सर्वात वेगळे आणि विलक्षण असणारे पार्वतीचे रूप म्हणजे तिचे तपश्चर्या करणारे उग्र रूप. तिच्या या रूपात तिची देहबोली विलक्षण खुलून येते. कोणत्या परिस्थितीत तिने तपश्चर्या केली हा सुद्धा अभ्यासाचा विषय आहे. पार्वतीच्या तपस्विनी रूपाचे दोन भाग पडतात. एक लग्नाच्या अगोदरचा आणि दुसरा लग्नानंतरचा. सर्वच पुराणांमध्ये थोड्या फार फरकाने पार्वतीचे हे विवाहापूर्वीचे आणि विवाहानंतरचे तपस्विनी स्वरूप अतिशय परिणामकारक वर्णन केले गेले आहे. पार्वती तिच्या अगोदरच्या जन्मात 'दाक्षायणी' आहे. कारण प्रजापती दक्षाच्या पोटी तिचा जन्म झालेला आहे. दक्ष प्रजापती आणि त्याचा जावई शिवाचे संबंध फारसे चांगले नव्हते. एकदा दक्षाच्या राजदरबारात यज्ञ करतेवेळी या दाक्षायणीला किंवा सतीला शिवावरून अपमानित करण्यात आले. शिवाने तिला अगोदरच सांगितले होते की, माहेरी जाऊ नको म्हणून. तरी ती वडिलांच्या प्रेमापोटी गेली. पण शिवाचा झालेला अपमान तिला सहन झाला नाही. तिने यज्ञकुंडातच उडी मारली. शिवाला कळल्यानंतर त्याने वीरभद्रसमवेत सैन्य पाठवले आणि दक्ष प्रजापतीचा शिरच्छेद केला. सतीने पुढचा जन्म घेण्यासाठी हिमालय आणि त्याची पत्नी मेनकेला माता-पिता म्हणून निवडले. यालाही एक कारण होते. कालिका पुराणानुसार शिव आणि सती हिमालयात राहात असताना हिमालयाच्या पत्नीने, मेनकेने तिची खूप काळजी घेतली. मेनकेनेसुद्धा महामाया योगनिद्रेची तपस्या केली. २७ वर्षे ती निद्रितावस्थेत राहिली. महामाया योगनिद्रेने प्रसन्न होऊन तिला १०० पुत्र आणि एक कन्या दिली. हीच ती पुनर्जन्म घेतलेली सती आणि आपली पार्वती. नारद मुनींनी सतीला अगोदरच ओळखले होते आणि पार्वती शिवपत्नी होणार ही भविष्यवाणी केली होती. पार्वतीने शिवाच्या प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या सुरू केली. तिच्या आईने, मेनकेने या घोर तपश्चर्येला विरोध केला. 'उ मा...' म्हणजे, 'हे मुली, असं करू नकोस!' तेव्हापासून तिचे नाव उमा पडले. पार्वतीची घनघोर तपश्चर्या सुरू होती. पण एक नवीनच प्रश्न निर्माण झाला होता. तारकासुर नावाच्या राक्षसाने सर्वांना सळो की पळो करून सोडले होते आणि शिवाचा पुत्रच त्याचा संहार करू शकेल, तशी भविष्यवाणी होती. शिव मात्र सतीच्या जाण्याने विरक्त झाला होता आणि पूर्णवेळ योगसाधना करीत होता. शिवाकडून पुत्र पाहिजे असेल तर त्याचे मन विचलित केले पाहिजे. यासाठी सर्व देवांनी कामदेवाला शिवाकडे जायला सांगितले. कामदेव पत्नी रती आणि मित्र वसंताबरोबर शिवाचे मन विचलित करायला गेला. शिवाने डोळे उघडले; मात्र आणि सर्व देव त्याच्याकडे अक्षरशः धावून गेले. तारकासुराचा वध करायचा असेल तर शिवाने पुत्राला जन्म द्यायलाच पाहिजे आणि पार्वती कशी शिवप्राप्तीसाठी तपश्चर्या करते आहे, हे सुद्धा सांगण्यात आले. शिवाने आधी सप्तर्षींना पाठवून आणि नंतर स्वतः ब्रह्मचर्याचे सोंग घेऊन पार्वतीचा तपोभंग करण्याचा प्रयत्न केला. पण पार्वती तिच्या तपश्चर्येपासून ढळली नाही. तिच्या मैत्रिणीने- सोमप्रभेने तिच्या तपश्चर्येचा हेतू शंकराला सांगितला. तिचा निग्रह बघून भगवान शंकर प्रसन्न झाले आणि त्यांच्या विवाहानंतर कार्तिकेयाचा जन्म झाला. पार्वती जन्मतः सावळ्या कांतीची होती. एकदा विवाहानंतर शिवाच्या आलिंगनात असताना, शिवाने गमतीने म्हटले की, ''असं वाटत आहे की एका सापाने चंदनाच्या झाडाला कवटाळले आहे.'' पार्वती दुखावली. लग्नाअगोदर एवढी अघोरी तपश्चर्या केली आणि लग्नानंतर हे टोमणे सहन करावे लागत आहेत! त्यापेक्षा पतीचे घर सोडून गेलेलेच बरे! पार्वतीने गौरवर्ण प्राप्त करण्यासाठी पुन्हा घोर तपश्चर्या सुरू केली. भारतीय मानसिकतेत गौरवर्णाचे महत्त्व, असे अनादिकाळापासून आहे. आता पार्वती एक विवाहित स्त्री होती. जाण्यापूर्वी तिने तिच्या अनुपस्थितीत 'विरक' नावाच्या गणाला शिवावर नजर ठेवायला सांगितले आणि स्वतः जाडेभरडे वल्कले घालून, गवताचा कंबरपट्टा लेवून आणि वन्याहार घेत जटाधारी पार्वतीने अघोरी तपश्चर्या सुरू केली. उन्हाळ्यात ती स्वतःला आगीने वेढून घेत असे. या पंचाग्नी साधनेबरोबरच पावसाळ्यात ती एका पायावर पाण्यात उभी राहत असे. ही 'जलोसीता' साधनासुद्धा महाकठीण होती. पार्वती घोर तपश्चर्येत असताना 'आदि' नावाच्या राक्षसाने पार्वतीचे रूप घेतले, पण प्रणयक्रीडेमध्ये शिवाने ओळखले की, ही पार्वती नाही आणि आदिचा वध केला. पार्वतीला मात्र एक स्त्री शिवाच्या गुहेत गेलेली आहे, अशीच अर्धवट बातमी मिळाली. ही बातमी ऐकून पार्वतीच्या शरीरातून एक खवळलेला उग्र सिंह बाहेर पडला. तिची अशी उग्र तपश्चर्या बघून ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि ती 'गौरी' झाली. तिच्या शरीरातून तेव्हाच निशा किंवा योगनिद्रा बाहेर पडली. त्या नीलकांतेला 'कौशिकी' असेही म्हणतात. तिने पिवळे वस्त्र लेवून हाती घंटा घेतली होती. याच विंध्याचलवासिनीने पुढे शुंभ आणि निशुंभ राक्षसांचा वध केला. विवाहानंतर दोघांमधील भांडणामुळे पार्वतीने उग्र तपश्चर्या केली, पण दुसऱ्या वेळेस तर तसे कारण नव्हते. प्रणयक्रीडेमध्ये पार्वतीने खट्याळपणे शंकराचे तीनही डोळे तिच्या हाताने बंद केले. तिला काय माहीत की, सबंध विश्वावरच त्यामुळे काळोख दाटून येणार आहे. सगळीकडे हाहाकार उडाला. शिवाला पार्वतीचा प्रचंड राग आला. ती आता त्याची अर्धांगिनी होती. जगन्माता होती. अवखळ पोर नव्हती. प्रायश्चित्त म्हणून कांचीपुरीला कंपा नदीजवळ तिने वाळूचे लिंग तयार केले. अंगाला राख लावून पावसापाण्याची पर्वा न करता तिने उग्र तपश्चर्या आरंभली. एक गमतीची गोष्ट म्हणजे पार्वतीची तपश्चर्या कितीही अघोरी असो, पण लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर तपश्चर्या करीत असताना ती कायम मैत्रिणींच्या गराड्यात राहिली. स्कंदपुराणात तपश्चर्येच्या वेळेला तिच्याबरोबर असणाऱ्या सख्यांची १३ नावे आहेत तर पद्मपुराणात २५ नावे आहेत. जया, विजया, जयंती, अपराजिता या तिच्या सख्या विवाहानंतरच्या तपश्चर्येच्या वेळीदेखील तिच्याबरोबर कायम राहिल्या. याबद्दल त्यांचे कौतुकच व्हायला हवे. आपल्या हरितालिकेच्या पूजेच्या वेळेस आपण पार्वतीला तिच्या सख्यांबरोबरच पुजतो. त्याचे मूळ हे एवढ्या खोलवर आहे. तपस्विनी पार्वतीची अनेक शिल्पे आहेत. पण वेरूळच्या लेण्यांमध्ये गुहा क्रमांक २१ ला तपस्विनी पार्वतीचे पंचाग्नी साधना करतानाचे लेणे मन वेधून घेते. तिच्या उजव्या हातात अक्षमाला असून डाव्या हातात घट आहे आणि तिच्या डाव्या खांद्यावर तिने हरणाचे कातडे पांघरले आहे. तिच्या पायाशी अग्निकुंड आहे. ब्रह्मचर्याचे रूप घेऊन तिची परीक्षा घेणारा शिवही अतिशय सुबकतेने कोरलेला आहे. मांढळच्या उत्खननात तपस्विनी पार्वतीचे अतिशय दुर्मिळ व सर्वात जुने शिल्प मिळाले आहे. यात पार्वतीने एकही दागिना घातलेला नाही. नंतरच्या शिल्पांमध्येदेखील अक्षमाला, घट किंवा कमंडलू आणि कधी कमळ, कुश गवत हेच दाखवले आहे. तपस्विनी पार्वतीपेक्षा 'आराधिका' एक थोडेसे वेगळे शिल्प आहे. यात बसलेली पार्वती हाताची ओंजळ करून शिवलिंगाकडे भक्तिभावाने पाहत आहे. तपश्चर्या आणि भक्तिभाव यात निश्चितच एक सुक्ष्म रेषा असते आणि हा फरक तपस्विनी पार्वती व आराधिकामध्ये प्रकर्षाने जाणवतो. पूर्व बंगालमध्ये सिद्धा तर उत्तर बंगालमध्ये ललिता पार्वतीच्या रूपात लोकप्रिय आहे. आधी सांगितल्याप्रमाणे विवाहानंतरच्या तपश्चर्येनंतर पार्वतीने गौरीचे रूप घेतले. गौरीचीही विविध पुराणग्रंथांमध्ये वेगवेगळी रूपे आहेत. गौरी, उमा, पार्वती, श्रिया, रंभा, त्रिपुरा, ललिता, कृष्णा, माहेश्वरी, सावित्री, त्रिखंडा, तोतला, भगवती, सरस्वती, गणेशा, सिद्धा अशी अनेक रूपे आहेत. यात श्रियाच्या हातात कमळ आहे. कारण ती समृद्धीची देवी आहे. साधारणपणे हातात अक्षमाला, कमंडलू, कमळ, कुश, पुस्तक, त्रिशूल, उपवीत, मृगाजीन अशाच वस्तू पार्वतीच्या हातात दाखवतात. कारण तिची तपश्चर्या उग्र आहे. तपश्चर्या करणारी तिची रूपे अनेक असली तरी अंगीचा भाव सारखा आहे. गौरी, ललिता आणि दुर्गा कशा ओळखायच्या? आपले प्राचीन ग्रंथ सांगतात, गौरीचे वाहन घोरपड आहे, ललिता हंसवाहिनी आहे आणि दुर्गा सिंहावर विराजमान असते. पार्वती जगन्माता आहे. तिच्या प्रणयोत्सुक, विवाहोत्सुक आणि वात्सल्यपूर्ण प्रतिमांपेक्षा तिची दुर्लक्षित असलेली तपस्विनीची करारी आणि निश्चल निर्भय प्रतिमा मनाला जास्त भावणारी आहे.

ही तपस्विनी पार्वती स्त्रीशक्तीची आद्य जननी आहे.

## वेध

**जनार्दन पाटील**

# झेप आणि आव्हाने

**जगातील विकसित देशांसाठी भारत हा एक मोठा ग्राहक बाजार, एक विश्वासार्ह गुंतवणूक गंतव्यस्थान आणि भागीदारीसाठी एक प्रमुख केंद्र ठरतो आहे. भारतातील मोठा मध्यमवर्ग, वाढती उपभोगक्षमता आणि तरुण लोकसंख्या सतत ऑटोमोबाईल्स, इलेक्ट्रॉनिक्स, आरोग्य सेवा, शिक्षण आणि डिजिटल सेवांची मागणी वाढवत आहे. म्हणूनच किफायतशीर कुशल कामगार शक्ती आणि विशाल बाजारपेठ अवघ्या जगाला आकर्षित करीत आहे.**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावरे लादलेले शुल्क कमी करण्याची अचानक घोषणो केल्याने सर्वांना आश्चर्य वाटले, तर अमेरिकने प्रशासनाला आव्हान देणारा युरोपीय महासंघ आणि भारते यांच्यातील मुक्त व्यापार करार अभूतपूर्व मानला जात आहे. विकसित देशांसोबतच्या व्यापारातून भारताला दीर्घकालीने फायदे मिळण्याची आशा आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये उच्च क्रयशक्ती आहे आणि ते दर्जे दार उत्पादनांसाठी जास्ते किंमत देण्यास तयार आहेत. भारताचा औषध उद्योग, माहिती तंत्रज्ञान, कापड, वाहन घटक, अभियांत्रिकी वस्तू, रत्ने आणि दागिने आणि कृषी-प्रक्रिया क्षेत्रांना चालना मिळू शकते. विकसित देशांसोबत व्यापार आणि करारांमुळे भारताते परकीय गुंतवणूक वाढू शकते. त्यामुळे उत्पादन क्षमता, रोजगार आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण शक्य होऊे शकते. यामुळे जागतिक पुरवठा साखळीत भारताची भूमिको मजबूत होऊ शकते.

विकसित देशांच्या मजबूत अर्थव्यवस्थो आणि भांडवलशाही समाजाशी जुळवून घेताना भारताचा विकसनशील समाज आव्हानांना तोंड देतो. विकसिते देशांमध्ये भांडवल, तंत्रज्ञान, दरडोई उत्पन्न, बचत, गुंतवणूके आणि नागरिकांचे राहणीमान आणि मजबूत अर्थव्यवस्था यांचे उच्च स्तर आहेत. विकसनशील देशांमध्ये दरडोई उत्पन्ने कमी आहे आणि राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात बचत आणि गुंतवणुकीचे प्रमाण कमी आहे. लोकसंख्या मोठी आहे; परंतु कमी कार्यक्षम आहे. भांडवल निर्मितीचे प्रमाण कमी आहे आणि आयात जास्त आहे. म्हणूनच भारतासाठी या देशांमध्ये अधिक गुंतवणुकीची संधी आहे. या पृष्ठभूमीवर बदलत्या काळात कामगिरीची झेप आणि नेमकी आव्हाने या अनुषंगाने भारताची स्थिती समजून घ्यायला हवी. अनेक देश सामान्यतः इतर देशांकडून भांडवल आणि तंत्रज्ञान आयात करतात. विकसनशील देशांमध्ये लोकसंख्येचा एक महत्त्वाचा भाग शेतीमध्ये गुंतलेला आहे, तरीही उत्पादने देशाच्या गरजेपेक्षा कमी आहे. विकसित देशांना कच्चा माले आणि कामगार-केंद्रित उत्पादनांची आवश्यकता असते, तरे विकसनशील देशांना भांडवल, तंत्रज्ञान, यंत्रसामग्री आणि उच्च- गुणवत्तेच्या उत्पादनांची आवश्यकता असते. म्हणूनच दोघांमधील व्यापार गरज- आधारित दृष्टिकोनावरे आधारित असतो. परिणामी विकसित देशांसोबत मुक्त व्यापारे करार करणे भारताची जलद प्रगती भविष्यातील आर्थिक संधी तसेच धोरणात्मक जोखीम देखील निर्माण करू शकते. विकसित देशांच्या कंपन्या, त्यांच्या तंत्रज्ञानावर, भांडवलावरे आणि ब्रँड नावांवर अवलंबून भारतीय बाजारपेठेत वेगाने प्रवेशे करतील. त्यामुळे लहान शेतकरी आणि देशांतर्गत उद्योगांवरे दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वस्त आयातीमुळे व्यापार तूट वाढण्याचा, स्थानिक उत्पादन कमकुवत होण्याचो आणि रोजगारावर परिणाम होण्याचा धोका निर्माण होतो; शिवाय पेटंट, डेटा, पर्यावरणीय आणि कामगार मानके यासारखी परिस्थिती भारताच्या आर्थिक आणि राजकीये निर्णय घेण्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालू शकतात. गेल्या चारे दशकांमध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेने उल्लेखनीय परिणाम साध्य केले आहेत. जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणांमुळे लक्षणीय आणि सकारात्मक फायदे मिळाले आहेत. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिक व्यापार नियमांमध्ये एकरूपता आली, व्यापारातील अडथळे कमी झाले आणि देशांमधील बाजारपेठेतील प्रवेश सुलभ झाला. भारतासारख्या विकसनशील देशालो त्यांच्या आर्थिक क्षमता, कार्यबल आणि सेवा क्षेत्रातील ताकदीच्या आधारे जागतिके स्तरावर आपला वाटा वाढविण्याची ही एके संधी होती. विकसित देशांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वर्चस्व गाजवण्यापासून रोखण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने अन्याय्य अनुदाने, डम्पिंग आणि व्यापारातील अडथळ्यांवर नियम स्थापिते केले. याचा फायदा भारतासारख्या विकसनशील देशांना निर्यात विस्ताराच्या स्वरूपात झाला. जागतिक व्यापारांतर्गते आयात शुल्क कमी करण्याच्या आणि व्यापार अधिक पारदर्शक करण्याच्या प्रक्रियेमुळे भारतीय उत्पादनांसाठी



नवीने बाजारपेठा उघडल्या. जागतिक व्यापार संघटना आणि मुक्त व्यापार करार जागतिक व्यापार वाढविण्याबद्दल बोलतात; परंतु त्यांच्या स्वरूप, उद्देश आणि परिणामात मूलभूत फरक आहेत. हा फरक विकसित आणि विकसनशील देशांमधील व्यापार संबंधांमध्ये एक प्रकारचा विरोधाभास निर्माण करतो. जागतिक व्यापार संघटना ही एक बहुपक्षीय संस्था आहे, जी नियमांवर आधारित जागतिक व्यापार प्रणाली स्थापित करते, तर मुक्त व्यापार करार हे निवडक देशांमधील विशेष सवलती आणि अटींवर आधारिते प्रादेशिक कवा द्विपक्षीय व्यवस्था असतात. यामुळे विकसित आणि विकसनशील देशांमधील व्यापारात समानतेऐवजी असंतुलन वाढते. दुसरीकडे मुक्त व्यापार करार पूर्णपणे वेगळे असतात.

मुक्त व्यापार करारांमध्ये काही देश आपापसात शुल्क कमी करून किंवा काढून टाकून व्यापार वाढवतात. मुक्त व्यापार करार बहुतेकदा विकसित देशांसाठी एक धोरणात्मक शस्त्रे बनतात. जागतिक व्यापार संघटनेत व्यापक सहमती मिळवू शकत नाहीत, तेव्हा ते मुक्त व्यापार करारांद्वारे आपले हितसंबंध पुढे नेतात. विकसित देश, मुक्त व्यापाराच्या नावाखाली, केवळ शुल्क कमी करण्यापुरते मर्यादित राहते नाहीत, तर पेटंट नियम, डेटा स्थानिकीकरण कठोर कामगार आणि पर्यावरणीय मानके, सरकारी नियम आणि इतर नियमांवर निर्बंध लादतात. ते परदेशी कंपन्यांना वस्तू खरेदी करण्याची संधी आणि गुंतवणूक विवादांचे निराकरण अशा अटी जोडतात. या अटींचा परिणाम असा होतो की, विकसनशील देशांचे आर्थिक धोरणे तयार करण्याचे स्वातंत्र्ये मर्यादित होते. भांडवलशाही शक्तीकडून राजकीय प्रभावाची शक्यता वाढते आणि ही परिस्थिती भारतासारख्या विकसनशील आणि लोकशाही देशासाठी आव्हाने वाढवू शकते.

नवीन व्यापार करारांमुळे भारताचा अमेरिका आणि युरोपीय बाजारपेठांमध्ये प्रवेश वाढेल, निर्यात वाढेल आणि परकीय गुंतवणूक आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी संधी खुल्या होतील. त्याच वेळी विकसित देशांमधील मोठ्या कंपन्या कमी दराने देशांतर्गत बाजारात प्रवेश केल्याने भारताच्या लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांवर आणि शेतीवर दबाव वाढू शकतो. नियमांवर आधारित बहुपक्षीय प्रणालीबद्दल बोलते असतानाही, विकसित देश स्वतःचे हितसंबंध पुढे नेण्यासाठी प्रादेशिक करारांचा अवलंब करतात.

भारत आणि विकसित देशांच्या प्राधान्यक्रमांमध्ये खूपे फरक आहे.

भारताच्या मुख्य चिंता म्हणजे गरिबी कमी करणे, रोजगार निर्मिती, कृषी आणि ग्रामीण विकास, परवडणारे शिक्षण आणि आरोग्यसेवा आणि सामाजिक न्याय.

दुसरीकडे विकसित देशांच्या प्राधान्यक्रमात उच्च राहणीमान, तांत्रिक नवोपक्रम, पर्यावरणीय मानके कठोर कामगार नियम आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण यांचा समावेश आहे. भारत आणि विकसित देशांची धोरणे आणि दृष्टिकोन वेगळे आहेत. म्हणूनच भारताने मुक्त व्यापार संतुलित पद्धतीने सुरक्षितता, टप्प्याटप्प्याने उदारीकरण आणि देशांतर्गत क्षमतावाढीसहे अंमलात आणणे आवश्यक आहे.

भारताच्या शाश्वते विकासासाठी रोजगारनिर्मिती, दर्जेदार शिक्षण आणि कौशल्ये विकास, औद्योगिक विस्तार आणि ग्रामीण भागात व्यापक सुधारणा आवश्यक आहेत. या पायांवरच देशाची आर्थिक ताकद, सामाजिक संतुलन आणि दीर्घकालीन प्रगती सुनिश्चित केली जाऊ शकते. अर्थात ताज्या व्यापार करारात युरोपीय महासंघ आणि अमेरिका आपल्या पशुपालन आणि शेतीवर परिणाम करणाऱ्या तरतुदींसाठी दबाव आणत होते आणि त्यापैकी अनेक स्वीकारण्यात आल्या आहेत. यातून कार, दारू आणि अनेक औद्योगिक उत्पादनांची आयात स्वस्त होईल. त्यामुळे आपले स्वतःचे उत्पादन आणि वापराचे परिदृश्य बदलेल.

या दोन व्यापार करारांमुळे आपल्या देशातून युरोप आणि अमेरिकेत तयार वस्तूंची निर्यात सुलभ होईल. मोबाईल फोन आणि संगणकच नव्हे, तर सर्व औद्योगिक उत्पादने आणि ग्राहक यंत्रसामग्रीच्या उत्पादन आणि असेंब्लीसाठी दरवाजे उघडतील. दरम्यान, ट्रम्प यांच्या धोरणांमुळे आणि जागतिक वित्तीय बाजारपेठेतील अनिश्चिततेमुळे भांडवल जागतिक स्तरावर विकसित आणि मजबूत अर्थव्यवस्थांकडे वळले आहे. शिवाय, त्या देशांमध्ये सोने आणि चांदीच्या गुंतवणूक सुरक्षित आणि आशादायक मानण्याचा कल वाढत आहे. तेथील गुंतवणुकीते ५ ते १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर आपल्या देशात परदेशी संस्थात्मक आणि पोर्टफोलिओ गुंतवणुकीत लक्षणीय घट झाली आहे. बाजारातून भांडवलाचे पलायने थांबविण्यासाठी आणि नवीन भांडवल आकर्षित करण्यासाठी पावले उचलण्याची आवश्यकता आहे.

पान १ वरून

# जग तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत!

इराणमधे लोकशाहीवादी शासन प्रस्थापित झाले असता ते स्वतंत्रपणे निर्णय घेते; आपल्या कह्यात नाही यासाठी अमेरिकेने तेथे अंतर्गत उत्पात घडवून आणून, शहा-पहलवींची राजसत्ता प्रस्थापित केली होती. जनतेने केलेल्या उठावानंतर जी अयातुल्लाशाही प्रस्थापित झाली, ती जर अमेरिका धार्जिणी असती, कमीतकमी विरोधात उभी नसती, तर ती जुलमी राजवट अमेरिकेने 'सुखेनैव' चालू दिली असती.

एवढेच काय, पण पाकिस्तानप्रमाणे इराणला अण्वस्त्रसज्ज होण्यास मदतही केली असती. अमेरिकेला साम्यवादी सोव्हिएत संघावर जवळून लक्ष ठेवण्यासाठी एक मित्र देशही मिळाला असता. पण अयातुल्ला राजवटीने 'डेथ-टू-अमेरिका', 'डेथ-टू'-इस्रायल' हे नारे बुलंद केल्याने, अमेरिकेने इराणमधील राजवट पलटविण्याचा चंगच बांधला. सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेचे ते लक्ष्य आहे. त्याच्या अनुषंगाने सध्याच्या अयातुल्ला अली खोमेनी यांची हत्या घडवून आणणे, हे एक उद्दिष्ट सफल झाले आहे.

इस्रायल इराणकडे अधिक वेगळ्या नजरेने पाहतो. कारण इराणची ज्यूंकडे आणि पर्यायाने इस्रायलकडे पाहण्याची दृष्टी अधिक कडवी आहे. इराणची मुल्लाशाही आताही मध्ययुगीन धार्मिक कडवेपणातच रुतलेली आहे. अरबस्तानातील ज्यूंनी प्रयत्न करूनही पैगंबरांना प्रेषित म्हणून मान्यता दिली नव्हती. बद्रच्या लढाईत विजय मिळाल्यानंतर, पैगंबरांच्या समोर शेकडो ज्यूंना कंठस्नान घातले गेल्याचा इतिहास आहे. त्या धार्मिक कट्टरतेच्या पार्श्वभूमीवरच, छोटेसे इस्रायल पृथ्वीवरून नष्ट करण्याचा चंग अयातुल्ला राजवटीने बांधला होता. ते विद्वेषाचे विष सामान्य इराणी जनतेच्या मनात खोलवर रुजविण्याचे कामराजवटीने केले. त्याला धरूनच अयातुल्ला राजवटीने इराणमध्ये तर जय्यत तयारी केली होतीच, पण इस्रायलच्या शेजारील प्रदेशात 'हमास', 'हिजबुल्ला'सारख्या अतिरेकी संघटनांना शस्त्रसज्ज करून, इस्रायलमध्ये उत्पात घडविण्याचे प्रयत्न इराण सतत करत आहे. कधीतरी इस्रायलशी युद्ध करून आज इस्रायलने जी स्थिती पॅलेस्टाईन जनतेची केली, जसा तेथे अक्षरशः गाढवाचा नांगर फिरवला, अगदी तीच स्थिती इस्रायलची करण्यासाठी इराणने तयारी सुरू ठेवली होती. इस्रायला पुरते नेस्तनाबूत करण्यासाठी इराणने अण्वस्त्रे आणि लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे विकसित केल्याचे इस्रायलने लक्षात घेऊनच, इराणचा अण्वस्त्रप्रगतीचा कार्यक्रमच नष्ट करण्याचे धोरण या हल्यादरम्यान ठरविले आहे. त्यासाठी अमेरिकेचे सक्रिय साहाय्य आवश्यक होते. ते देण्यासाठी नेतान्याहू यांना ट्रम्पसारखा उथळ आणि बोलभांड मदतनीसही मिळाला. या युद्धात इराणचे अण्वस्त्रनिर्मितीचे कारखाने आणि क्षेपणास्त्रे बनविण्याची क्षमता पुरती नष्ट करण्याचे, त्यावर बंधन घालण्याचे इस्रायलचे लक्ष्य आहे. 'डेथ-टू-अमेरिका', 'डेथ-टू-इस्रायल' हे नारे बुलंद करणारी अयातुल्ला राजवट आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, कुठल्याही पातळीपर्यंत अगदी स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यापर्यंत आणि त्याचवेळी जगातील जवळपास सर्वच देशांना वेठीस धरण्यापर्यंत गेली आहे. काही तासांच्या अवधीत खाडीतील जवळपास सर्वच अरब देशांवर हल्ले करून, इराणने त्यांना युद्धात खेचले आहे. यापूर्वी 'हमास'ने एकाचवेळी हजारो क्षेपणास्त्रे टाकून, इस्रायलच्या लोहकवच अर्थात 'आर्यन डोम'ची कमतरता जगाच्या निदर्शनास आणली होती. तोच प्रयोग आता इराण सर्व ठिकाणी करत आहे. शेकडोंनी टाकलेल्या क्षेपणास्त्रांमधून दोन-चारतरी निसटून उत्पात घडवतील, हा त्याचा होरा खरा ठरतो आहे.

इराणवर अनेक ठिकाणी हल्ले झाले. अयातुल्लांच्या निवासाला लक्ष्य करत बिळात घुसून स्फोट करणारे ३० बॉम्ब टाकून, पहिल्याच काही तासांतच स्वतः अयातुल्ला, त्याचे काही कुटुंबीय आणि त्याचवेळी बैठकीत असलेले महत्त्वाचे नेते मारण्यात अमेरिका इस्रायलच्या मदतीने यशस्वी झाली आहे. यातून इराणमध्ये सत्तापालट होईल का? तर लगेच सत्तापालट होण्याची शक्यता दिसत नाही. कारण अयातुल्ला राजवटीने संघर्ष न होता, सर्व पातळ्यांवर सत्तांतर सुरळीतपणे व्हावे याची व्यवस्था लावण्याची दूरदृष्टी दाखवली आहे. अयातुल्लाबरोबर मोठा मुलगा मारला गेला, तरी दुसरा त्याची जागा घेणार आहे. अधिकारापदाची पोकळी कुठल्याच स्तरांवर सध्या तरी दिसणार नाही. ट्रम्पने सामान्य इराणी जनतेला राजवटी विरोधात बंड करण्याचे केलेले आवाहन, सध्या तरी फळणे शक्य नाही. अयातुल्लांची खास फौज ते नृशंसपणे मोडून काढेल. तो प्रयोग आताच झाला आहे. जोवर ते कडवे सैन्य अयातुल्ला आणि मुल्लाशाहीला एकनिष्ठ आहे, तोवर जनतेचा उठाव यशस्वी होणार नाही.

इस्रायलचे उद्दिष्ट अण्वस्त्र उत्पादनाला दीर्घगामी खीळ घालणे असले, तरी ते सहजासहजी घडणार नाही. मागच्या जूनमध्ये त्या प्रयोगाची चाचणी झाली. पण, ती यशस्वी झाली नाही. त्यावरून शिकून इराणने अधिक पक्का बंदोबस्त केला असणार. तो मोडून काढण्याला वेळ लागेल. इस्रायललाही मोठ्या प्रमाणावर क्षती पोहोचेल. इराणची सर्व बाजूंनी खच्ची करून, त्याची पारंपरिक शस्त्रनिर्मितीक्षमता जवळपास नाहीशी झाल्यावरच अमेरिका आणि इस्रायल यांच्या आटोक्यात गोष्टी येतील. ती होताना इराणची सैन्यशक्ती हाराकिरी करू लागली, तर हे युद्ध नक्कीच लांबेल. सुमारे नऊ कोटी लोकसंख्येचा इराण पूर्णपणे नेस्तनाबूत होऊन, तो दाती गवत धरून पूर्णपणे शरण येईल, याची स्वप्ने ट्रम्पने पाहू नये.


इराणने आततायीपणा दाखवला आहेच. त्याचे लगेचचे भविष्य म्हणजे, आज पॅलेस्टाईनमध्ये जसे इमारतींच्या अवशेषांचे ढिगारे दिसतात, तशीच काहीशी स्थिती थोड्याच दिवसांत इराणमधे दिसेल. आताच तेहरानमधे जागोजागी भव्य इमारतींमधून धुराचे लोट निघत आहेत. तीच स्थिती इतरही शहरांमधून दिसेल. हे युद्ध लांबू नये, अशीच सर्व जगाची इच्छा आहे. ती केव्हा सुफळ होईल याची वाट पाहणेच, आपल्या हातात आहे. सध्यातरी असेच म्हणावे, आलिया भोगासी असावे सादर। देवावरी भार घालोनिया।। जागतिक व्यवस्थेच्या दृष्टीने ही घटना महत्त्वाची आहे. अमेरिका अजूनही निर्णायक कारवाई करू शकते, हा संदेश यातून जातो. परंतु त्याचवेळी बहुध्रुवीय जगाची वास्तवतादेखील समोर येते. रशिया-चीन या समीकरणात कुठे उभे राहतात, हे पाहणे आवश्यक आहे. ते उघडपणे हस्तक्षेप करणार नाहीत; पण राजनैतिक आणि आर्थिक पातळीवर इराणला आधार देण्याची शक्यताही नाकारता येत नाही. मध्य-पूर्वेतील प्रत्येक ठिणगी जगाला जाळू शकते, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रश्न एकच आहे, संघर्षातून कोणते भविष्य साकारणार? आण्विक सावलीत जगणे मानवजातीला परवडणारे नाहीच. या घटनाक्रमाने सर्व संबंधितांना संवादाचे महत्त्व पुन्हा पटवून दिले, तर हा धक्का दीर्घकालीन शांततेची संधी ठरू शकतो. अन्यथा, इतिहासाच्या पानांवर आणखी एक रक्तरंजित अध्याय लिहिला जाईल. जग सध्या त्याच निवडीच्या उंबरठ्यावर उभे आहे.



## कथा

**रश्मी वाघमारे**

# निःश्वास



मोहना आणि मोहित दोघेही अगदी समासुखाधानाने संसार करणारे जोडपे. मोहना दिसायला सुरेख, मोहित देखणा! दोघेही कॉलेजमध्ये प्राध्यापक. तो मानसशास्त्राचा आणि ती संस्कृत विषयाची. विवाह मंडळातून त्यांचे लग्न जुळले, पत्रिका बघून, ग्रह, तारे, नक्षत्रांचे गणित सोडवून. दोघांना राहायला मोठे घर. कारण मोहितचा परिवार म्हणजे त्याचे दोघेही मोठे भाऊ आणि आई- वडील गोहाटी येथे स्थायिक झाले होते. एकटा मोहित असा होता की, ज्याला बाहेर जाऊन राहण्यात स्वारस्य नव्हते. त्यामुळे मोहनाला सासरचा कोणताही विशेष पाश नव्हता.

तिचे आई-वडील वयस्क आणि थकलेले. लग्नासाठी सर्व मंडळी आली आणि गेली. सारं काही सुंदर; अगदी नीटनेटक्या ठिपक्यांच्या रांगोळीसारखं! दृष्ट लागण्यासारखा संसार सुरू झाला. पाहता पाहता लग्नाला १० वर्षे झाली; अजूनही त्यांच्या घरात छोटी पावले उमटली नव्हती. हे अगदी जिव्हारी लागण्यासारखे दुःख देवाने का दिले होते कुणास ठाऊक! अनेक डॉक्टर, वैद्य, हकीम झाले आणि बहुतेकांचे म्हणणे असे पडले की, सगळ्या बाबी विचारात घेता मूल होणं जरा अशक्यच आहे. मग देवधर्म-नवस-सायास सारं काही झालं; मात्र काहीही उपयोग होताना दिसत नव्हता.

आता मोहनाला लोकांचे कटाक्ष, टोमणे सहन करणे कठीण होऊ लागले होते. ती म्हणायची... ''मला आई व्हायचंय मोहित, देव का बरं कोपला आहे माझ्यावरच?'' दोघेही अत्यंत निराश अवस्थेत जगत होते. एकदा ते एका सुप्रसिद्ध समुपदेशकाकडे गेले आणि आपली व्यथा त्यांच्या समोर सांगितली. त्यांनी समजावले, स्वतःची पालक होण्याची आस पूर्ण करण्यासाठी एक सोपा रस्ता आहे... बालक आश्रमातून एखादे नवजात किंवा दोन-तीन महिन्याचे मूल दत्तक घेतल्यास त्याला माया लागेल आणि तुमचाही परिवार पूर्ण होईल. बाळाला तुमच्या घरी आणण्याने एखादा चमत्कारही होऊ शकतो, हे ऐकल्यावर मोहनाने आपला दत्तक न घेण्याचा हट्ट सोडून दिला. दोघांनी विचार करून एक महिन्याची एक गोड मुलगी दत्तक घेतली. तिच्या बाललीलांमध्ये मोहित मोहनापेक्षा जास्त रंगून गेला.

मोहनाच्या मनात मात्र स्वतःचे मूल नसण्याचा सल कायम होता; आणि त्याचा परिणाम कधी कधी तिच्या वागणुकीतून दिसत असे. मोहना आणि मोहित आता खूप आनंदी होते. त्यांनी धडाक्यात त्या मुलीचे बारसे केले. घर हसते खेळते झाले. लहानगी परी लडिवाळ होती. सर्वांना तिचा लळा लागला होता. तिचा पहिला वाढदिवस दणक्यात साजरा झाला. त्या दिवशी सगळ्यात मोठे गिफ्ट मनीषचे होते. मनीष मोहनाच्या कॉलेजमधला तिचा जुना मित्र व सहकारी. परीचे आणि त्याचे छान जमत होते. परीला मनी काका फारच आवडला होता. तो एकटाच होता. मनीषचे घरी येणेजाणे वाढू लागले, कधी जेवायला, कधी सर्वांनी एकत्र फिरायला, कधी परीशी खेळायला, अशी त्याची घराशी जवळीक वाढू लागली.

मोहितलाही त्यात विशेष काही वाटत नव्हते. एखादा फॅमिली फ्रेंड असल्यासारखे त्याचे वागणे होते. आता परी तीन वर्षांची झाली. मनी काका घरातल्या सारखाच झाला होता. कालचक्र फिरत राहिले आणि एक दिवस मनी काकाला हाक मारताना परी बेडरूममध्ये गेली आणि तिथेच असलेल्या मोहनाने तिला एक रट्टा हाणला. ''आत यायचे तर दार वाजवत जा...'' मोहना ओरडली. परी रडू लागली. तिचा कान ओढत बाहेर नेले आणि थोड्याच वेळात तिचा मनी काका तिच्याशी काहीही न बोलता घाईघाईने बाहेर पडला. त्या तीन वर्षांच्या मुलीला काय कळले कोण जाणे? संध्याकाळी मोहित आल्यावर परी त्याच्या मांडीवर बसली होती. आज ती थोडीशी नाराज होती. तिच्या गालावर अश्रू सुकले होते. मात्र, त्या अश्राप जिवाला काहीही समजत नव्हतं. यानंतरही मनी काका येत राहिला... अचानक मोहना व मोहितच्या आयुष्यात एक आनंदाचा क्षण आला. एक चमत्कार घडला, ज्याची त्यांनी खूप प्रतीक्षा केली होती. कितीतरी वर्षांनी मोहनाला बाळाची चाहूल लागली होती. परीच्या पायगुणाने हा क्षण आला; सर्वत्र परीचे कौतुक होत होते.. घरदार आनंदले. समुपदेशक म्हणाले होते की, कधी कधी मूल दत्तक घेतल्यानंतर तुमच्या आयुष्यात एखादा चमत्कार घडू शकतो. त्यामुळे मोहना आणि मोहित खूप उत्साहात होते. त्याने मोहनाला फुलासारखे जपले. कारण ही गर्भधारणा चाळिशीच्या उंबरठ्यावर होती.

डॉक्टरांनी खूप काळजी घेतली आणि त्यांना एक गुटगुटीत मुलगा झाला. ऐश्वर्य त्याचे नाव! सारीकडे आनंदीआनंद झाला. ऐश्वर्यचे करताना मोहनाला वेळ कमी पडू लागला. मात्र आता परीची किंमत थोडीशी कमी झाली होती. मोहनाचा ओढा ऐश्वर्यकडे असायचा. त्यामुळे मोहितला परीची हेळसांड झालेली दिसायची. कालचक्र फिरत होते. मुले मोठी होत होती. परीला मध्येच आठवण यायची. ती विचारायची, ''आई मनी काका आला नाही आपल्या घरी?'' तेव्हा ती उत्तर द्यायची, ''अगं काका खूप दूर गेला दुबईला!'' त्यानंतर मनी काकाचे येणे जवळ जवळ बंद झाले. परी आता सात वर्षांची तर ऐश्वर्य तीन वर्षांचा झाला होता. त्यांच्या लेकीला आता कळून चुकले होते, तिच्यापेक्षा ऐश्वर्य जास्त महत्त्वाचा आहे. मोहना उघड-उघडपणे आता ऐश्वर्यची बाजू घेऊ लागली. त्या सात वर्षांच्या जिवाला हा भेदभाव कळू लागला होता. मोहितलाही

(पान ६ वर)




# सक्षमीकरणाच्या दिशेने पुढचे पाऊल!



निमित्त
मधुरा कुलकर्णी

दरवर्षी ८ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या पृष्ठभूमीवर अनेक विषय समोर येतात. या निमित्ताने जुन्या विषयांची उजळणी होते तर काही नव्या मुद्यांना स्पर्श केला जातो. त्यावर चर्चा घडवून आणली जाते. यामागील उद्देश अर्थातच महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय योगदानाचा गौरव करणे असतोच; त्याचबरोबर त्यांना अधिकारांची जाणीव करून देणे हादेखील असतो. त्यामुळेच महिलांच्या सशक्तीकरणासाठी हे औचित्य महत्त्वपूर्ण ठरते. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात महिलांचे स्थान महत्त्वाचे असले, तरी अनेक ठिकाणी महिलांना आव्हानांचा सामना करावा लागतो, हे सत्य आहे. विशेषतः शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांचे जीवन कधी कधी अत्यंत कठीण असते. एकीकडे अशी उदाहरणे दिसत असली, तरी महिलांच्या अधिकारांसाठी आणि सशक्तीकरणासाठी भारतात अनेक सकारात्मक बदलही घडत असल्याचे नाकारण्यात अर्थ नाही. त्यामुळेच या सकारात्मकतेचा कसा वापर करून घ्यायचा यावर मंथन होणे गरजेचे आहे.

अलिकडच्या काळात भारतातील महिलांच्या सशक्तीकरणाच्या प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या आहेत. उदाहरणार्थ, २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये महिला सशक्तीकरणासाठी विविध घोषणा करण्यात आल्या. या घोषणांमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी 'वर्धित रोजगार योजना', महिला उद्योजकतेला चालना देणारी 'नवीन कृषी धोरण' आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायद्यात सुधारणा यांचा समावेश आहे. खेरीज सरकारने जाहीर केलेल्या नानाविध योजनांमध्ये महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यावर भर दिला आहे. अलिकडे महिलांच्या आरोग्याविषयीही अनेक महत्त्वपूर्ण धोरणे पुढे आली आहेत. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्र सरकारने महिला स्वास्थ्य योजना सुरू केली असून ग्रामीण भागातील महिलांना गरोदरपणाच्या काळात आरोग्य सेवांचा अधिक आणि चांगला पुरवठा करणे हा तिचा उद्देश आहे. तसेच महिला मानसिक आरोग्याच्या बाबतीत जास्त जागरूक होण्यासाठी सरकारने कार्यक्रम सुरू केले आहेत.

महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेसाठी सरकारने 'महिला सुरक्षा नोडल' योजनेची सुरुवात केली असून यात महिला पोलिसांकडून अधिक सक्रियता दाखवून स्थानिक पातळीवर मदत दिली जाईल. महिला नेतृत्व आणि त्यांच्या राजकीय सहभागाचा मुद्दा घेतला तर आता भारताच्या राजकारणात महिला नेतृत्वाचे महत्त्व अधिक वाढत आहे. २०२५ च्या लोकसभेतील निवडणुकांमध्ये महिला प्रतिनिधींच्या संख्येत वाढ पाहायला मिळाली.

सध्या भारतातील अनेक राज्यांमध्ये महिला नेतृत्व महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. दिल्लीतील नवीन सरकारची धुरा एका महिलेच्या हाती आली आहे. महाराष्ट्रामध्ये 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' चर्चेत आहेच. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महिलांच्या सशक्तीकरणासाठी विशेष योजना सुरू केली असून या माध्यमातून महिलांना पोलिस सेवेत प्रवेश मिळविण्याची सोय आहे. याबद्दलचे एक ताजे उदाहरण म्हणजे, उत्तरप्रदेश सरकारने एक हजार महिला पोलिसांची भरती सुरू केली आहे. त्याचबरोबर महिलांचे शिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध धोरणे लागू करण्यात आली आहेत. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्र सरकारने महिला शिक्षण योजनेंतर्गत जास्त शिष्यवृत्त्या आणि स्टार्ट-अप्ससाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याची घोषणा केली. यामुळे देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना शिक्षण आणि उद्योजकतेमध्ये अधिक संधी मिळणार आहे. महिलांसाठी, विशेषत: आयटी आणि विज्ञान क्षेत्रात अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही भर देण्यात आला आहे. एकूणच महिलांचा आर्थिक विकास आणि त्यांचे स्वातंत्र्य हे सशक्तीकरणाचा मुख्य आधार असल्याची जाणीव आता समाजाला झाली आहे. म्हणूनच महिलांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी तसेच स्वतःचे व्यवसाय सुरू करण्यासाठी योग्य धोरणांची अंमलबजावणी केली जात आहे.

विशेषत: स्टार्ट-अप्स आणि घरगुती उद्योगांमध्ये महिलांचा वाढता सहभाग उत्साहवर्धक म्हणावा लागेल. याबाबत केंद्र सरकारने दिलेल्या 'महिला उद्योजकता योजनां'मधून त्यांना छोटे उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. परिणाम स्वरूप भारतात महिला सशक्त होऊन आपल्या कुटुंब आणि समाजासाठी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील, अशी अपेक्षा व्यक्त करता येते. महिलांचे सशक्तीकरण केवळ त्यांच्याशी संबंधित नाही तर संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठीही आवश्यक आहे हेदेखील आपण लक्षात घ्यायला हवे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे स्त्रियांकडे बघण्याच्या पुरुषांच्या भूमिकेत बदल होण्याची गरज आहे. कारण महिला सशक्तीकरणाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी पुरुषांच्या मानसिकतेमध्ये बदल होणे अत्यावश्यक आहे. पिढ्यान्पिढ्या महिलांसंबंधीची भेदभावाची मानसिकता बदलण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीची भूमिका महत्त्वाची ठरते. म्हणूनच आताच्या काळातही लिंग समानतेबद्दल जागरूकतेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

महिलांना कारकीर्दीच्या क्षेत्रात, घरातील जबाबदाऱ्या किंवा इतर सामाजिक भूमिका निभावताना समान संधी मिळाल्या तर अनेक पेच सोडवणे सहजशक्य होईल. याबाबत पुरुषांकडे फक्त महिलांना सहाय्य करणारे किंवा सुरक्षित ठेवणारे म्हणून पाहू नये, तर त्यांच्या स्वावलंबनाला प्रेरणा देणारे म्हणूनही भूमिका बजवावी लागेल. थोडक्यात, महिलांना समोर आणण्यासाठी आधी पुरुषांनी त्यांचे स्थान आणि अधिकारही स्वीकारले पाहिजेत. ही मानसिकता बाणवण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्यांनी विचार करायला हवा. वडीलधाऱ्याद्वारे मुलांना शिक्षित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांना लहानपणापासून लिंग समानतेचा मुद्दा, महिलांच्या हक्कांबद्दलची जागरूकता आणि विविध क्षेत्रांमधील योगदानाची माहिती दिली तर जाणिवा समृद्ध होण्यास मोठी मदत होऊ शकते.

जीवनशैलीतील बदल हा मुद्दाही या अनुषंगाने महत्त्वाचा ठरतो. जसे की, घरातील कामांमध्ये पुरुषांचा सहभाग वाढवणे, मुलांच्या शिक्षण आणि घरगुती जबाबदार्यांबाबत पुरुषांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हे मुद्देही घर आणि समाजात एक नवीन मानसिकता निर्माण करू शकतात. एकीकडे हे बदल होत असताना दुसरीकडे पुरुषांनी कार्यस्थळावरही महिलांना समान संधी देण्यासाठी योग्य ती भूमिका अंगीकारणे गरजेचे आहे. त्यांनी महिला सहकार्यांचा आदर केला पाहिजे. त्यांना सन्मान दिला पाहिजे आणि त्यांच्या कामाची योग्य कदर केली पाहिजे. (पान ६ वर)

# गाणी, अभिनय, संगीत आणि आपण...

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

आज काही जुन्या हिंदी गीतांबद्दल मी तुमच्याशी बोलणार आहे. तशी माझी आणि माझ्या बरोबर वाढलेल्या पिढीतील लोकांची बरीच हिंदी आणि मराठी सदाबहार गाणी आवडती आहेत. साठ ते सत्तरच्या दशकातील ही गीते आहेत. त्यातील पहिले गीत आहे साथी या चित्रपटातील. हा चित्रपट १९६८ मध्ये आला होता. त्यातील हे गीत आहे. 'ये कौन आया, रोशन हो गई महफिल किस के नाम से...' लता मंगेशकरांनी हे गीत अत्यंत अप्रतिम गायले आहे आणि तितकाच अप्रतिम अभिनय या गीताच्या वेळी सिमी गरेवालने केला आहे. पार्टी सुरु असते आणि सिमी गात असते. त्याचवेळी राजेंद्रकुमार येतो. आणि मग गाताना सिमीचा चेहरा बघावा. आनंद अगदी ओसंडून वाहणे म्हणजे काय हे पहायचे असेल तर तिच्या चेहऱ्याकडे बघावे.



एखाद्या फुलासारखा प्रसन्न फुललेला चेहरा. हे गाणे जेव्हा आपण पाहतो किंवा ऐकतो तेव्हा पाहणार्याला किंवा ऐकणार्याला ते अगदी प्रसन्न करून जाते. जसे फुले वाटणार्याच्या हाताला फुले सुगंध देऊन जातात. हे गीत लिहिले आहे मजरूह सुलतानपुरी यांनी आणि संगीतबद्ध केले आहे नौशाद यांनी. दुसरे गीत आहे लव्ह इन टोकियो चित्रपटातील. हे गीत लता मंगेशकरांनी अप्रतिम तर गायिलेच आहे पण तेवढाच समर्थ अभिनय केला आहे आशा पारेख यांनी. या गीतातही पार्टीत आशा पारेख गात असते. चेहरा वर जसा सिमी गरेवालचा सांगितला आहे तसाच प्रसन्न. गीताचे बोल आहेत 'मुझे तुम मिल गये हमदम, सहारा हो तो ऐसा हो...' प्रेमात अशी अवस्था होते की जिकडे तिकडे प्रिय व्यक्तीच दिसू लागते. म्हणून पुढील ओळ आहे 'जिधर देखू उधर तुम हो, नजारा हो तो ऐसा हो तो ऐसा हो..' असे सगळे आनंदाचे गीत सुरु असताना प्राण ज्याने त्या चित्रपटात खलनायकाचे काम केले आहे तो तिच्या लहान मुलाचे (की भावाचे) अपहरण करतो. त्यावेळी तिला त्याबद्दल फोन येतो. आणि एखादी हरिणी जशी पाडसाच्या ओढीने भयग्रस्त व्हावी तसे तिचे होते. काळजात धस्स होते. डोळ्यातून घळघळा अश्रू ओघळतात. पण दुसर्याच क्षणी ते सगळं लपवून ती गायला लागते. एक दोन क्षणातच हे सारे पडद्यावर घडते. पण त्या तेवढ्याच एक दोन सेकंदात आशा पारेखने अभिनयाची कमाल केली आहे. सगळे भाव आनंदाचे, दु:खाचे आणि भीतीचे चेहेऱ्यावर दाखवले आहेत. गाण्याचे बोल फार सुंदर आहेत. ती म्हणते 'मेरी आंखों में आंसू है, मगर आंसू खुशीके है, किसे छोडू किसे पा लू, ये रिश्ते जिंदगीके है 'अप्रतिम शब्दरचना.

शैलेंद्र यांची ही गीतरचना. शंकर जयकिशन यांचे तितकेच मधुर संगीत. आणि लता दीदींचा आवाज. या चौघांपैकी कोण श्रेष्ठ? नाही ठरवता येत. बस, एकाच वाक्यात सांगायचे तर Hart off rthem! तिसरे गीत आहे आम्रपाली या चित्रपटातले. हा चित्रपट सुद्धा १९६६ मधेच आला होता. या चित्रपटातील गाणी. संगीत, आणि पात्रांचा अभिनय केवळ अप्रतिम. गाणे आहे ' नील गगन की छांव में...' शैलेन्द्र यांच्याच या गीताला संगीत दिले आहे पुन्हा एकदा शंकर जयकिशन यांनी. आणि अभिनय केला आहे नृत्यात प्रवीण असलेली कसदार अभिनेत्री वैजयंती माला यांनी. ही जी तीनही गाणी आहेत यात नायक आहेतच. त्यांचा अभिनय आहेच. पण मुख्य अभिनय बघायचा तो नायिकेचाच. मला खात्री आहे की हा लेख वाचल्यानंतर काहींना नक्कीच ही गाणी पाहण्याची इच्छा होईल. तर जरूर बघा. ऑडीओ नको व्हिडीओ बघा. हे गीतही दरबारात मुजरा करताना वैजयंती माला म्हणते. चेहऱ्यावरून आनंद ओसंडतो आहे. गीतावर नृत्य करताना तिचे पदन्यास पाहण्यासारखे आहेत. शास्त्रीय नृत्याचा आणि गीताचा सुरेख संगम म्हणजे हे गीत. तर सांगायचे हे की जेव्हा सुनील दत्त तिथे येतो तेव्हा तिचे काही काळ थांबलेले नृत्य पुन्हा सुरु होते. आणि मग त्या नृत्यात वैजयंतीमाला जी नाचली आहे ते पाहण्यासारखे आहे. अक्षरशः त्यात तिने जान ओतली आहे. प्रचंड एनर्जी आणि उत्साह आहे. तो जो नृत्याचा छोटासा तुकडा आहे त्यात शब्द नाहीत फक्त संगीत आहे. मृदुंग, वीणा आणि तबल्याचा ठेका. ही तीनही गाणी बघताना त्यातला काळ, अवकाश याचे जरूर निरीक्षण करा. काळ म्हणजे त्या वेळचे वातावरण या दृष्टीने ही तीनही गाणी दिग्दर्शकाने कशी चित्रित केली आहेत, ते वातावरण कसे जिवंत केले हे पाहण्यासारखे आहे. ती गाणी गायिली जात असताना भोवतालची माणसे, त्यांचे हावभाव यांचे किती बारकाईने चित्रण केले आहे. आम्रपाली मधल्या गाण्यात तर हे जरूर पाहण्यासारखे आहे. (पान ६ वर)

# आयुर्वेदातील औषधिकल्पासाठी रसायनशास्त्र

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

आकाश, त्यातून वायू, अग्नी, पाणी आणि पाण्यातून पृथ्वी याप्रमाणे पंचमहाभूतांची उत्पत्ती झाल्याचे आणि विश्वातील यच्चयावत पदार्थात हीच मूलतत्त्वे असल्याचे तैत्तिरीय उपनिषद सांगते. त्रिदोषातील कफात पृथ्वी आणि जल यांचे आधिक्य, पित्त हे अग्नीचेच रूप आणि वायूसाठी आकाश तत्त्व महत्त्वाचे आहेत. आदिमानवाने अग्नीला वेठीस धरले आणि नैसर्गिक द्रव्यांवर संस्कार करीत औषधीकरणाचा जन्म झाला. औषधी या शब्दाची व्याख्या 'ओषो दीप्तिर्वा धीयते' म्हणजे व्याधी नष्ट करण्याची शक्ती जिच्या ठायी आहे, ती अशी सांगितली आहे. तिच्या कल्पाने म्हणजे योगाने व्याधीचे निवारण करावयाचे. तिच्या घटकांचे सांगोपांग ज्ञान सांगणारे जे रसायनशास्त्र, त्याचे परिपूर्ण ज्ञान नसेल त्याने वैद्यकी करू नये. म्हणून द्रव्यनिघंटूत रसायनशास्त्राला फार महत्त्व दिले आहे. चरकाचार्यांनी यावर विवेचन केले आहे.

संस्कार म्हणजे गुणान्तराधान. एका वस्तूचे गुण दुसऱ्या वस्तूस देणे. यासाठी समीपता, संयोग, शोधन, मंथन, भावना देणे आणि भाजन या प्रक्रिया सांगितल्या आहेत. बलाधान म्हणजे त्याच वस्तूच्या भावना तिलाच देऊन गुणवृद्धी करणे. लहान द्रव्यास मोठेपण तर मोठ्यास लघुपण देणे म्हणजे काल, संस्कार आणि युक्ती. याशिवाय नक्षत्र, चंद्र, सूर्य, अग्नी यांची पुटी देणे. प्रवाळास चंद्रपुटी दिल्यास त्याचे शैत्य दुणावते तर सूर्यपुटीने उणावते. अग्निपुटीमुळे ते सूक्ष्म, रूक्ष आणि प्रसन्न होऊन पचनास हलके होते आणि सेवन करताच शरीरात शीघ्रतेने पसरते. माझे वडील आयुर्वेदाचार्य पंडितराव हिर्लेकर हे सर्व कसे करत; ते मी चिकित्सक बुद्धीने बघत असे. चंद्रपुटीचे सर्वपरिचित उदाहरण म्हणजे कोजागरी पौर्णिमेस शारदीय चंद्राच्या कोवळ्या किरणांच्या प्रभावात दूध उकळवणे. औषधी द्रव्य, त्याचे शुद्धीकरण आणि त्यावरील कल्पक्रिया या सर्वांसाठी रसायनशास्त्रातील नैपुण्याची फार आवश्यक आहे.



द्रव्य विज्ञानात त्यासाठी पुढील २६ अंगांवर सविस्तर चर्चा आहे. उत्पत्ती, आरब्धता, प्रकार, व्याख्या, नामकरण, स्थान, अंगविशेष, अवस्था, आहरण, संग्रहण, संपर्क, कृत्रिम, बनावट, भेसळ, प्रतिनिधी, नक्कल, आंतरभेद, प्रामाण्य, परीक्षा, दोष, गुण, कर्म, रस, विपाक, वीर्य आणि प्रभाव. या २६ अंगांची पुढे अनेक उपांगे सांगितलेली आहेत. उदा. एकट्या उत्पत्तीचाच विचार केला तर ही उत्पत्ती पंचमहाभूतांपैकी आकाश, वायू, अग्नी, पाणी अथवा पृथ्वी या तत्त्वातून झाली, यावर गहन चिंतन आहे.

इतके गहन की, या पंचभौतिकांचेही पुढे प्रत्येकी सृष्टी, देश, दोष, अवस्था, गती, कार्य आणि स्वभाव असे सात प्रकार करीत त्यांचे पुढे प्रत्येकी तीन उपभेदही दिले आहेत. उदा. सृष्टिभेदात खनिज, उद्भिज किंवा प्राणिज असे. विशिष्ट गुण हीच पदार्थाची ओळख द्रव्य हे नेहमी गुण आणि कर्म यांनी युक्त असते तेव्हा त्यांचीही चर्चा गुणकर्मेण विभागश: अशीच केली आहे. येथे कोणालाही गीतेतील 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम् गुणकर्म विभागश:' या उक्तीचे स्मरण झाल्यास नवल नाही, नव्हे मलाही तोच भावार्थ अपेक्षित आहे. आधुनिक रसायनशास्त्रही एलिमेंट आणि प्रॉपर्टी एकमेकांपासून स्वतंत्र राहू शकत नाहीत; किंबहुना विशिष्ट गुणधर्म हीच पदार्थाची ओळख असेच सांगते. द्रव्यांचे नामकरण करताना त्यांच्या घटना आणि कार्य यांना अधिक महत्त्व तर आहेच; पण त्यातही पुढे प्राणिज, खनिज, उद्भिज अशी वर्गवारी आहे. स्थान या विषयात एकाच द्रव्याच्या विविध देशपरत्वे आणि स्थळ म्हणताना भूगर्भातील थरांच्या खोलीनुसार रासायनिक गुणावगुणांची माहिती आहे. वडिलांच्या संग्रहात नेपाळचे तांबे, सौराष्ट्रातील कासे, तापी नदीतील माक्षिक असावयाचे, तर रेतीतसुद्धा हरिद्वार, ब्रह्मावर्त वगैरे ठिकाणांहून आणलेल्या रेतीचे नमुने होते. हिमालयातील वनस्पती सर्वात उत्तम, असे ते म्हणत तर सह्याद्री- सातपुडा येथील उष्ण वनस्पतींचे वेगळे रासायनिक महत्त्व सांगत. एकच वनस्पती तिच्या प्राप्तिस्थानांच्या भौगालिक रचनेनुसार विविध रासायनिक गुणधर्म प्रकट करते. अंगविशेषात मूळ, खोड, पान, फूल आणि फल याचप्रमाणे वनस्पतीतील रस, धातू, क्षार, वीर्य यांचे रासायनिक पृथ:करण केल्यास विविधता आढळते व त्यानुसार त्यांची निवड केली जाते. वनस्पतींच्या कोवळे किंवा जूनपणा, आर्द्रता किंवा शुष्कपणा, नूतन आणि जीर्ण अशा सहा अवस्था सांगितल्या असून त्यानुसार त्यांचे रासायनिक गुण ठरतात आणि गंमत म्हणजे या बाबतीत एकच निर्णय सर्व वनस्पतींना लावता येत नाही. आहरण म्हणजे औषधी निर्माणाकरिता कोणती वनस्ती कधी आणि कशी आणावी हा विचार. यात ऋतू, तिथी, नक्षत्र, सकाळ, संध्याकाळ यानुसार त्यांच्यात होणारे रासायनिक बदल यांचा विचार आहे. त्यापूर्वी वृक्षच्छेदन विधीही सांगितलेला असून मी तुला समाजाच्या आरोग्य रक्षणासाठी तोडत आहे, अशी वृक्षदेवतेची प्रार्थनापूर्वक क्षमायाचनाही आहे. वनस्पती सजीव असल्याने तिला होणाऱ्या वेदना आणि त्यामुळे तिच्या रासायनिक गुणधर्मात फरक पडतो. संग्रहण आणि आवरण म्हणजे भविष्यकालीन उपयोगासाठी वस्तू कशाप्रकारे आणि कोठे सांभाळल्यास तिचे गुणधर्म दीर्घकाळ टिकतील याचा विचार. उदा. तुरीच्या डाळीत थोडे तिळाचे तेल मिसळावे किंवा गुग्गुळावर हलकेच तूप चोपडावे. संपर्क म्हणजे कोणती द्रव्ये कोणाच्या सान्निध्यात ठेवल्यास त्यांचे रासायनिक गुण राहतील अथवा घटतील. याचप्रमाणे द्रव्याची कृत्रिमता ओळखणे, भेसळ ओळखून तिचे प्रमाण मोजणे, उपलब्ध नसल्यास प्रतिनिधी योजणे, नक्कल आणि पोटभेद ओळखणे. ते सर्व प्राणिज, उद्भिज खनिज या सर्वांचे ते देश, क्षेत्र, वर्ण, लिंग, रंग, आकृती आणि काल या सात कारणांनी होतात. ती जाणणे तसेच गावठी गाय आणि वनात चरणारी कपिला गाय, तिचे रंग तसेच म्हैस, बकरी, उंटीण यांच्यापासून मिळणाऱ्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या गुण आणि धर्मातील फरक रसायनशास्त्रामुळे समजतो. द्रव्याचे परीक्षण आणि प्रामाण्यीकरण रसायनशास्त्राच्या मदतीने कसे करावे (हेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही आढळते). दोषादी म्हणजे दोष, गुण, कर्म, रस, विपाक व प्रभाव इतकेच नव्हे तर षड्रसांचे मधुर, आंबट, खारट, तिखट, कडू व तुरट हे भेद तर आपण सहज ठरवू शकतोच; पण प्रत्येक रसाच्या तीव्रतेनुसार त्याच्या गुणधर्मातील भिन्नताही सांगता येते. उदा. एका खारट रसासाठी साधे, काळे, सैंधव आणि खडे मीठ इतक्या पर्यायातून प्रत्येकाची भिन्न वैशिष्ट्ये रसायनशास्त्राच्या मदतीनेच सांगता येतात. प्रत्यक्ष कल्पप्रक्रियेस आरंभ करण्यापूर्वी उपलब्ध द्रव्यांचे शोधन म्हणजे शुद्धीकरण करावे लागते. द्रव्य प्रकारानुसार त्याचे असंख्य विधी आहेत. एकूण कल्पप्रक्रिया ४७ आर्ष आणि १३ सांप्रदायिक अशा ६० आहेत. आर्ष आणि सांप्रदायिक या दोघातही संमिश्रण, निष्कासन म्हणजे पृथ:करण आणि आधान हे प्रकार समान आहेत. आधान म्हणजे एका द्रव्यावर दुसऱ्या द्रव्याचे गुण स्थापन करणे. भस्म प्रक्रिया म्हणजे धातूंचे ऑक्सिडेशन, सल्फाईड किंवा कॅलसिनेटेड नॅनो मेटॅलिक प्रिपरेशन. आतापर्यंच्या माहितीवरून आयुर्वेदाच्या औषधिकल्पासाठी रसायनशास्त्राचे ज्ञान असणे किती आवश्यक असेल ते समजेल. आपल्या प्राचीन ग्रंथांची परिभाषा समजून घ्यायला हवी. आयुर्वेद ही केवळ औषधोपचार पद्धतीपुरतीच मर्यादित नसून द्रव्य, गुण, कर्म यावर आधारित एक सुसूत्र तत्त्वप्रणाली आहे. आयुर्वेदाचे तत्त्वज्ञान अबाधित ठेवून रसायनशास्त्राच्या साहाय्याने द्रव्याच्या गुण व क्रियांचे आणि तदनुषंगिक परिणामांचे विश्लेषण करूनच व्याधी निरसन करता येणे शक्य आहे. त्यामुळे द्रव्याचे स्वरूप, त्यातील घटक, त्यांचे रासायनिक रूपांतरण आणि जैविक परिणाम यांचे योग्य विश्लेषण होण्याकरिता रसायनशास्त्राचा अभ्यास हा ऐच्छिक नसून शास्त्रीय गरजेचा आहे. संशोधनाचा औपचारिक आराखडा असा सुचवता येईल.

१) आयुर्वेद अभ्यासक्रमात रयायनशास्त्राचे स्थान, तत्त्वज्ञान, औषधनिर्मिती आणि गुणवत्ता नियंत्रण यांचा तौलनिक अभ्यास.

२) आयुर्वेदातील द्रव्यगुणविचार आणि आधुनिक रसायनशास्त्रातील संकल्पना यांचा सुयोग्य संबंध सांधणे. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, ८ मार्च ते शनिवार, १४ मार्च २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✽ **रविवार, ८ मार्च-** रंगपंचमी, जागतिक महिला दिन, कानिफनाथ यात्रा मढी (जि. नगर), भैरवनाथ बगाड यात्रा बावधन (ता.वाई), धुळोबा यात्रा हुबालवाडी (ता. वाळवा), अर्जुनश्वर यात्रा अर्जुनवाड शिरोळ, यशवंत महाराज पुण्यतिथी मायणी, सुगंधादेवी यात्रा सौंदत्ती, बुवाची रेणुका यात्रा सौदलगा ✽ **सोमवार, ९ मार्च-** संत एकनाथ महाराज षष्ठी पैठण व मळणगाव, श्री कालिका माता रथोत्सव धारपुडी, श्रीरामवाडी जत्रा श्रीरामवाडी, पैठण यात्रा, नाथ यात्रोत्सव मळणगाव, स्वामी युक्तेश्वर पुण्यदिन ✽ **मंगळवार, १० मार्च-** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुण्यदिन, श्री काळभैरव यात्रा शिरसी (ता. शिराळा), श्री कनकेश्वरी उत्सव कनकगिरी ✽ **बुधवार, ११ मार्च-** कालाष्टमी, छत्रपती संभाजीराजे बलिदान दिन वढु बु।।, वर्षीतपारंभ (जैन) ✽ **गुरुवार, १२ मार्च-** छत्रपती राजाराम महाराज पुण्यतिथी सिंहगड, यशवंतराव चव्हाण जन्मदिन, चैतन्यगिरी महाराज सप्ताह रांजणी, काळुबाई यात्रा जांब बु।। (ता. कोरेगाव), ढवळीकर महाराज पुण्यतिथी ढवळी ✽ **शुक्रवार, १३ मार्च-** कालभैरव यात्रा वेर्णे, आबापुरी (जि. सातारा), देव ताटम्हंकालेश्वर छबीना जांब बु।। (ता. कोरेगाव), ओंकारेश्वर जन्मोत्सव अंधोशी ✽ **शनिवार, १४ मार्च-** मीन संक्रांती उ.रात्री १.०२

**मुहूर्तः-** ✽ **साखरपुडा-** ८ मार्च (१४ पर्यंत), १४ मार्च ✽ **डोहाळ जेवण-** ९ मार्च (१६ नंतर) ✽ बारसे- ८ मार्च (१४ पर्यंत) ✽ **जावळ-** ८ मार्च (१४ पर्यंत) ✽ **गृहप्रवेश-** ८ मार्च (१४ पर्यंत), १४ मार्च (८ नंतर)

### मेष :-नव्या संधी लाभतील

शिक्षण शक्तिशाली शस्त्र आहे. ज्याने आपण जग बदलू शकतो. सोमवारचा बुध-गुरु त्रिकोण योग आर्थिक बाबतीत आपणास शुभ फलदायी आहे. उपजत कला-गुणांचा विकास होईल. नव्या संधी लाभतील. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावा. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. ९, १४

### वृषभः- कार्यक्षेत्रात शुभ फले

कोणी आपला विश्वासघात केला तरी धन्यवाद द्या. विश्वास विचाराने ठेवायचा हे यातून शिकायला मिळते. धनस्थ गुरुचा कर्मस्थ बुधाशी होणारा त्रिकोण योग कार्यक्षेत्रात आपणास शुभ फुले मिळवून देणार आहे. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात असणार्यांना विशेष संधी लाभतील. अडचणी कमी झाल्याने समाधान वाटेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ८, ९

### मिथुनः- स्पर्धांमध्ये यश

माणूस नम्र झाला की, लोकांच्या हृदयात त्याची जागा बनते. राशीतील गुरुमुळे व्यापक दृष्टिकोन निर्माण होईल. कारखानदारी प्रशासन अशा क्षेत्रात चांगल्या संधी लाभतील. नव्या कमांना गती देता येईल. अडचणीतून वेळीच मार्ग निघेल. स्पर्धांमध्ये यश मिळवू शकाल. घरात शुभ कार्य घडतील. सौख्यदायी घटना घडतील. गुढ विद्येत प्रगती होईल. शुभ ता. ९, १४

### कर्कः- सौख्याच्या घटना

बंद झालेलं दार पुन्हा वाजवायचं नसतं, आपली किंमत कमी होते. बुध-गुरु त्रिकोण योग लाभदायक आहे. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कलेचा गौरव होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. मुंजा दोष दूर करावा. अनावश्यक खर्च टाळावा. संघर्षातून प्रगती होत जाईल. स्थावर बाबतीत सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. १४

### सिंहः- अवाजवी बोलणे टाळावे

परिश्रम कधी धोका देत नाही, फक्त फल विलंबाने मिळते. राशी समोरच सप्तमात मंगळ, राहू बुधासह आहेत. अवाजवी बोलणे कसोशीने टाळावे. अष्टमात रवि, शनी असल्याने शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. आर्थिक कामे मनासारखी होतील. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. शुभ ता. १४

### कन्याः- संसर्गजन्य आजारापासून जपून

काही भावना फक्त मनातच ठेवायच्या असतात. राशी स्वामी बुध षष्ठात मंगळ राहू समावेत आहे. यामुळे मनावर पूर्ण नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. शारीरिक समस्या भागीदारीच्या व्यवसायात वादविवाद संभवतात. काळजी घ्यावी. कर्मस्थ गुरुमुळे सर्व समस्यांतून मार्ग मिळत जाईल. फार चिंता करू नका. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. संसर्गजन्य आजारापासून जपून असावे. शुभ ता. ८, ९

### तुलाः- लाभदायक त्रिकोण योग

आजकाल कारस्थाने करणारेही अधिक गोड बोलत असतात. पंचमातील बुधाचा भाग्यस्थ गुरुशी होणारा त्रिकोण योग लाभदायक आहे. स्पर्धांमध्ये यश मिळवू शकाल. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. अपेक्षित कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. दगदग टाळावी, अडचणी कमी होतील. शुभ ता. ८, ९

### वृश्चिकः- सामंजस्याने रहावे

सुख आपल्या अहंकाराची परीक्षा घेत असते. सुखस्थ मंगळ राहू थोडे प्रतिकूल असल्याने दगदग टाळावी. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. पंचमतील शुक्र नेपच्यून कला गुणांमध्ये प्रगती करणारी आहेत. नव्या कामासाठी अधिक वेळ द्यावा लागेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. जुने येणे वसूल करून घ्यावे. विद्या अभ्यासात अधिक लक्ष द्यावे लागेल. शुभ ता. १४

### धनुः- समस्यातून मार्ग निघेल

दुःख माणसाच्या धैर्याची परीक्षा घेत असते. राशी स्वामी गुरुचा बुधाशी होणारा त्रिकोण योग विशेष लाभदायक आहे. कोणतेही प्रयत्न कार्य सिद्धीसाठी अधिक करण्याची गरज आहे. स्थावर प्रश्न रेंगाळतील. मातोश्रीच्या प्रकृतीची काळजी घ्यावी. नव्या समस्यातून मार्ग निघत जाईल. भावंडाबाबत चिंता संभवते. विचाराने रहावे. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. शुभ ता. ९, १४

### मकरः- घाईने निर्णय नको

जो वेळ आपल्या हातात आहे. त्याचा वेळीच सदुपयोग करावा. धनस्थ बुधाचा गुरुशी होणारा त्रिकोण योग आर्थिक बाबतीत शुभ फलदायी आहे. कार्यसिद्धीसाठी अधिक चिकाटीने प्रयत्न करावेत. डोळ्यांच्या तक्रारींची दखल घ्यावी. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार घाईने निर्णय घेऊ नका. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. शुभ ता. ८, १४

### कुंभः- स्वमताग्रह टाळावा

चांगल्या दिवसांची परीक्षा करता करता जीवन व्यर्थ होत जाते. राशीतील बुधाचा पंचमातील गुरूशी होणारा लाभ योग आर्थिक प्रगती करणार आहे.कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघेल. कौटुंबिक जीवनात मतभेदाचे प्रसंग टाळावेत, प्रकृतीची वेळीच काळजी घ्यावी. अपेक्षित संधी लाभतील. स्वमताग्रह टाळावा. व शुभ ता. ९, १४

### मीनः- कलागुणांचा विकास

स्वप्नाची दुनिया सुंदर आहे पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी कठोर प्रयत्न करावे लागतात. राशी स्वामी गुरूचा बुधाशी होणारा त्रिकोण योग सौख्यदायी आहे. वेळात मंगळ राहू त्यामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागृत रहावे. नव्या कामाना विचारपूर्वक गती द्यावी. प्रकृतीच्या तक्रारी राहतील. काळजी घ्यावी. कलागुणांचा विकास होईल. चिंता नको. शुभ ता. १४

!! शुभ भवतु !!

---

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# कल्याणगड (नांदगिरी)

महाराष्ट्र हे दुर्गवैभवाने समृद्ध राज्य आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेल्या प्रत्येक गिरीदुर्गाची एक स्वतंत्र कथा आणि वैशिष्ट्य आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार भोज, यादव काळापासून इतिहासाच्या पाऊलखुणा जपतसंपन्न झालेल्या या प्रदेशाला शिवकालीन इतिहासाच्यासुवर्णमय काळाने अधिकच झळाळी आली. या विविध राजसत्तांच्या काळात सह्याद्रीच्या डोंगर रांगेला गडकिल्ल्यांचा साज चढला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात तर या गडकोटांचे शस्त्रात रूपांतर होऊन स्वराज्य उभे राहिले. महाराजांनी बुलंद गडकिल्ल्यांसमवेत तितक्याच ताकदीची, कणखर माणसे घडविली. स्वराज्याच्या प्रत्येक लढाईत शूर मावळ्यांच्या साथीने एकेक किल्ला कित्येक महिने लढला. सध्या आपली भटकंती सातारा परिसरात सुरू आहे. या परिसरातील कल्याणगड हा एक महत्त्वाचा गिरीदुर्ग आहे.



सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात सातारा शहरापासून २० किलोमीटर आणि कोरेगावपासून १३ किलोमीटर अंतरावरकल्याणगड म्हणजेच नांदगिरीचा किल्ला वसलेला आहे. महादेव डोंगररांगेतील या किल्ल्याची उंची साधारण ३५०० फूट आहे. एका दिवसात आरामात गड फिरून परतता येते. नांदगिरीचा किल्ला शिलाहार राजा दुसरा भोज यांच्या काळात बांधला गेला असे म्हणतात. पारतंत्र्याच्या काळात किल्ला आदिलशाहीच्या ताब्यात होता. मराठ्यांच्या सातारा परिसरातील मोहिमेत नांदगिरी स्वराज्यात सामील झाला. त्यानंतर किल्ला पंत प्रतिनिधी यांच्या ताब्यात होता.त्यांच्याकडून दुसऱ्या बाजीरावांनी किल्ला जिंकून घेतला. स्वराज्यात हे राज्य कारभाराचे महत्त्वाचे ठिकाण होते, त्यामुळे किल्ल्यावर बराच राबता असे. किल्ल्यावर तालुक्याचे ठिकाण असल्याने येथून व्यवस्था चालविण्यास मामलेदार, फडणवीस, सबनीस, हवालदार, शिपाई यांच्या राहण्याची व्यवस्था किल्ल्यावरच होती. त्यानंतर इंग्रज राजवट आली. किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. इंग्रजअधिकारी जनरल प्रिझलर याने पडीक, निर्जन या शब्दात किल्ल्याचे वर्णन केले आहे. विध्वंसक लोकांना आपल्या किल्ल्यांचे महत्त्व कसे कळणार? आपल्यासाठी मात्र ही प्रेरणास्थळे आहेत. मुंबई- बंगळुरू महामार्गावर पुण्यावरून साताऱ्याला जाताना वनवासवाडी फाटा लागतो. तेथून गडपायथ्याच्या धुमाळवाडी, नांदगिरी गावात जाण्यासाठी रस्ता आहे.सातारा रोड बसस्थानकापासून धुमाळवाडी फक्त दोनकिलोमीटर अंतरावर आहे. गावातून किल्ल्यावर जाण्यास मळलेली पायवाट आहे. येथील डोंगरावर भरपूर पवनचक्क्या असल्याने डोंगरावर कच्च्या रस्त्यांचे जाळेविणलेले आहे. त्यामुळे खाजगी वाहन असल्यास या रस्त्यांनी गडमाथ्याच्या बऱ्याच जवळपर्यंत गाडीने जाता येते. गावातून कल्याणगडाचा आकार खिंडीच्या बाजूला एखाद्या जहाजासारखा दिसतो. धुमाळवाडीतून गडाच्यादिशेने निघालो तर सुरुवातीला पायऱ्या लागतात, हे हल्लीचे बांधकाम आहे. पायऱ्या संपल्या की, पाय वाटेने चढत आपण एका खांब टाक्याच्या जवळ पोहोचतो. खडकात कोरलेले हे खांबटाके पाहून अजून वर चढत गेलो की, आपण गडमाथ्याच्या जवळ पोहोचतो. गडाच्या खाली पठारावर पोहोचल्यावर उत्तरेला एक बुरूज आणि वरती एक इमारत दृष्टिक्षेपात येते. गडमाथ्याचा विस्तार मोठा असून त्याचा आकार निमुळता होत गेला आहे. गडमाथा गाठला की गडाच्या उत्तराभिमुख दरवाज्यातून आपला गडप्रवेश होतो.

गावकऱ्यांनी दरवाज्याला लोखंडी जाळीचा दरवाजा बसवलेला आहे. दरवाज्याच्या आतील पायऱ्या चढून वर गेलो की, एकखोली बांधली आहे. या खोलीच्या उजव्या बाजूची वाटगडाच्या वरच्या बाजूला जाते आणि डाव्या बाजूची वाटखाली उतरते. डाव्या बाजूच्या खाली उतरणाऱ्या वाटेवर पायऱ्यांनी उतरत गेलात तर आपल्याला एक गुहा दिसते. ही गुहा साधारण १५ ते २० फूट रुंद, १०० फूट लांब आहे. कल्याणगड या भुयारी मार्गासाठी प्रसिद्ध आहे. गुहा हे गडावरील मुख्य आकर्षण आहे, असेही म्हणता येईल.गुहेत आत गेल्यावर तीन दालने आहेत. त्यातील एकादालनात जैन तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ यांची मूर्ती आहे. डोक्यावर नागफणा असलेली ही मूर्ती नवव्या शतकातील आहे, असे अभ्यासक सांगतात. गुहेतील उर्वरित दोन दालनात श्री दत्तात्रेय आणि देवीची मूर्ती आहे. भुयारात वर्षभर थंडगार पाणी असते. साथीला कोणी असल्याशिवाय भुयारात जाणे तसे धोक्याचेच आहे. आता भाविकांनी भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूला कठडे बांधून वाट थोडी बांधून सोयीची केली आहे. कल्याणगड ट्रेक करताना भुयारात जायचे असल्याने सोबत टॉर्च असणे अनिवार्य आहे. गुहेच्या तोंडाशी मधमाशांची पोळी असतात, त्यामुळे सावध राहणे आवश्यक असते. येथे धूर करणे, फार मोठ्याने बोलणे, अत्तर किंवा सेंटचा उग्र वास, खाण्याच्या पदार्थांचा उग्र वास धोकादायक ठरू शकतो. कारण या सर्व गोष्टींनी मधमाश्या डिवचल्या जातात. तसेही ट्रेकिंग करताना, जंगलात फिरताना या गोष्टीची काळजी घेणे आवश्यक असते. ट्रेकिंगलाजाताना अंग पूर्ण झाकले जाईल असे कपडे, बुट मोजे, आवश्यक साहित्य (टॉर्च, मेडिकल किट, खाण्याचे पदार्थ, पाणी, एक कपड्यांचा जोड) सोबत असणे अनिवार्य आहे. भुयार पाहून वर आल्यावर गड माथ्याकडे चढायला सुरुवात करावी. काही पायऱ्या चढून गेल्यावर गडाचा दुसऱ्या पूर्वाभिमुख दरवाजा आहे. दरवाज्याच्या दोन्ही बाजूला दोन भक्कम बुरूज आहेत. हा दरवाजा लोखंडी जाळीचे दार बसवून सुरक्षित केला आहे. दरवाज्यातून आत गेल्यावर उजव्या बाजूला श्री हनुमान मंदिर आहे. दगडी बांधकाम असलेल्या या मंदिराच्या शिखरावर गणपती कोरलेला असून भिंतीवर मंदिराच्या जीर्णोद्धार संबंधी शिलालेख आहे. निनामपाडलीमधील दहाने बुवा यांनी यामंदिराचा जीर्णोद्धार केला, अशी माहिती मिळते. मंदिरात दर्शन घेऊन उर्वरित गड फिरून घ्यावा. गडावर बुरूज, काही जुन्या इमारती, खोल्या, कमानी, दरवाजे असे बांधकामाचे अवशेष आढळतात. गडावर 'बामण घर' नावाची एक वास्तू आहे. या वास्तूत गणेशमूर्ती आणि यज्ञकुंड आहे. येथे एक चुन्याच्या घाण्याचे चाकही आहे. गडावर एक समाधी चौथरा आहे. असे म्हणतात की, ही समाधी समर्थ रामदास स्वामींचे शिष्य कल्याणस्वामी यांची आहे. समाधीच्या समोर एक तळे आहे. तेथे नव्याने काही बांधकाम करण्यात आले आहे. आश्रम आणि भक्त निवासासाठी तीन खोल्या बांधल्या आहेत. गडावर एक मोठे सभागृह बांधले असून त्याच्या समोर मोठा सभामंडप आहे. कार्यक्रम असताना येथे ५० ते ६० लोकांची राहण्याची व्यवस्था होऊ शकते. सभामंडपाच्या बाजूला तटबंदीवर तलवारीचे शिल्प कोरलेला दगड पडलेला आहे. गडावर अजून एक समाधी आहे; ज्यावर शिवलिंग कोरलेली चौकोनी शिळा ठेवलेली आहे. गडावर खडकात खोदलेले पाण्याचे टाके आणि तळे आहेत. गड उंच कड्यांनी संरक्षित असल्याने आवश्यक तेथेच तटबंदी बांधलेली आहे.गडावर अब्दुल करीम नामक कोण्या पीराचे थडगे बांधलेले आहे. त्याच्या जवळच एक पडलेले बांधकाम आहे. बांधकामाचे कोरीव दगड विखुरलेले आहे. येथे पूर्वी नक्कीच मंदिर असावे. त्यातीलच एक दगड घेऊन हे पीराचे ठाणे उभारले असावे. कारण येथील स्थानिक लोकांनाही या पीरबाबांविषयी विशेष काही माहिती नाही. होळीच्या आधी येथे उरूस मात्र भरतो. दरवर्षी येथे जैनधर्मीय लोकांचेही धार्मिक कार्यक्रम होतात. आसपासच्या परिसरातील भाविक गडावर दर्शनास येतात. पौर्णिमेलागडावर भजन, कीर्तन, महाप्रसाद असतो. दर गुरुवारी भक्त दर्शनास येतात. त्या दिवशी खिचडी प्रसाद वाटपकेला जातो. गडावरून वर्धनगड, जरंडा, अजिंक्यतारा, चंदन- वंदन, वैराटगड, मोऱ्या, यवतेश्वर असा आजूबाजूचा परिसर दिसतो. सातारारोड परिसर, वग्ना आणि वसनानद्यांचे खोरे, यमाई देवीचा डोंगर, एकांबेचा डोंगर असे गडमाथ्यावरून छान दृश्य दिसते. हे गडकोट आपल्यापूर्वजांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीची, अतुलनीय शौर्याची प्रतीके आहेत, त्यांना जपणे आपले कर्तव्य आहे.

---

पान २ वरून

## तर्कटरावांची तडजोड

हे सारे सहना केल्यावरच नव्या पद्धती रूढ होतात अन्यथा परंपरागत आहे म्हणून आता न बदलता नंतर बदला, असेच सांगितले जाते. उलटणाऱ्या पिढ्या उलटतात; पुढच्या उलटण्याच्या स्थितीला येतात, पण बदल होत नाही. तो करायचा असेल तर, वाईटपणाची तयारी ठेवावी लागते. हे सारे वाचनातील संदर्भ आठवल्यावर तर्कटराव डोके गच्च धरून बसले. महत्प्रयासाने त्यांनी ते सारे बदलाचे विचार बाजूला सारले आणि ज्येष्ठांच्या पिढीचे मन राखण्यासाठी व त्यांना समाधान देण्यासाठी परंपरागत विधी व उपचारांच्या वाटेवर चालू लागले. कसे? आपले डोके त्यांना समजून घेणाऱ्या व्यक्तीकडे सोपवून आणि सर्वांचा विचार करणारे मन हातात घेऊन...

पान ३ वरून

## जंगलांच्या सहनशक्तीची कसोटी

संशोधनानुसार 'रिमोट सेन्सिंग' तंत्राचा वापर करून जंगलांवर अवलंबून असलेल्या कशेरुकी प्रजातींच्या वितरण क्षेत्रांमध्ये वर्षावनांची गुणवत्ता विश्लेषित करण्यात आली. ९० टक्क्यांपर्यंत जंगल या प्रजातींच्या क्षेत्रात अद्याप अस्तित्वात आहे; पण त्यापैकी केवळ २५ टक्के भागच उच्च गुणवत्तेचा आहे. तो विलुप्त होण्याचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक आहे. घनदाट वर्षावने जैवविविधतेसाठी अत्यावश्यक आहेत; पण ही महत्त्वाची जंगले किती प्रमाणात कमी झाली आहेत, हे पूर्वी स्पष्ट झाले नव्हते. क्विन्सलँडच्या ओलसर उष्णकटिबंधीय प्रदेशात आढळणाऱ्या 'गोल्डन बोवरबर्ड'ची घटती संख्या म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. त्याच्या ८४ टक्के अधिवास शिल्लक असला, तरी त्यापैकी फक्त ३६ टक्के भाग घनदाट वर्षावनाचा आहे. जैवविविधतेसाठी मानवनिर्मित व्यत्यय कमी करणे तितकेच आवश्यक आहे. एकंदरीत पुढील हानी टाळण्यासाठी सर्वाधिक घनदाट वर्षावनांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. (लेखक निसर्ग आणि प्राणिजीवनाचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## सक्षमीकरणाच्या दिशेने पुढचे पाऊल!

या सगळ्याच्या बरोबरीने महिलांना पगाराच्या दृष्टीने समान संधी मिळणे हेदेखील त्यांच्या सबलीकरणाच्या दिशेने पुढचे पाऊल टाकण्यासारखे आहे. कारण आजही अनेक क्षेत्रामध्ये पुरुषांएवढेच, प्रसंगी त्यांच्यापेक्षा अधिक कष्टाचे काम करूनही महिलांना कमी मोबदला मिळतो. घरगुती कामाचे तर कधीच मोल केले जात नाही. हा चर्चेत राहणारा एक चिरंतन मुद्दा आहे. महिलांवर कार्यस्थळी होणारा अन्याय, त्यांच्यावरील हिंसाचाराच्या वाढत्या घटना काळजी वाढविणार्या आहेत. त्यामुळेच एका-दुसर्या व्यक्तीने नव्हे, तर महिलांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी आणि विकासासाठी प्रेरित करण्यास संपूर्ण समाजाने सज्ज होण्याची गरज आहे. हे केल्यासच समाजातील महिलांचे स्थान सशक्त होईल आणि लिंग समानता आणखी मजबूत होईल.

पान ४ वरून

## निःश्वास

काही गोष्टी लक्षात येत होत्या. परीला तो जमेल तेवढं प्रेम देण्याचा प्रयत्न करीत होता. अशीच एक संध्याकाळ. मुलांना सांभाळणारी बाई परीला आणि ऐश्वर्यला फिरायला घेऊन गेली होती. मोहना आता ४५ च्या घरात आणि मोहित पन्नाशीच्या जवळपास होता. मोहनाचे सौंदर्य उतरणीला लागले होते. केसात पांढरी छटा, डोळ्याला चष्मा, वजन वाढलेले, ओढल्यासारखा चेहरा आणि डोळ्याखाली काळी वर्तुळे हे फक्त वाढत्या वयाचे लक्षण नव्हते. दोघेही आरामात बसून कॉफी घेत होते. एवढ्यात मोहित अगदी सहज बोलल्यासारखं म्हणाला, ''मोहना, हल्ली मनीष तुझ्या अजिबात संपर्कात नसतो का आणि घरीसुद्धा येत नाही? तो दुसरीकडे गेला आहे का? मला तो आज कुठेतरी दिसला होता.'' हे ऐकून ती चपापली. ''मला ना आपल्या ऐश्वर्यमध्ये त्याचा भास होतो.'' तो अतिशय थंड आवाजात बोलला आणि विचारात गुरफटलेली मोहना मोहितकडे आ वासून पाहात राहिली. तिच्या तोंडातून एकही अक्षर निघाले नाही. भविष्याच्या काळजीने तिच्या डोळ्याभोवतीची काळी वर्तुळे अजूनच दाट झाल्यासारखी वाटू लागली. तेवढ्यात परी आणि ऐश्वर्य धावत येऊन मोहितच्या गळ्यात पडले. दोघांनाही मोहितने जवळ घेतल्याचे पाहून मोहनाने निःश्वास सोडला...

पान ५ वरून

## गाणी, अभिनय, संगीत आणि आपण....

आणि अवकाश म्हणजे rabe या अर्थाने. म्हणजे त्या दृश्याची व्यापकता, ती जागा त्याचे निरीक्षण करा. तो काळ, ते वातावरण त्या दिग्दर्शकाने, कलाकारांनी कसे जिवंत केले आहे हे पहा.

आपण असे निरीक्षण फारसे करीत नाही. ती दृष्टी आपण हळूहळू विकसित केली तर आपण अशा अक्षर आणि अजरामर कलाकृतींचा आस्वाद घेऊ शकू.पूर्वी ही गाणी, किंवा चित्रपट तयार करताना महिनोंमहिने मेहनत घेतली जायची. रियाज केला जायचा. त्यातून अशी सदाबहार गीते जन्माला यायची. गाण्यामध्ये वाद्यांचा ढणढणाट नसायचा, मोजकीच वाद्ये असायची. गाण्याचे बोल अर्थपूर्ण असायचे. मंद संगीत, सुरेख चाल इ. मुळे गाणी श्रवणीय व्हायची.

गाणी गाताना नाचणार्या अनावश्यक व्यक्तींचा ताफा किंवा पलटण नसायची. या पार्श्वभूमीवर आजच्या गाण्यांची आपण तुलना करू शकता. आजही काही चांगली गाणी निर्माण होतात. नाही असे नाही पण बोटावर मोजण्याएवढीच.

पान ५ वरून

## आयुर्वेदातील औषधिकल्पासाठी रसायनशास्त्र

यात- अ) रसशास्त्रीय प्रक्रियेतील रासायनिक रूपांतरे कोणती, ब) पीएच मीटर, कॅलरी मीटर, सेंट्रिफ्यूज, स्पेक्ट्रोफोटो मीटर अशा अत्याधुनीक उपकरणांचे महत्त्व) आजच्या आयु. शिक्षणक्रमातील रसायनशास्त्राच्या उणिवा शोधून त्या दूर करणे. ३) गृहीतके : अ)आयुर्वेदासाठी रयायनशास्त्र हे पूरकच आहे, त्यामुळे औषधनिर्मितीची गुणवत्ता वाढते. ब)भस्म निर्मितीतील पारंपरिक प्रक्रिया आणि आधुनिक विश्लेषण हे एकमेकांशी सुसंगतच आहेत.

४) पद्धतिशास्त्र: १) चरक, सुश्रुत आणि रसरत्नसमुच्चय यांचा अभ्यास, २) यंत्रांच्या साहाय्याने भस्मांचे एक्सआरडी (क्ष किरण विवर्तन), आयएसपी (भारतीय मानांक), एमएस विश्लेषण, आसव आणि अरिष्टांतील किण्वन घटकांचे रासायनिक परीक्षण. ३) द्रव्यगुण आणि सायटोकेमेस्टी तसेच रस-वीर्य-विपाक आणि फार्मोडायनॅमिक्स यांचा एकत्रित अभ्यास.

५) संदर्भ: अ) द्रव्यगुणचर्चेतील शोधन-मारण प्रक्रिया, ब) आधुनिक संशोधनपत्रातील ड्रग स्टँडर्डाझेशनविषयक लेखन, जागतिक आरोग्य संघटनेची मार्गदर्शक तत्त्वे, क) आयुष मंत्रालयाची प्रकाशने.

६) रस-वीर्य-विपाक आणि प्रभाव यांना आधुनिक रसयनाशास्त्रीय समांतर संज्ञांशी सांधणे. उत्साही आणि चिकाटी संशोधकांच्या प्रतीक्षेत पुढीलप्रमाणे अनेक विषय आहेत.

१) भस्मांची नॅनोपार्टिकल संरचना, २) किण्वित आयुर्वेदिक औषधे, ३) आयुर्वेदातील रसायन कल्पना आणि ऑक्सिडेशन सिद्धांतांचा पारस्परिक संबंध. (कृतज्ञता : या लेखासाठी मला वैद्यराज धामणकर शास्त्रींच्या ६० वर्षांपूर्वीच्या एका व्याख्यानाचा उपयोग झाला)

# सायबर दरोडे बनताहेत राष्ट्रीय समस्या



वेधक

भागवत सोनावणे

सायबर फसवणूक म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे केली जाणारी फसवी कृत्ये. अनधिकृत प्रवेश, डेटा चोरी किंवा ऑनलाईन घोटाळे आदींचा त्यात समावेश होतो. पीडितांना आर्थिक नुकसान पोहोचविणे हा अनेकदा त्यामागील उद्देश असतो. २०२२ मधील सायबर गुन्ह्यांमध्ये १०.२९ लाखांवरून २०२४ मध्ये २२.६८ लाखांपर्यंत वाढ होणे हे भारतातील डिजिटल धोक्यांचे वाढते प्रमाण आणि गुंतागुंत दर्शवते.

'नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल' (एनसीआरपी) वर सायबर फसवणुकीची नोंद ३६.४५ लाख इतकी झाली आहे. हे आकडे वाढत्या आव्हानांकडे निर्देश करीत असताना देशातील गुप्त माहिती गोळा करणे आणि अहवाल देण्याच्या यंत्रणेतील लक्षणीय प्रगती अधोरेखित करतात. असे असले तरी सायबर फसवणूक, विशेषतः डिजिटल अटकेद्वारे लोकांचे पैसे लुटणे या प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सीबीआय, बँका आणि रिझर्व्ह बँकेवर दाखविलेली नाराजी लोकांना फसवणुकीपासून वाचविण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात नसल्याचे उघड करते. सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण विशेष गंभीर आहे. अनेक प्रकरणांमध्ये विशेषतः डिजिटल अटकेशी प्रकरणांमध्ये बँक अधिकारी आरोपींशी संगनमत करतात. त्यामुळे सायबर फसवणूक करणाऱ्यांना लोकांची बचत सहज लुटता येते. हे निरीक्षण निराधार नाही. कारण बँका फसवणुकीद्वारे हस्तांतरित केलेला निधी जप्त करण्यासाठी वेळेवर कारवाई करीत नाहीत, असे आढळून आले आहे.

निधी हस्तांतरित केला जातो त्या खात्यांवर बँका त्वरित कारवाई का करीत नाहीत, हे समजणे कठीण आहे. तत्परतेचा हा अभाव बँकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. बँक कर्मचारी सतर्क राहिले, तर सायबर फसवणुकीच्या घटनांना मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल. बँकांकडे खात्यातून काढलेले पैसे एकामागून एक अनेक खात्यांमध्ये हस्तांतरित केले जात आहेत का, हे शोधणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. हे सहसा सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये घडते. परिणामी सर्वोच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला फसवणुकीने काढल्या गेलेल्या निधीसाठी बँकांची जबाबदारी निश्चित करण्याचे आदेश दिले. सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये पोलिस आणि इतर एजन्सींकडून त्वरित कारवाईची आवश्यकता असताना अनेकदा हलगर्जीपणा दिसून येतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला अशा प्रकरणांमध्ये सीबीआयला त्वरित कारवाई करण्याचे निर्देश द्यावे लागले. हे साध्य होईल का, हे पाहावे लागेल. कारण सायबर फसवणुकीच्या वाढत्या प्रमाणामुळे सीबीआय त्या सर्वांची चौकशी करू शकेल की नाही, याबाबत शंका आहे.

सायबर फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी करण्यात पोलिसांनाही सक्षम असणे आवश्यक आहे. सायबर फसवणूक रोखण्यासाठी गृह मंत्रालय, रिझर्व्ह बँक आणि टेलिकॉम ऑथॉरिटी यांच्यात समन्वय वाढविण्याची गरज सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केली आणि देशभरात मानक कार्यपद्धती लागू करण्याचे निर्देश दिले. सरकारने हे काम आधीच स्वतः केले असते तर बरे झाले असते. डिजिटल फसवणुकीद्वारे ५४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम पळविण्यात आली आहे. हे नकळत घडू शकत नाही. ही रक्कम अनेक लहान राज्यांच्या बजेटपेक्षा जास्त आहे. त्यामुळेच देशातील सायबर फसवणुकीच्या वेगाने वाढणाऱ्या प्रकरणांवर सर्वोच्च न्यायालयाने कडक पवित्रा घेतला आहे.

न्यायालयाने तीव्र टीका करताना म्हटले आहे की, देशातील ५४ हजार कोटी रुपयांची डिजिटल फसवणूक ही थेट दरोड्याचा प्रकार आहे. सायबर फसवणुकीच्या, विशेषतः डिजिटल अटकेद्वारे ग्राहकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्याच्या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने जबाबदार भागधारकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सीबीआय, बँका आणि रिझर्व्ह बँकेच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.



**भारताची सायबर स्पेस पूर्वीपेक्षा जास्त व्यस्त आहे. 'डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत लक्षणीय प्रगती दर्शविणारी ८६ टक्क्यांहून अधिक कुटुंबे आता इंटरनेटशी जोडलेली आहेत. 'डिजिटल लॅण्डस्केप'च्या विस्तारामुळे डिजिटल सेवा नागरिकांच्या बोटांवर उपलब्ध झाल्या आहेत. परंतु यामुळे सायबर हल्ल्यांची शक्यता वाढली आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा हे राष्ट्रीय प्राधान्य बनले आहे.**

लोकांच्या कष्टाने कमावलेल्या पैशाचे रक्षण करण्यासाठी या संस्थांनी वेळेवर आवश्यक पावले उचलली नाहीत, असा ठपका सर्वोच्च न्यायालयाने ठेवला आहे. डिजिटल फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाने काही बँक अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बँक अधिकाऱ्यांच्या नाकाखाली सायबर फसवणूक करणारे खातेदारांकडून कोट्यवधी रुपये कसे चोरू शकले, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. या सायबर फसवणुकीमध्ये बँक अधिकारी निष्काळजी किंवा सहभागी असू शकतात, अशी चिंता न्यायालयाने व्यक्त केली. सायबर फसवणूक थेट दरोडा असल्याचे सांगत न्यायालयाने केंद्र सरकारला ही फसवणूक रोखण्यासाठी एक मानक कार्यप्रणाली (एसओपी) विकसित करण्याचे निर्देश दिले. शिवाय न्यायालयाने गृह मंत्रालयाला रिझर्व्ह बँक, दूरसंचार विभाग आणि इतर भागधारकांसाठी चार आठवड्यांच्या आत एक 'एसओपी' तयार करण्याचे निर्देश दिले. बँकांच्या कामगिरीवर नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने बँका सार्वजनिक पैशाच्या विश्वस्त आहेत आणि त्यांनी जनतेचा विश्वासघात करू नये, असे म्हटले आहे. सायबर फसवणुकीची लाखो प्रकरणे नोंदविली जात असल्याबद्दल न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली. डिजिटल अटक आणि इतर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये सायबर गुन्हेगार कोट्यवधी रुपये इतर खात्यांमध्ये हस्तांतरित करीत असताना बँका वेळेवर कारवाई का करीत नाहीत, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.


एका खात्यातून काढलेली मोठी रक्कम इतर खात्यांमध्ये जलद गतीने कशी हस्तांतरित केली जाते, यावर लक्ष ठेवण्यासाठी बँकांची एक यंत्रणा असणे आवश्यक आहे, यात शंका नाही. बँकांच्या सुरक्षा यंत्रणांनी अशा प्रकरणांची त्वरित दखल घेतली पाहिजे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाला रिझर्व्ह बँकेवर टिप्पणी करावी लागली. सायबर फसवणुकीद्वारे चोरी केलेल्या खात्यांसाठी बँकांना जबाबदार धरण्याची मागणी केली. बँका, पोलिस आणि इतर एजन्सींनी त्वरित कारवाई केली तर फसव्या व्यवहारांमुळे होणारे नुकसान कमी करता येईल, यात शंका नाही. एकाच वर्षात सायबर फसवणुकीच्या २२ लाख तक्रारी नोंदविल्या गेल्या आहेत. हे प्रमाण पाहता सीबीआय आणि इतर एजन्सी सायबर फसवणुकीच्या प्रकरणांना त्वरित आळाघालू शकतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. यागुन्ह्यांची संख्या कमी करण्यासाठी पोलिस आणि इतर एजन्सींना प्रशिक्षण देणे आणि सक्षम करणे, ही काळाची गरज आहे.

देशाचे गृह मंत्रालय, मध्यवर्ती बँक आणि दूरसंचार प्राधिकरण यांनी या दिशेने तातडीने एकत्रितपणे काम केले, तरच हे शक्य आहे. सायबर लुटीत केवळ राष्ट्रीयच नाही, तर आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांचाही सहभाग आहे. देशातील वृद्ध, निवृत्तकर्मचारी आणि निष्पाप लोकांना सायबर फसवणुकीचे लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे केंद्र सरकारने राज्यसरकार आणि इतर संस्थांशी समन्वय साधून युद्धपातळीवर काम करणे आवश्यक आहे.

सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी भारतीय सायबर गुन्हेसमन्वय केंद्र (आय ४ सी) ची स्थापना करण्यात आली आहे. तथापि, संविधानाच्या सातव्या अनुसूची अंतर्गतपोलिस आणि कायदा आणि सुव्यवस्था हे राज्यांचे विषयआहेत. सायबर आणि इतर गुन्ह्यांना रोखण्याचा, शोधण्याचा, तपास करण्याचा आणि खटला चालविण्याचा अधिकार राज्यांना आहे. सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी केंद्र सरकार राज्यांना मार्गदर्शक तत्त्वे आणि आर्थिक मदत पुरविते.

सायबर गुन्ह्यांशी संबंधित तक्रारी नोंदविण्यासाठी राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल तयार करण्यातआले आहे. या पोर्टलवर नागरिक सायबर गुन्ह्यांविरुद्ध तक्रारी दाखल करू शकतात. महिला आणि मुलांविरुद्ध सायबर गुन्ह्यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. गेल्या वर्षी डिसेंबरपर्यंत या प्रणालीला आर्थिक फसवणुकीच्या २३.६१ लाख तक्रारी प्राप्त झाल्या. त्यात फसवणूक करणाऱ्यांकडून ८१८९ कोटी रुपये वाचविण्यात आले. सायबर गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये बँका, सिम कार्ड कंपन्या आणि पोलिसांच्या वेगवेगळ्या कार्यपद्धतींमुळे गुन्हेगारांना पळून जाणे सोपे झाले. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, 'आय फोर सी'ने 'एस फोर सी'हा डॅशबोर्ड लाँच केला आहे. हा डॅशबोर्ड 'रिअल टाईमट्रॅकिंग' सक्षम करेल.

सायबर गुन्ह्याची तक्रार येताच, बँका आणि पोलिस ताबडतोब व्यवहाराचा मागोवा घेऊ शकतील आणि सायबर गुन्ह्यासाठी कोणत्या सिमकार्डचा वापर करण्यात आला आणि कोणत्या बँक खात्यात पैसे हस्तांतरित करण्यात आले, हे ओळखू शकतील. ही माहिती सायबर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या सर्व एजन्सींद्वारे एकत्रित केली जाईल. यामुळे सायबर गुन्हेगारांविरुद्ध तपास आणि कारवाई वेगवान होईल आणि पुरावे गोळा करण्यास मदत होईल. हाडॅशबोर्ड बनावट बँक खाती आणि 'मनी लॉण्ड्रिंग'ला आळा घालण्यास, बनावट सिम कार्ड आणि ई-सिमचा गैरवापर रोखण्यास आणि सायबर फसवणूक आणि मानवी तस्करीद्वारे कार्यरत असलेल्या टोळ्यांना ओळखण्यास मदत करेल.



**गेल्या वर्षापर्यंत आम्ही मृत देश होतो; आज आम्ही जगातील सर्वांत 'हॉटेस्ट' देश आहोत, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प संसदेत केलेल्या भाषणात काल म्हणाले. ट्रम्प यांच्या या विधानात आत्मविश्वासापेक्षा आत्मप्रौढीपणाच अधिक जाणवतो. कारण, एखाद्या राष्ट्राच्या स्थितीचे मूल्यांकन 'मृत' किंवा 'हॉटेस्ट' अशा दोन टोकांवर करणे हे राजकीय प्रभावासाठी उपयुक्त ठरते; परंतु या दोन टोकांमधील काळात जागतिक व्यवस्थेमध्ये वाढलेली गुंतागुंत, नैतिकता यांचे या मूल्यांकनामध्ये स्थान काय? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. त्यामुळे ट्रम्प यांच्या विधानाकडे बघताना, सर्वांगाचा वेध घेणे क्रमप्राप्त ठरते.**

# विवेकशून्य महासत्तेचा आत्मप्रौढीपणा

परराष्ट्रकारण

कौस्तुभ वीरकर

ट्रम्प यांनी सत्तेमध्ये येताच धोरण म्हणून स्वीकारलेल्या आयातशुल्क युद्धामुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत काही सकारात्मक हालचाली झाल्या, हे मान्य करावे लागेल. सरकारी तिजोरीमध्ये मोठ्या प्रमाणात महसूल जमा होणे, उत्पादन क्षेत्राला चालना, गुंतवणूक वाढ या बाबींचा उल्लेख वारंवार केला जातो. परंतु, महासत्तेच्या अर्थव्यवस्थेवरील राष्ट्रीय कर्जाचा प्रचंड बोजा, वाढती वित्तीय तूट आणि वैयक्तिक कर्जाचे ओझे ही वस्तुस्थितीही तितकीच ठळक आहे. महसूल नसल्याने प्रशासनातील अनेक विभाग बंद करण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतल्याने बहुतांशी नागरिकांना शासकीय सेवा मिळवण्यात अडथळा येत आहे. त्यामुळे आज ट्रम्प संसदेत पाठ जरी थोपटत असले, तरीही वास्तव भिन्न ठरते.

अमेरिकेची आजवरची श्रीमंती ही केवळ नवोन्मेष, तंत्रज्ञान आणि उद्यमशीलतेचेच फलित नाही; ती जागतिक सत्तासंतुलनातील वर्चस्वाचाही परिणाम आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर उभी राहिलेली आर्थिक व्यवस्था, डॉलरचे प्रभुत्व, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे, व्यापार- नियमांवरील प्रभाव यांनी अमेरिकेला अभूतपूर्व सामर्थ्य मिळवून दिले. परंतु, त्याचबरोबर मध्य-पूर्वेतील युद्धे, निर्बंध आणि लष्करी हस्तक्षेप यामुळे अनेक देशांमध्ये अस्थिरताही निर्माण झाली. अमेरिकेच्या स्वार्थी डंखातून आजवर ती राष्ट्रे सावरू शकलेली नाहीत. अमेरिकेने लोकशाही आणि मानवाधिकारांच्या नावाखाली केलेल्या कारवायांनी अनेक प्रदेश अस्थिर केले. या अस्थैर्याच्या किमतीतून उभ्या राहिलेल्या समृद्धीला जिवंतपणा म्हणावे की सामर्थ्यामुळे आलेली निर्दयता, हा विचारही ट्रम्प यांच्या भाषणाच्या पार्श्वभूमीवर करावा लागतो. ट्रम्प यांच्या धोरणात आक्रमक राष्ट्रवादाचा प्रभाव स्पष्ट आहे. व्यापारात शुल्कवाढ, करारांचे पुनरावलोकन, मित्रराष्ट्रांशीही कठोर भूमिका या सर्वांनी जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता वाढवली आहे. आज जागतिकीकरणाच्या युगात कोणताही देश एकाकी बेटासारखा राहू शकत नाही.

ट्रम्प यांनी 'अमेरिका प्रथम' या घोषणेचा स्वीकार करताना जगाला दुय्यम मानल्याने आज जागतिक स्थैर्यालाच तडा गेला आहे. लोकशाहीची ताकद केवळ निवडणुकांमध्ये नसते; ती मतभिन्नतेला दिलेल्या स्थानात आणि संस्थांच्या स्वायत्ततेत-ही असते. मात्र, ट्रम्प जेव्हा अमेरिकेच्या लोकशाहीचे उघड गुणगान गातात, तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा केलेला अवमान कसा न्याय ठरेल? हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. अशा वेळी देशात अस्वस्थता वाढते, संसदेत स्वत:चीच पाठ थोपटून घेतल्याने या परिस्थितीवर पडदा टाकता येऊ शकतो; पण त्याने ती अस्वस्थता नाहीशी होत नाही. महासत्ता म्हणून आज अमेरिकेकडून केवळ स्वार्थी आर्थिक प्रगतीची अपेक्षा नसते, नैतिक नेतृत्वाचीही अपेक्षा जगाला असते. दुसर्या महायुद्धानंतर अमेरिकेने बहुपक्षीयतेला चालना देत आंतरराष्ट्रीय संस्थांची उभारणी केली. आज मात्र त्या संस्थांकडे संशयाने पाहणे, करारांमधून माघार घेणे आणि स्वार्थप्रधान भूमिकेला प्राधान्य देणे या प्रवृत्तीच अमेरिकेच्या धोरणाचा भाग दिसतात.

'मृत देश' ही उपमा विरोधकांना खिजवण्यासाठी प्रसंगी एखादवेळ राजकीय भाषणात प्रभावी ठरूदेखील शकते; पण एखादा देश खरोखर मृत ठरतो, तो नैतिक अध:पतनामुळे. आज अमेरिका किती वेगाने धावत आहे हा प्रश्न नसून, ती कोणत्या दिशेने धावत आहे, हा खरा प्रश्न आहे. कोणत्याही महासत्तेचे खरे महत्त्व तिच्या सामर्थ्यात नव्हे, तर त्या सामर्थ्याच्या वापरातील विवेकात असते आणि याच विवेकाची कमतरता ट्रम्प यांच्या धोरणाप्रमाणेच त्यांच्या विचारांमध्येही दिसू लागली आहे, हीच चिंतेची बाब!



# योगायोग की रणनीती?

**पश्चिम आशियात इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष तीव्र होत असताना पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणावही उफाळून आला. या दोन संघर्षांचा एकमेकांशी थेट संबंध नसला, तरी या घडामोडींना व्यापक भू-राजकीय संदर्भात पाहणे आवश्यक आहे. विशेषतः इराणचा मित्रदेश मानल्या जाणाऱ्या पाकिस्तानला व्यस्त ठेवण्याचा हा अप्रत्यक्ष प्रयत्न आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील वाढता तणाव हा योगायोग की रणनीती हा प्रश्न उपस्थित होतो.**

वेध

ओंकार मुळ्ये

इराण आणि इस्रायल यांच्यातील वैर हे केवळ सीमावाद किंवा तात्कालिक कारणांपुरते मर्यादित नाही. पश्चिमआशियातील प्रभाव वाढवण्याच्या स्पर्धेत दोन्ही देश एकमेकांचे प्रमुख प्रतिस्पर्धी मानले जातात. इराण विविध प्रादेशिक गटांना पाठिंबा देतो, तर इस्रायल इराणच्या लष्करी आणि अणुक्षमतेला धोका मानतो. त्यामुळे संघर्षाचे स्वरूप अनेकदा थेट युद्धापेक्षा अप्रत्यक्ष कारवायांमध्ये दिसते. याच काळात पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील तणाव वाढलेला दिसतो. विशेषतः सीमाभागात चकमकी आणि हल्ले घडत असल्याने पाकिस्तानचे लक्ष पश्चिमसीमेकडे वळले आहे. परिणामी, पाकिस्तानला व्यापक इस्लामी किंवा प्रादेशिक राजकारणात सक्रिय भूमिका घेणे कठीण होते. जर पाकिस्तान अफगाणिस्तानच्या सीमावादात गुंतलेला राहिला, तर तो इराणला थेट किंवा अप्रत्यक्ष मदत करण्याच्या स्थितीत राहणार नाही. जरी पाकिस्तानने इराणला लष्करी मदत करण्याची शक्यता फार मोठी नसली, तरी राजनैतिक पाठिंबा, सीमावत सहकार्य किंवा सामरिक समन्वय यामध्ये त्याची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे पाकिस्तान अंतर्गत किंवा सीमावत प्रश्नांमध्ये अडकून राहणे, हे इराणसाठी काही प्रमाणात तोट्याचे ठरू शकते.

इराणवर इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यानंतर सुरू झालेल्या युद्धामुळे पाकिस्तानमध्येही घबराट पसरली. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ यांनी इशारा दिला आहे की, इराणशी संबंधित युद्धाचा परिणाम पाकिस्तानपर्यंत पोहोचू शकतो. त्यांनी इराणमधील युद्धाला 'जायोनिझम(यहुदीवाद) अजेंडा' असे संबोधले असून, इस्रायलचा प्रभाव पाकिस्तानच्या सीमांपर्यंत वाढवणे, हा त्यामागचा उद्देश असल्याचा आरोप केला. आंतरराष्ट्रीय राजकारणात एखाद्या देशाला एकाच वेळी अनेक सीमांवर व्यस्त ठेवणे, हे नवीन नाही. याला साधारणपणे 'मल्टी-फ्रंट प्रेशर' किंवा 'स्ट्रॅटेजिक डिस्ट्रॅक्शन' असे म्हटले जाते. जर एखादा देश एका सीमेजवळ संघर्षात अडकला, तर दुसऱ्या सीमेकडे त्याचे लक्ष आणि संसाधने कमी होतात. पाकिस्तानच्या बाबतीत पूर्वेला भारत आणि पश्चिमेला अफगाणिस्तान-इराण हा संवेदनशील पट्टा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान तणाव वाढलेला असताना त्याच काळात अफगाणिस्तानकडून पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका दिसून आली. आता इराण-इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवरही पाकिस्तानच्या पश्चिमसीमेकडील तणाव वाढलेला दिसतो. दुसरी शक्यता अशी की, पाकिस्तान एकाच वेळी अनेक समस्यांमध्ये अडकला, तर त्याची बाह्य राजकारणातील क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत तो इराणसारख्या देशाला उघड पाठिंबा देणे किंवा भारताविरुद्ध आक्रमक भूमिका घेणे, मर्यादित करू शकतो.

सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान हा इराणचा औपचारिक लष्करी मित्रदेश नाही, तर व्यावहारिक संबंध ठेवणारा शेजारी देश आहे. त्यामुळे पाकिस्तानला जाणीवपूर्वक गाफील ठेवण्यासाठी संघर्ष छेडला गेला, असे ठामपणे म्हणणे कठीण आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा समांतर घडामोडींचा फायदा विविध शक्ती घेतात, हेही तितकेच खरे. इराण-इस्रायल संघर्ष आणि पाकिस्तान-अफगाणिस्तान तणाव या स्वतंत्र घटना असल्या, तरी त्यांचे परिणामएकमेकांवर अप्रत्यक्षपणे होऊ शकतात. या सर्व घडामोडींकडे पाहताना एक गोष्ट स्पष्ट दिसते, भू-राजकारणात कोणतीही घटना पूर्णपणे वेगळी किंवा एकाकी नसते. आंतरराष्ट्रीय राजकारणात एखाद्या देशाला अनेक आघाड्यांवर गुंतवून ठेवणे, ही जुनी आणि परीक्षित रणनीती मानली जाते. एकूणच काय तर आज घडणाऱ्या या घटना योगायोग आहेत की, मोठ्या पटावरील नियोजित रणनीती हे भविष्यात अधिक स्पष्ट होईल; पण इतके मात्र निश्चित की, बहुआघाडी तणावाच्या सावटाखाली कोणतेही राष्ट्र दीर्घकाळ प्रभावी भूमिका बजावू शकत नाही!

आकलन

अनय जोगळेकर

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तेल अविवमधून भारताकडे प्रयाण केल्यानंतर अवघ्या ३६ तासांनी अमेरिका आणि इस्रायलने इराणवरील हवाई हल्ल्यांना सुरुवात केली. या कारवाईला इस्रायलने 'ऑपरेशन रायसिंग लायन', तर अमेरिकेने 'एपिक फ्युरी' असे नाव दिले. इराणच्या नेतृत्वाने वेळोवेळी इस्रायलचे अस्तित्व जगाच्या नकाशातून पुसून टाकण्याची धमकी दिली होती. दि. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी 'हमास'ने इस्रायलवर केलेल्या दहशतवादी हल्ल्यांला प्रत्युत्तर देताना इस्रायलने इराणचे समर्थन असलेल्या 'हमास' आणि लेबनॉनमधील 'हिजबुल्ला'चे कंबरडे मोडले. सीरियामध्ये उठाव होऊन इराणशी मित्रत्वाचे संबंध असलेली बशर अल असद यांची राजवट उलथवली गेली.

केली आहे. इराणच्या हल्ल्यांमध्ये फारशी प्राणहानी झाली नसली, तरी अनेक आखाती देशांतील विमानतळ पूर्णपणे बंद झाले आहेत. या भागातून विमान-वाहतुकीला धोका असल्यामुळे जगभरातील अनेक प्रवासी मार्ग ठप्प झाले आहेत. इराणने सौदी अरेबिया आणि कतारच्या तेलशुद्धीकरण, तसेच नैसर्गिक वायू प्रकल्पांवर हल्ले केले असून, पर्शियन आखात तेलाच्या वाहतुकीसाठी बंद केल्याची धमकी दिली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव ८० डॉलरच्या वरती गेले आहेत. हा संपूर्ण भाग भारतासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. या देशांमध्ये एक कोटींहून अधिक भारतीय वसले असून, त्यांनी पाठवलेल्या पैशांतून; तसेच या देशांशी असलेल्या व्यापार आणि गुंतवणुकीतून भारतीय अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागतो. आखातातून जगभरातील खनिज तेलापैकी सुमारे २० टक्के तेलाची वाहतूक होत असली, तरी भारताच्या तेल आयातीच्या

इराणमधील सत्तेची सर्व केंद्रे सर्वोच्च नेते अली खामेनी, 'रिव्हॉल्युशनरी गार्ड' हे समांतर सैन्य आणि त्यांच्यातील 'अल-कुद्स' या कमांडो पथकाकडे एकवटले असले; तरी ही सत्ता अनेक स्तरांची आहे. यात एकीकडे लोकांकडून निवडले गेलेले अध्यक्ष आहेत, दुसरीकडे संसद आहे, तिसरीकडे सर्वोच्च नेत्याची निवड करणारे धर्मगुरूंचे मंडळ आहे. याशिवाय, इराणचे सैन्य आणि इस्लामिक शासन व्यवस्थेची अंमलबजावणी करणारी 'बसिज' ही स्थानिक पातळीवरील गुंडांची संघटनाही आहे.

इराणचे तत्कालीन सर्वोच्च नेते अयातुल्ला रुहोल्ला खोमेनी यांनी इराणमध्ये शाहची राजवट उलथवली जात असताना, त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या वर्गाला संघटित केले. 'बसिज' ही स्वयंसेवकांची निम लष्करी संघटना आहे. 'बसिज' जोपर्यंत बाजू बदलत नाही, तोपर्यंत इराणमधील लोकांच्या हातात सत्ता जाणे अवघड आहे. असे झाल्यास इराणमध्ये सध्याच्याच

# इराणविरुद्ध युद्ध लवकर थांबणे भारताच्या हिताचे!

जून २०२५ मध्ये अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराणमधील १२ दिवसांच्या युद्धामध्ये इराणच्या अणुप्रकल्पांचे मोठे नुकसान झाले. इराणची अण्वस्त्र बनवण्याची क्षमता काही वर्षे पुढे ढकलली गेली असली, तरी इराणने दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे बनवण्याच्या प्रकल्पांना गती दिली. इराण इस्रायलवर एकाच वेळेस शेकडो क्षेपणास्त्रांचा मारा करून त्याची हवाई हल्ले प्रतिकारक शक्ती नष्ट करण्याची योजना आखत होता. यावर्षी इराणमधील आर्थिक संकटाने उचल खाल्ल्यामुळे महागाई आणि बेरोजगारीला कंटाळून लाखो लोक सरकारविरोधात रस्त्यावर उतरले. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला चेतावणी दिल्यानंतर इराण वाटाघाटींमध्ये सहभागी झाला असला, तरी धोरण वेळकाढूपणाचे होते.



**कोणतेही युद्ध हे फार काळ धुमसत राहिले, तर त्याचे साहजिकच जागतिक पुरवठा साखळीवर विपरीत परिणाम दिसून येतात. रशिया-युक्रेनचे चार वर्षांहून अधिक काळ सुरु असलेले युद्ध हे त्याचेच उदाहरण. सध्याचे इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिकेचे युद्धही दीर्घकाळ कुणालाही परवडणारे नाही. म्हणूनच इराणविरुद्धचे युद्ध लवकर थांबणे हे भारताच्याही हिताचेच ठरावे.**

युद्धाच्या पहिल्या काही तासांतच अमेरिका आणि इस्रायलच्या विमानांनी इराणमधील महत्त्वाच्या शहरांवरील सैन्यतळ, तसेच आंतरखंडीय क्षेपणास्त्रनिर्मिती प्रकल्प आणि साठवणूक केंद्रांवर हल्ले चढवले. राजधानी तेहरानमधील हल्ल्यामध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली हुसेनी खामेनी यांच्या निवासस्थानाला लक्ष्य करण्यात आले. त्यात स्वतः खामेनी, इराणचे लष्कर प्रमुख, खामेनींच्या परिवारातील काही सदस्य आणि इराणच्या लष्करी नेतृत्वातील सुमारे ४० महत्त्वाचे अधिकारी मारले गेले. या हल्ल्यांमध्ये इराणचे मोठे नुकसान झाले. आजवर या हल्ल्यांमध्ये इराणमधील ५००हून अधिक लोक मारले गेले असून, त्यात मुख्यतः इराणच्या इस्लामिक राजवटीशी संबंधित लोकांचा समावेश आहे. मिनाब येथील एका शाळेवरील हल्ल्यांमध्ये १००हून अधिक मुले मारली गेली. प्रत्युत्तरादाखल इराणने इस्रायलसोबतच आखातातील अमेरिकेचे सैन्य किंवा नाविक तळ असणाऱ्या आठ देशांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करण्यास सुरुवात केली. यामध्ये सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, बहारीन, कतार, ओमान, जॉर्डन आणि कुवेतचा समावेश आहे. इराण आणि अमेरिकेत मध्यस्थीचे प्रयत्न करणाऱ्या ओमान आणि इराणचा मित्रदेश असलेल्या इराकमध्येही काही हल्ले करण्यात आले. या युद्धामध्ये इराणच्या बाजूने लेबनॉनमधील 'हिजबुल्ला' या 'शिया' दहशतवादी संघटनेने उडी घेऊन इस्रायलवर हल्ले करण्यास सुरुवात

सुमारे ४० टक्के तेल या भागातून पुरवण्यात येते. या युद्धाचे जागतिक राजकारणावरही मोठ्या प्रमाणावर परिणामहोत आहेत. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अमेरिकेशी वितुष्ट आलेल्या कॅनडा, तसेच फ्रान्स, ब्रिटन, जर्मनी आणि अन्य अनेक युरोपीय देशांनी अमेरिकेच्या कारवाईला पाठिंबा दिला आहे. आखाती अरब देशांनी अमेरिकेला इराणविरुद्ध कारवाईमध्ये आपल्या देशांतील तळांचा वापर करण्यास नकार दिला होता. तरीही, इराणने या देशांवर हल्ला केल्यामुळे त्यांच्यापैकी काही देशही इराणविरुद्ध हल्ल्यांमध्ये सहभागी होऊ शकतात.

युद्धाच्या घोषणेनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला संबोधित करत असताना इराणच्या जनतेला पुढे येऊन उठाव करण्याचे आवाहन केले. अमेरिकेने 'रिव्हॉल्युशनरी गार्ड' प्रमुख असलेल्या कासीमसुलेमानीला संपवले. गेल्या वर्षी इराणच्या अण्वस्त्र तंत्रज्ञान विकास प्रकल्पांवर हल्ले चढवले; तर या हल्ल्यांमध्ये इराणमधील इस्लामिक राजवट खिळखिळी केली आहे. अशी संधी पुन्हा येणार नाही. असे असले, तरी इराणवर हल्ले केल्यानंतर पाच दिवस होत असताना इराणमधील जनता मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरली नाही.


इस्लामिक राजवटीची थोडी सौम्य आवृत्ती सत्तेवर राहावी, असा अमेरिकेचा प्रयत्न आहे. ही इस्लामिक व्यवस्था जर स्वतःचा अण्वस्त्र तंत्रज्ञान, तसेच आंतरखंडीय क्षेपणास्त्रे कार्यक्रमस्थगित करणार असेल आणि उघडपणे इस्रायल, अमेरिका आणि आखाती देशांविरुद्ध भूमिका घेणार नसेल; तर तिच्या हाती सत्ता जाण्यास अमेरिकेची हरकत नसावी. पण, तत्पूर्वी अमेरिका इराणमध्ये सत्तांतरासाठी प्रयत्न करेल. या युद्धात आखातातील अमेरिकेच्या मित्रदेशांना सर्वाधिक झळ सहन करावी लागत आहे.

कतार, सौदी अरेबिया, बहारीन आणि संयुक्त अरब अमिरातींनी अमेरिकेकडून अब्जावधी डॉलर किमतीची शस्त्रास्त्रे विकत घेतली असली, तरी इराणच्या क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ल्यांनी ते मेटाकुटीला आले आहेत. २० हजार डॉलर किमतीचा एक ड्रोन हवेतल्या हवेत नष्ट करणाऱ्या एका क्षेपणास्त्रासाठी २० लाख डॉलर खर्च करावे लागतात. इराणच्या ड्रोन हल्ल्यांमध्ये फारशी जीवितहानी झाली नसली, तरी तेलशुद्धीकरण प्रकल्पांना आगी लागणे, विमानतळ बंद राहणे आणि तेलवाहू जहाजांची वाहतूक ठप्प होणे, यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणामहोत आहे. एकट्या संयुक्त अरब अमिरातीत दररोज चार लाखांहून अधिक लोक तेथील विमानतळ वापरतात. हे विमानतळ बंद राहिल्यास पर्यटनासह अन्य अनेक उद्योग ठप्प होण्याची भीती आहे. तीच गोष्ट व्यापार आणि गुंतवणुकीची आहे. इराणने 'होर्मुझ'ची सामुद्रधुनी बंद केल्यास जगात अनेक ठिकाणी महागाईचा आगडोंब उसळण्याची भीती आहे. आखातातील घडामोडींकडे भारताचेही बारीक लक्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इराणने हल्ला केलेल्या सर्व देशांच्या प्रमुख नेत्यांशी फोनद्वारे चर्चा केली. त्या देशांमध्ये अडकून पडलेल्या भारतीय नागरिकांची काळजी घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंशी चर्चा करून लवकर युद्ध विराम व्हावा, या भारताच्या भूमिकेचे प्रतिपादन केले. या युद्धाचे भारताच्या ऊर्जा-सुरक्षेवर, तसेच अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणामहोत असल्याने ते लवकर थांबणे, हे भारताच्या हिताचे आहे.

---

**रंगपंचमी हा प्रेम, भक्ती आणि मैत्रीच्या रंगांत रंगून जाण्याचा दिवस! राधा-कृष्णाचा हा आवडता खेळ. 'आज गोकुळात रंग खेळतो हरी' या काव्यात कविवर्य सुरेश भट यांनी जशी रंगपंचमी रंगवली आहे, तशी रंगवून बघा. आयुष्यात प्रत्येकालाच काही ना काही अडचणी असतात, आणि त्या अडचणींच्या ओझ्याखाली दबून प्रत्येक जण तुटलेला असतो. पण तुटलेल्या क्रेयोन्सनेही आपण चित्रं रंगवली आहेतच की! आयुष्यात मनसोक्त रंगांची उधळण करून, त्या रंगांमध्ये रंगून नव्या सप्तरंगी वाटचालीचे स्वागत रंगीत रांगोळीने करूया...**

लहानपणीचा एक खेळ मला अजूनही प्रकर्षान आठवतो. 'पिंकी पिंकी विच कलर?' खेळणाऱ्या सगळ्या मुली, डॅम देणाऱ्या मुलीला हा प्रश्न विचारायच्यात. आणि मग ती मुलगी एखाद्या रंगाचं नाव घ्यायची आणि इतर मुलींनी त्या रंगाची कुठलीही वस्तू शोधून काढायची. बालपणी या खेळाचंही केवढं अप्रुप वाटायचं! मोठं झाल्यावर हसू यायचं, की- आपण असेही काही खेळ खेळायचो. पण रंगांचं वेडच असं होतं. मॅचिंग कलर्स घालायचे, नेल पॉलिश, सँडल, लिपस्टिक सगळं ड्रेसला मॅचिंग असायचं. पुढ कॉर्पोरेट लाईफमध्ये आल्यावर बालपणीच सार रंग फिके पडत गेलेत. ब्लॅक, ब्लू आणि ग्रे! केवळ या तीन टिपिकल रंगांचं साम्राज्य कॉर्पोरेट लाईफमध्य दिसून आलं. आणि मग मी बालपणीचा ता खेळ खूप मिस केला. सहजच विचार केला, की- मुलींचा एक ग्रुप जर इथं हा खेळ खेळायला आला, तर बिचाऱ्यांना या तीन रंगांव्यतिरिक्त इतर रंगच सापडणार नाही व त्यांच्या खेळाचा बेरंग होईल! लहानपणी तर आपण बॉटलच्या रंगासाठीही हट्ट धरायचो. रेडच कलर हवा, किंवा अमुक रंगाचीच वस्तू हवी. कारण ही तसचं होतं ना! तेव्हा आपलं आयुष्य रंगीत होतं. जसजस मोठ होतं गेलो, तसतस रंग मात्र हळूहळू फिके झाल व उडून गेलेत. रंग हा निसर्गान आपल्याला दिलेला अमूल्य ठेवा आहे. रंग मनावर एक मोहिनी पसरवतात. रंग नसल असते, तर काव्य पंक्ती सजल्या नसत्या, हास्य खळाळलं नसतं, अश्रू हळहळल नसते, झेंडे फडकल नसत रंग धैर्याचे, गतीचे, चंचलतेचे, उत्तेजनाच व कोलतेच प्रतिक आहेत. थोडक्यात सार आयुष्य बेरंग झाल असते. सूर्य रंगांचं मुख्य स्रोत आहे. निसर्गदेखील रंगांची उधळण करत आपल मन प्रसन्न करत असतो. निसर्ग माणसाला रंग वैभव बहाल करतो. फिक्या रंगाला भडक रंगाची किनार तर कधी भडक रंगाला फिक्या रंगाची किनार कशी शोभून दिसत तसेच कडक स्वभावाच्या माणसाला थोडा प्रेळ समजुतदार



# उधळीत रंग...

पणा आणि प्रेळ मवाळ माणसाला थोडा राग, कठोरपणा असला की सगळ चित्र शोभून दिसते. माणसामाणसातही विविध रंगछटा पाहायला मिळतात. कोणी आपल्याच विश्वात रमलेला, स्वप्नाळू गुलाबी रंगासारखा, तर कोणी अतितापट, प्रखर गडद 'तांबड्या' रंगासारखा; अस एक ना अनेक रंग आहेत.

आज आयुष्य एका ब्लॅक अॅण्ड व्हाईट फिल्मसारख का वाटत आहे? माणूस हा रंगवेडा असावा. प्रत्येक रंगात त्याला रंगून जाता आलं पाहिजे, आणि मग त्या रंगांध्य त्यान स्वतःच अस्तित्व शोधायला हवे. आयुष्यात दाही दिशा अंधारलेल्या असल्या तरीही काजव्याप्रमाण चमकायला हवं! वेळ आपल्यास अनुकूल असताना रंग बदलणं मात्र योग्य नव्हे! आज माणूस एकल कोंडा झालाय्. प्रत्येकाला आपली स्पेस हवी असते, कोणाची इनवोलव्हमेंट नको असते. पण या स्पेसला देखील एक मर्यादा आखायला हवी. न्यूक्लिअर फॅमिलीजमुळ आधीच, सार एकट पडल आहेत. नाईलाजान आज माणसाला एकटं राहावं लागतंय्. पण या एकटेपणात त्यान नेहमी एकाकी राहू नये. आपल्या संस्कृतीत सण वार जोडण्याचं सर्वांत महत्त्वाच कारण ह आहे, की- माणसं मिळून मिसळून राहतील. बेरंगी आयुष्यात आनंदाच रंग उधळायला तर मित्र व नातेवाईक असतात. पण आज माणूस त्यांच्या पासून दुरवतोय्. आज आपण एक चाकोरीबद्ध आयुष्य जगतोय्. स्पर्धेच्या अस्मितेत स्वतःमध्ये असणाऱ्या आकांक्षेला ही फिके करतोय्. रंगांच संगम मिळल्यावरच चित्राची रूपरेषा सजते. लहानपणी बेधुंद होऊन रंगपंचमी खेळली जायची. अगदी स्वतःचा चेहराही ओळखू नाही यायचा. कोणाचा रंग सर्वाधिक चढलाय्, यात स्पर्धा असायची. किमान सात दिवस तरी रंग उतरायच नाहीत. पण आता ऑफिसला रंगलेल चेहर घेऊन जायची लाज वाटते. कारण आता आपण मॅच्युर्ड झालोय्. रंगपंचमी साजरी करण्यातला सात्विकपणा काळाच्या ओघात कुठेतरी हरवून गेला आहे.

रंगपंचमी हा प्रेमाच्या, भक्तीच्या व मैत्रीच्या रंगांत रंगून जाण्याचा दिवस. राधा कृष्णाचा हा आवडता खेळ. 'आज गोकुळात रंग खेळता हरी' या काव्यात कविवर्य सुरेश भट यांनी जशी रंगपंचमी रंगवली आहे, तशी रंगवून बघा. आयुष्यात प्रत्येकालाचं काही ना काही अडचणी असतात, आणि त्या अडचणींच्या ओझ्याखाली दबून प्रत्येकजण तुटलेला असतो. पण तुटलेले क्रेयोन्सनेही आपण चित्रं रंगवली आहेतच की! आयुष्यात मनसोक्त रंगांची उधळण करून, त्या रंगांमध्ये रंगून जाऊया... व नव्या सप्तरंगी वाटचालीच स्वागत रंगीत रांगोळीन करूया... आपल्या भोवताली अनेक रंग आहेत, अनेक छटा आहेत, हा आनंदाचा व प्रेमाचा रंग इतरांना लावून त्यांनाही रंगवूया... जीवनात तुझ्या राहू दे रंग, सौख्याच अक्षय तरंग. रंगपंचमी व रंगीबेरंगी वाटचालीसाठी रंगीत शुभेच्छा!

समिधा पाठक

---



**माणसाच्या आयुष्यातलं रंगांचं महत्त्व काय वर्णावं? तनामनाला सुखावणाऱ्या या सणाच्या निमित्ताने निसर्गाचं नवसर्जनशील रूप पाहायला मिळतंच, पण एका वेगळ्या हंगामात प्रवेश करताना मनात निर्माण होणारे कुतुहलमिश्रित उत्साहभाव तरंग उमटवून जातात. रंगपंचमीच्या निमित्ताने त्याज्य वृत्तींचा त्याग करायचा, तर रंगपंचमीनिमित्त नव्या रंगात न्हाऊन निघायचं, हा एक अनोखा रंगसोहळाच म्हणायला हवा...**

# निमित्त रंगसोहळ्याचं

विशेष

मधुरा कुलकर्णी

रंगोत्सवानिमित्त धुळवड, रंगपंचमी यासारखे सण म्हणजे उत्साह आणि आनंदानं भारलेले उत्सव. वर्षभर बऱ्याचे सणांचं साजरीकरण होत असतं. त्यातील काही कर्मकांडात अडकवणारे असतात. काही पूजाविधींमध्ये गुरफटवणारे असतात, काही दमवून टाकणारे तर काही भरपूर खर्च घडवून आणणारे असतात. पण धुळवड असो वो रंगपंचमी, या सणांचा धाक कधीच वाटत नाही. त्यांच्या पूर्वतयारीचा ताण येत नाही. माणसा-माणसाच्या मनात लपलेला अल्लडपणा, अवखळपणा हलवून जागा करणारे हे सण! प्रत्येकाच्याचे मनात एक खट्याळ मूल लपलेलं असतं. पण पोक्तपणाचें ओझं, जबाबदाऱ्यांचं भान, दहा तोंडानं बोलणाऱ्या आणि परीक्षण करणाऱ्या तोंडांचं भय यामुळे व्यवहार्य मेंदूच्या देशानं हे मूल अळीमिळी-गुपचिळी साधून बसलेलं असतं. समाजाचा धाक प्रौढ शरीरातल्या या बालमनाला शहाणपणाच्या चौकटीत बंदिस्त ठेवत असतो. पण या सणांच्या निमित्तानं एका हिसक्यासरशी दाव तोडून चौखूर उधळणाऱ्या जनावराप्रमाणे हे जखडलेलं खट्याळ मने उधळतं आणि रंगांच्या साम्राज्यात हरवून जातं. लांब तोंडे करून वैचारिकतेच्या जंजाळात अडकलेल्या चेहऱ्यांच्या भाऊगर्दीत एखादा हसतमुख, मिश्कील प्रवृत्तीचा माणूसे यावा आणि आपल्या खुसखुशीत शैलीनं क्षणात वातावरणाचो नूर पालटवून टाकावा, अगदी तसेच भासतात हे सण!

अंगाला रंगाची चिमूट चिकटण्याचा अवकाश...गांभीर्याचे सगळे मुखवटे झरझर गळून पडतात आणि 'खरे रंग' बाहेर येतात. व्यक्त होणं हा माणसाचा स्वभाव आहे. रंगांच्या माध्यमातून ते अधिक चांगल्या पद्धतीनं साधतं. रंगपंचमी म्हणजे रंगांचा उत्सव... मग हा रंग भक्तीचा असतो, कुठे प्रणयाचा असतो, कुठे उत्साह आणि आनंदाचा असतो तरे कुठे श्रद्धेचा असतो.



मथुरा-वृंदावनातील रंगपंचमी प्रत्येक पुरुषाला कृष्ण आणि प्रत्येक स्त्रीला राधेचं रूप देऊन जाते. कारण इथे महिनाभर रंगणाऱ्या सणाच्या पर्वात प्रत्येकावरे राधा- कृष्णाच्या नात्याचा रंग चढत असतो. प्रीती, भक्ती, प्रणय, माया, ममता या सर्व रंगांमध्ये भाविक न्हाऊने निघतात. गोप-गोपिकांसवे खेळाचा मनसोक्त आनंदे लुटणारा, नटखटपणामुळे आयुष्यात चैतन्य भरणारा कान्हो अंशाअंशानं प्रत्येकाच्या मनात सामावतो आणि या रंगाच्या मेळाव्यावर तोच चैतन्याचा रंग चढतो. आपल्याकडेही अशाचे मंगल भावनेनं अंगावर रंगांच्या कमानी चढवल्या जातात. हिरवा, निळा, पिवळा, लाल, केशरी, नारिंगी... किती रंग... किती वेगळे त्यांचे स्वभाव... किती वेगळी त्यांची वैशिष्ट्यं.. पण एकत्र येतात तेव्हा बेमालूमपणे परस्परात मिसळता आणि काही वेगळ्याच रंगांना जन्म देऊन जातात. रंगांच्या या दुनियेत धाक, संयम, सबुरी, शहाणपणा यो शब्दांना काहीही जागा नाही. मनाला येईल त्या रंगानं मूठे भरायची आणि समोरच्याचं सर्वांग त्या रंगात माखूने टाकायचं. इथे हा मोठा, तो लहान, हा ज्येष्ठ, तो कनिष्ठे असा भेदभाव नाही. सगळेच रंगात न्हाऊन निघतात तेव्हा हा भेदाभेद कुठच्या कुठे गळून पडतो. एका अर्थी माणसानेचे निमर्ण केलेली ही वलयं एकसारखी होतात आणि वर्तुळे विस्तारतं. या वर्तुळाला कोणताही कोपरा नाही, जाचणारा कोणताही कोन नाही. म्हणूनच प्रत्येकाला सामावून घेणारा हा सण महत्त्वाचा ठरतो. या दिवसात सृष्टीत चैतन्याचे पदरवे जाणवू लागलेले असतात. पानगळीच्या या शेवटच्या टप्प्यात झाडाच्या शेंड्यांवर हिरवी पावलं उमटू लागलेली असता. वसंताच्या आगमनानं फुलझाडांवर फुलांचे घोस लगडू लागलेले असतात. हे काहीसं शुष्क आणि कोरडं वातावरण सुसह्य व्हावं यासाठी सृष्टी भडक रंगांची बरसात करते असते.

सुगंधाच्या लाटा उष्णतेला गंधमान करत असतात. निसर्गाच्या या बदलाशी एकरूप होण्याचा संकेत देणारा आणि ऋतुबदलाची सिद्धता करणारा सण म्हणजे रंगपंचमी. होळीच्या भडक्यासारखा वाढणाऱ्या उष्णतेचा प्रकोप रंगांच्या सान्निध्यात हलका करायचा ही शिकवण देणारा हा सण. शोधू पाहता या सणांचे विविध पदर समोर येतात. हो गुंता सोडवणं म्हणजेच आयुष्याचे नवनवीन कंगोरे शोधणं आणि अर्थ जाणून घेणं. ही रंगपंचमी, धुळवड आपल्याला अनेक प्रतीकं सुचवून जाते.

प्रत्येक रंगाचं एक वैशिष्ट्ये असतं तसंच प्रत्येक व्यक्तीचं एक वैशिष्ट्य असतं. हे व्यक्तिविशेष जपणं म्हणजेच स्वत्त्व जपणं अशी भावना जागृत होते. या कोशात व्यक्ती आत्मकेंद्री होण्याचा धोकाचे अधिक असतो. आपलाच रंग किती नवखा, किती अनोखो असा दंभ कुरवाळत आत्ममग्न होऊ पाहणाऱ्या मनाचा कोशभेद करून व्यक्तीला समाजाभिमुख करणारा हा सण आहे. सृष्टीतल्या सगळ्या रंगांचा परिचय करून घ्या, सगळ्या रंगांचे स्वभाव ओळखा आणि आवश्यक तिथे त्याचा उपयोग करून घ्या, ही शिकवण देणारा हा सण.

हिरवा रंग सर्जनाचा, भगवा रंग त्यागाचा, पांढरा रंग वैराग्याचा हे खरें असलं तरी कधी तरी हे सगळे रंग, या सगळ्या जाणिवा, या भावना समरस व्हायला हव्या हे सांगणारा हा सण आहे. शेवटी विविध रंगांचा समतोल साधणं म्हणजे जगणं.

इथे भडक रंगांना संतुलित करण्यासाठी हलके रंग हवेतच. भावना आणि व्यवहार यांचा तोल सांभाळत होणाऱ्या प्रवासाला 'संसार' असं म्हटलं जातं तेव्हा विविध रंगांचा तोल सांभाळणं ओघानंच येतं. कुठल्याच रंगानं दुसऱ्यावर अतिक्रमण करू नये. त्याचं अस्तित्व, ओळख झाकोळून टाकू नये. वृत्तींमध्ये हा समतोल असेल तर मती साथ देते आणि कृती संतुलित राहते. रंगपंचमीसारखा सण हेच तत्त्वज्ञान सांगणारा. आयुष्याच्या काही वर्षांच्या उण्यापुऱ्या प्रवासात माणसानं सर्व रंग न्याहाळायला हवेत. त्याचा आस्वाद घ्यायला हवा. त्यांचा हलकासा स्पर्शही नवी दृष्टी देण्यास कारक ठरू शकतो. जे व्यक्तीचं तेच समाजाचं... साचलेपणा दूर करण्यासाठी नवलाई गरजेची असते. सततच्या वापरामुळे रंग फिके होतात. परिणाम बोथट होतात. जळमटं लोंबू लागतात. अयोग्य आणि अमंगल पुटं चढून मूळचा रंग हरवू लागतो. काही अनावश्यक रंग मूळच्या गर्भरेशमी रंगावर आक्रमण करू पाहतात. या सर्वांची जाण ठेवून पिचकारीतून उडणाऱ्या फवाऱ्याप्रमाणे विवेकी विचारांच्या फवाऱ्यानं ही जळमटं दूर करायला सांगणारा असा हा सण. समाज एकसंध राहावा यासाठी वैचारिक भेसळ, प्रदूषण दूर करून नव्या झऱ्यांना वाटे मोकळी करून द्यावी लागते.

दुष्काळासारख्या परिस्थितीला तोंड द्यायचं तर विहीर उपसून साठलेली घाण काढावी लागते, खोली वाढवावी लागते तरच गर्भामध्ये ओलावा पाझरतो आणि झरे मोकळे होऊन विहीर भरू लागते. समाजाचं तसंच आहे. काळाच्या ओघात अनेक विषयांची राळ उठते आणि गाळे साठत जातो. हा गाळ विचारशक्ती कुंठीत करतो, एका जडे आवरणाआड समाजातील विवेक दडवू पाहतो. नकारात्मकतेच्या रंगाआड दडवू पाहतो. ही परिस्थिती कायम राहिली तर भरकटलेपण जाणवणं स्वाभाविक आहे. पण हे टाळायचं तर होळीत जळणाऱ्या पाल्यापाचोळ्यासारखे हे अमंगल, अप्रस्तुत विचारही जाळून टाकायला हवेत आणि नवविचार आत्मसात करण्यासाठी अवकाश निर्माण करायला हवं. रंगांचा हा उत्साह अशा अवकाश निर्मितीची संधी देतो. समाजातील प्रत्येक घटकाला एकरूप देण्याची संधी देतो. ही संधी साधायला हवी. सणाची धुंदी अनुभवताना ही संधी दवडता कामा नये.